म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
दा. क्र.

# जत्रा

शं. ना. नवरे

प्रकाशक
...वानदास हिरजी
केशव नाईक चाळ, गिरगांव, मुंबई ४.

किंमत ३॥। रुपये

IRBK-0108994

# जत्रा

शं. ना. नवरे

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. ११२ ... सो. नि. ..............
वि. का-वा क्र. ........ .... ...

हिरजी मोनजी
प्रकाशक
भगवानदास हिरजी
केशव नाईक चाळ, गिरगांव, मुंबई ४.

किंमत ३॥ रुपये

IRBK-0108994
IRBK-0108994

प्रकाशक :

**भगवानदास हिरजी**
के. ना. चाळ,
कांदेवाडी, मुंबई ४.

*

प्रथमावृत्ति :

फेब्रुवारी १९६१

*

सर्व हक्क लेखकाधीन

*

वेष्टन : दीनानाथ दलाल

*

मुद्रक :

**ना. अ. मेहेंदळे,**
जीवन मुद्रणालय,
पुणें २.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम २०७०५
विभाग
क्रमांक ७५०७
नों. दि.

विद्या, आरुणी,
विश्वास, संध्या
आणि मकरंद

या आमच्या घरांतल्या जत्रेला—

शा. ना. नवरे यांचे
अन्य कथासंग्रह

तिळा उघड

इंद्रायणी

---

या संग्रहांतील कथा अनुक्रमें 'रहस्यरंजन', दिवाळी ६०, 'हंस,' मे ५९, 'सुदर्शन', जुलै ५९, 'मोहिनी', दिवाळी ६०, 'दीपावली', जून ५९, 'सुदर्शन', फेब्रुवारी ५८, 'हंस', दिवाळी ५८, 'किर्लोस्कर', जून ५७, 'वाङमय शोभा', जुलै ५८, 'मोहिनी', दिवाळी ५९, 'सुगंध', दिवाळी ५९, 'वाङमय शोभा', मार्च ५८, 'सह्याद्रि', मार्च ५६, 'आवाज', दिवाळी ६०, 'वाङमय शोभा', दिवाळी ५९ या अंकांतून प्रसिद्ध झाल्या आहेत.

# १ : तारीख

माणकलाल बजाज मथुरा स्टेशनवर उतरले आणि त्यांनीं सिगारेट पेटवली. ही शहात्तरावी सिगारेट. आत्तां कौशल्या असती तर तिनं आकाशपाताळ एक केलं असतं. एक टीन नि दोन पाकिटं खलास करून तिसरं पाकीट अर्ध्यावर गेलेलं पाहून ती खचित चिडली असती, असं मनाशीं म्हणत त्यांनीं एक दमदार झुरका घेतला आणि हात पाठीमागें नेऊन आळस झटकला. अजून मनांतल्या मनांत ते कौशल्येशीं बोलत होते.

'पण माझं ऐक. आज गाडी सातआठ तास उशीरा आलीय्. गाडींत इतका वेळ बसून रहायचं म्हणजे...... '

'गाडींतले सगळेजण ओढत होते सिगारेट ? कुणीतरी वाचीत असेल, कुणी बाहेरची शोभा बघत असेल– '

'मी दोन्ही गोष्टी करून सिगारेट ओढली. शिवाय माझ्या नव्या कथेबद्दल विचार केला. माझ्या कथेचा बोलपट लागला कीं तुझ्या अंगावर मुठभर मांस नि मुठभर सोनं चढणार आहे. जिकडे तिकडे सौ. बजाज म्हणून तुझं कौतुक होईल– '

विषय बदलूं नका. लेखक झाला म्हणजे त्याला अखंड धूम्रपान करा- वंच लागतं असं नाहीं ना ? '

'तूं म्हणजे अशी आहेस–'

माणकलाल बजाज मथुरा स्टेशनवर उभे राहून विचार करीत होते. एवढ्यांत हमालानं येऊन त्यांना हटकलं आणि विचारलं, 'बाबूजी, सामान उठाना है ?'

'हा हा, बरेली जानेवाला हूँ......'

'बरेली ?'

'हा, क्यों ?'

'क्यों को बरेलीकी गाडी तो अभी चली गयी. अभी छे घंटा ठहरना पडेगा.'

– सहा घटे थांबावं लागणार ?...म्हणजे आणखी सिगारेटी ओढाव्या लागणार...छे, बडोद्याहून निघाल्यापासून माणकलाल बजाजजींचं सगळंच बिनसलं होतं. माणकलालनीं पहिल्या सिगारेटनं दुसरी सिगारेट पेटवली. मनाशीं म्हटलं, 'सत्त्याहत्तरावी ! आणि तिथं जाईपर्यंत किती होतील कोण जाणे !' त्यांनीं स्टेशनवरून आणखी सिगारेटी खरेदी केल्या आणि आपल्या हँडबॅगमध्यें ठेवल्या.

त्याच्या पहिल्या संग्रहाच्या प्रस्तावनेंत त्यांनीं म्हटलं होतं, 'मला ह्या कथा मिळाल्या त्या सगळ्या प्रवासांत ! आयुष्यांत मीं दोनच षोक केले. एक प्रवासाचा आणि दुसरा सिगारेटचा... !' केव्हांपासून ते प्रवास करीत होते, पण ह्या प्रवासासारखा अनुभव त्यांना कधीं आला नव्हता. हा प्रवास असा झाला आहे कीं, पुन्हां जन्मांत कधीं प्रवासाला निघायला नको, असं त्यांना सारखं वाटूं लागलं होतं.

खरं म्हणजे माणकलालनां हा प्रवास कधीं करावा लागेल अशी कल्पनाहि नव्हती. अगदीं गेल्या महिन्यापर्यंत नव्हती. त्या रात्रीं केशवलाल ठक्कर यांच्याकडे आलेल्या पाहुण्यानं ही कल्पना अलगदपणें माणकलालजींच्या मनांत पेरून टाकली होती. त्या पाहुण्यानं आपल्याजवळच्या गोष्टीच्या साठ्यानं सगळ्यांचे आवाज बंद केले होते. खूप प्रवास केलेल्या त्या म्हाताऱ्यानं अशा विविध गोष्टी सांगितल्या होत्या कीं, माणकलालनां त्या साऱ्या शब्दांकित कराव्याशा वाटूं लागल्या.

'बरेली आणि मथुरा यांच्या दरम्यान एक गांव आहे' – त्या पाहुण्यानं आपल्या शेवटल्या गोष्टीची सुरुवात केली आणि घरीं जायला निघालेले माणकलाल पुन्हां थांबले.

'त्या गांवाचं काय ?' त्यांनीं पाहुण्याला विचारलं.

'त्या गांवाची एक वेगळीच कहाणी आहे. त्या गांवाला जाणारा रस्ता नागिणीसारखा आहे. दिसायला अतिशय सुंदर आणि तितकाच घातकी.'

'म्हणजे ?'

'तो रस्ता इतका सुंदर आहे कीं, दरवर्षीं एका विशिष्ट दिवशीं तिथं कुणीतरी त्याच्या प्रेमांत पडतो आणि मग त्याचं काय होतं तें कुणालाच कधीं कळत नाहीं.'

'कां कळत नाहीं ?'

'कारण एकतर प्रेमांत पडणारा इसम त्या गांवाला अगदीं अनोखा असतो आणि दुसरं म्हणजे तो त्यानंतर कधींच कुणाला दिसत नाहीं. दरसाल तो रस्ता एका अनोखी माणसाचा बळी घेत असतो.'

'ह्या सगळ्या दंतकथा असतात.'

'असतीलहि. पण विचार करण्यासारखी गोष्ट आहे कीं नाहीं ही ? अगदीं फॅन्टसी.'

...अगदीं फॅन्टसी...परफेक्ट फॅन्टसी. माणकलाल बजाजजींच्या डोक्यांत ह्या गोष्टीनं घरटं बांधायला सुरवात केली. ही दंतकथा असणार याविषयीं त्यांची खात्री होती, पण हा असला समज कसा पसरला हें पहायला हवं होतं...या कथेंतला सत्याचा अंश माहीत व्हायला हवा होता.

मुलांच्या शाळांना सुट्या लागल्या तशी कौशल्या मुलांना घेऊन आपल्या भावाकडे गेली. घरांत माणकलाल आणि स्वयंपाकाला महाराज असे दोघेच राहिले. 'हातीं घेतलेली कादंबरी ह्या आठवड्याला पुरी केलीत कीं इकडं या, अशीं कौशल्याचीं पत्र येत होतीं आणि माणकलाल मनाशीं म्हणत होते, तिकडे वापीला मेहुण्याकडे जाण्यापेक्षां कुठेंतरी प्रवासाला जावं ! हातांतली कादंबरी पुरी झाली तेव्हां त्यांना आठवण झाली ती केशवलाल ठक्करकडल्या पाहुण्याची, बरेली आणि मथुरेच्या मध्यें बसलेल्या त्या गांवाची

आणि अनोळखी माणसाला एका विशिष्ट दिवशीं खुणावणाऱ्या त्या सुंदर रस्त्याची.

माणकलालनां तो सुंदर रस्ता दिसूं लागला. लालचुटुक रंगाचा, दोन्ही हातांनीं हिरव्यागार गवताच्या पट्ट्यांना बरोबर नेणारा. त्यावरून धांवणारी नजर सहज एखाद्या ठिपक्यांत पूर्णविराम पावावी आणि तरीहि वाटत रहावं कीं, हा अगदीं नाकासमोर चालणारा रस्ता पुढं कुठेंच संपलेला नाहीं. सारख्या अंतरावर उभं राहून डेरेदार झाडांनीं त्या रस्त्याला वाट करून दिलेली आहे आणि त्या रस्त्यानं चालत जाण्यासारखं सुख कशांतहि नाहीं असं सारखं वाटत रहातंय्.

त्या रस्त्याचो आणि माणकलाल बजाजजींची इतकी ओळख झाली कीं त्यांनीं कौशल्येला पत्र लिहून पुढल्या सोमवारीं बरेलीला जात असल्याचं कळवूनहि टाकलं. त्याप्रमाणें आधीं तिकीटहि काढून ठेवलं.

त्या आधींच्या शनिवारीं त्यांच्याकडे सिनेमाचा एक निर्माता दिग्दर्शकाला घेऊन आला तेव्हां आनंद होण्यापेक्षां माणकलालनां काहींसा रागच आला. कधींतरी कबूल केलेली चित्रपट – कथा घेण्यासाठीं त्यांनीं आपल्याकडे याच सुमाराला यावं, आपल्या बरेलीच्या कार्यक्रमांत मोडता घालावा, याचा त्यांना राग आला.

'प्रोडयूसरसाहेब, मला परवांच प्रवासाला जायचंय्. सध्यां अगदीं वेळ नाहीं. प्रवासाहून आल्यावर बघूं. कदाचित् एक फॅन्टसीसुद्धां देईन मी तुम्हांला.'

'तें नाहीं चालणार. पुढचं काय सांगावं? आज आलों आहोंत तर आजच संपवून टाकूं बोलणं.'

'पण परवांच—'

'नो, नो. आम्हीं ऐकणार नाहीं. येत्या आठवड्यांत आम्हांला मुहूर्त करून शुटिंगला सुरुवात करायची आहे.'

'पण माझ्याकडे आतां नवीन स्टोरी नाहीं—'

'तुमच्या नव्या कादंबरीवरच आम्हांला पिक्चर काढायचं आहे. फक्त दोन दिवस चर्चा करून सगळं संपवतां येईल.'

— आणि मग त्यांच्या आग्रहाखातर बजाजजींनीं आपला बरेलीचा कार्यक्रम पुढें ढकलला. ह्या वेळी तरी सगळं ठीक व्हायला हवं होतं, पण बडोद्याहून गाडी सुटली तीच मुळीं उशीरा आणि मथुरेला ती इतकी उशीरा पोंचली कीं सिगारेट ओढून होईतोंवर बरेलीची गाडी निघूनहि गेली होती. बडोद्यापासून सगळा प्रवास अत्यंत कंटाळवाणा झाला होता आणि सिगारेटी इतक्या ओढल्या गेल्या कीं धूम्रपानांतली मजा जावून नुसती संवयीसाठीं संवय राहिली होती.

'तो सुंदर रस्ता आपली केव्हांची वाट पहात थांबला आहे आणि आपल्याला इतका उशीर होणं चांगलं नाहीं अस सारखं बजाजजींना वाटूं लागलं. खरं म्हणजे एव्हांना आपण बडोद्याला परत येऊन वापीला मेहुण्या-कडेहि पोंचलों असतों.'

बरेलीच्या गाडींत बसल्यावरहि त्यांना सारखं हेंच वाटत होतं. कारण त्याहि गाडीचं कांहींतरी बिघडलं होतं. मथुरेहून सुटल्यापासून ती सारखी थांबत होती. गार्ड, ड्रायव्हर खालीं उतरून तिची सारखी पहाणी करीत होते आणि प्रत्येक स्टेशनावर कुणी ना कुणी येऊन कांहींतरी ठाकठोक करीत होतं. सहासात तासांच्या प्रवासानंतर गाडींतला प्रत्येक उतारू कंटाळला आणि त्यांच्याबरोबर बजाजजीहि कंटाळून म्हणाले, 'यापेक्षां मथुरेहून चालत निघालों असतों तर बरं झालं असतं!'

त्या ठिकाणीं गाडी थांबली ती इतकी थांबली कीं ही पूर्वी कधीं थांबत होती कीं नाहीं असा प्रश्न पडावा! दोन तीन तास झाल्यावर गाडीं-तला प्रत्येक उतारू खालीं उतरून पाय मोकळे करूं लागला. कुणी वायांनीं चुली पेटवून मुलांना खाण्यासाठीं भातहि टाकला.

कुणीतरी एक उतारू बजाजजींच्या डब्याशीं आला आणि म्हणाला, 'आपही माणकलाल बजाज है ना?'

'हां. क्यों?

'मुझे आपका लिखाण बहोत पसंद आता है?'

'अच्छा?'

'गाडी तो इतनी लेट हुई है की न मालूम वह चलेगी की नहीं. आप-नीचे नहीं उतरेंगे?'

आपल्या वाचकासाठीं म्हणून मग बजाजजी खालीं उतरले आणि खिशांतली सिगारेटची पेटी त्याच्यापुढं करून म्हणाले, 'आपकी तश्रीफ ?'

'मैं तो एक मामुली आदमी हूँ—'

'कहाँ के रहनेवाले ?'

'बरेलीके '

आतां ह्या बरेलीच्या रहिवाशाकडून त्या गांवची नि रस्त्याची माहिती मिळेल अशी आशा बजाजजींच्या मनांत उभी राहिली.

'तुम्हीं इकडे कसे ?' त्या इसमानं बजाजजींना विचारलं.

'खरं सांगायचं तर मला नांवहि माहीत नसलेल्या एका गांवांत जायचे आहे.'

'कुठं—इथं बरेलीच्या जवळच आहे ना ? '

'हो. तुम्हांला काय ठाऊक ! '

'मी बरेलीचा. मला ठाऊक आहे थोडंसं. इथं एक गांव आहे आणि त्या गांवांत जाणारा नखरेल रस्ता बहुतेकांना ठाऊक आहे. आपली ही गाडी थांबली आहे ना, इथंच कुठंतरी आसपासच्या बाजूला तें गांव असावं. मी तर प्रत्यक्ष पाहिलेलंच नाहीं तें ! '

'ही गोष्ट खरी आहे काय ? '

'कोण विषाची परीक्षा करतंय् ? मला स्वतःला ही दंतकथा वाटतेय्.'

'मलाहि तसंच वाटतंय् नि म्हणून मी तिथं चाललोंय. खरं म्हणजे दहाबारा दिवसांपूर्वींच मी तिथं जाणार होतों, पण माझा कार्यक्रम लांबणीवर पडत गेला आणि आतां ही गाडी अशी लेट झालीय्.'

'मी येऊं का तुमच्या बरोबर ! आपण तपास करूं गांवाचा.'

बजाजजींना आनंद झाला. आपल्याच मताचा साथीदार मिळाल्यामुळं त्यांना हुरूप आला.

'मला नाहीं वाटत, गाडी आज चालू होईल असं. आपण तपास करूं त्या गांवाचा—'

बजाजजींनीं आपली सूटकेस बाहेर काढली आणि त्या माणसाबरोबर चालायला सुरुवात केली.

'दरसाल एका विशिष्ट दिवशींच हें घडतं असं म्हणतात. ऐकलंय् ना तुम्हीं ?' त्या इसमानं बजाजजींना विचारलं.

'ऐकलंय्. तुम्हांला ठाऊक आहे कोणत्या तारखेला घडतं हें ? म्हणजे पुन्हां त्या तारखेला जाऊन मी सगळी माहिती गोळा करीन.'

'मला नाहीं ठाऊक ती तारीख. आपण जातोंच आहोंत. गांवाचा तपास लागला कीं करूं चौकशी. मला मात्र ही रचलेली कहाणी वाटते.'

'माझी तर खात्रीच आहे. अरबी भाषेंतील कथेसारखी एखाद्या परीची ही कथा असावी त्या तारखेला ही परी येत असेल, आलेल्या त्या अनोळखी माणसाला प्रेमांत टाकीत असेल. छे: बोगस ! माझा विश्वासच बसत नाहीं.'

'तुम्हीं मात्र यावर सुरेखशी कथा लिहा.'

एव्हांपर्यंत दोघेजण रेल्वेची तार ओलांडून बाहेर पडले होते. इतक्यांत गाडीची शिटी वाजली.

'गाडी चालूं होतेय् बहुतेक. मी फिरतों परत. तुम्हीं येताय् का ?'

बजाजजी हंसले. म्हणाले, 'तुम्हीं जा पुढं. मी जातों भटकत असाच.'

'अच्छा. तुमची गोष्ट छापून आली कीं मी पत्र पाठवीन तुम्हांला.'

'बहोत शुक्रिया.'

तोंडानं शीळ घालीत बजाजजी शेतांतून चालूं लागले. पलिकडे झाडी दिसत होती, तिथें सडक असण्याची शक्यता होती. तीच सडक आपल्याला या गांवीं घेवून गेली तर ? त्या परीच्या राज्यांत गेल्यावर तिला मी एक गोष्ट सांगेन. एक झाली कीं दुसरी...दुसरी झाली कीं तिसरी...आणि मग तिला मी सांगेन, 'आतां तूंच सांग एकादी गोष्ट. तुझी गोष्ट झाली कीं मी तुला अशी गोष्ट सांगेन--'

'मला नाहीं येत गोष्ट सांगतां.' ती म्हणेल.

'नाहींतर नाहीं. खरी घडणारी हकीकत सांग एकादी.'

'म्हणजे कशी ?'

'तुझ्या राज्यांत घडणाऱ्या त्या गूढ मृत्यूची. तुझ्याकडे अनोळखी माणसाला खेंचून आणणाऱ्या त्या सुंदर रस्त्याची, तुझ्या प्रेमांत पडणाऱ्या त्या भोळ्याभाबड्या माणसाची आणि तूं त्याचा खून–'

विचार करतां करतां बजाजजी शेतं ओलांडून त्या झाडीजवळ आले. त्यांना वाटल्याप्रमाणेंच तिथं रस्ता होता. स्वच्छ. तांबडालाल, नाकासमोर जाणारा.

बजाजजींना तो इतका सुंदर वाटला कीं, त्या रस्त्यानं गेल्यानंतर एकादं सुंदर राज्य लागल्याशिवाय रहाणार नाहीं अशी त्यांची खात्री झाली. एका इंग्रजी कुंजगीताची ओळ गात त्यांनीं पावलं टाकायला सुरुवात केली. 'छे, या रस्त्यानं जातांना कधीं दमायला होणार नाहीं!' ते मनाशीं म्हणाले. 'इतका लालभडक, इतका ऐटबाज रस्ता मीं कुठं कधीं पाहिलेलाच नाहीं. त्या माणसाबरोबर गाडीकडे परत न जातां मी इकडें आलों तें किती छान झालं!'

'ते चालत होते आणि रस्ता संपत नव्हता. दुतर्फा असणाऱ्या वृक्षांच्या छायेंतून तो न कंटाळतां चालला होता. नाकासमोर. मध्यें कुठं ओढा आला तर त्यावरून हळूंच पलीकडे पाऊल टाकीत.

प्रवास कधीं संपूंच नये, ह्या रस्त्याची सोबत सोडूंच नये असं बजाजींना झालं. त्या दंतकथेंतला रस्ता हाच असावा आणि तो मात्र खरा असावा यावर ते खूष होते. तो रस्ता जर हाच असेल तर मी खरा भाग्यवान्! कथेकडे लेखक ओढला जातोय् तेव्हां ती कथा अशी साधीसुधी नसणार. तिथं एकादी लावण्यमयी माझी वाट पहात उभी असेल. आपल्या सहवासाचा लाभ देऊन मला म्हणेल, 'अरे त्या कथेवर बिलकूल विश्वास ठेवूं नकोस!'

दोन तीन तास वाटचाल झाली तरी बजाजजी दमले नाहींत, कीं त्यांना भूक वाटली नाहीं. सिगारेटसुद्धां ओढावीशी वाटली नाहीं दोन्ही बाजूनां नजर टाकीत त्या रस्त्यानं ते जात होते. त्यावर टाकलेलं प्रत्येक पाऊल त्यांना सुखवीत होतं. आपल्या कथेंतला हाच रस्ता आहे अशी त्यांची खात्री झाली. चालतां चालतां मनाशीं कथेचा विषय घोळतच होता.

संध्याकाळ होत आली, शेवटला रेंगाळणारा प्रकाशहि संपत आला, तरी बजाजजी रस्त्यानं चालले होते. आतां थोड्याशाच अंतरावर त्यांना झाडी दिसूं लागली होती. ह्या झाडींतच तें गांव वसलेलं असणार. ते स्वतः-शींच पुटपुटले, 'आजची रात्र कुठंतरी देवळांत काढूं आणि सकाळींच फिरायला निघूं गावांत. कुणी भेटल त्याच्याजवळ चौकशी करूं.'

त्यांना वाटलेलं खरंच होतं ! त्या झाडींत आतां दिवे मिणमिणूं लागले होते. रस्त्याचा शेवट तिथंच होत होता. फक्त पंधरा-वीस मिनिटांचा प्रश्न होता. अपुऱ्या प्रकाशांतूनहि सरळ रस्त्यानं जाणं सहज शक्य होतं.

—तिथं गांवाच्या वेशीजवळ कुणीतरी हातांत दिवा घेऊन उभा होता. जवळच त्याची झोंपडी असावीशी वाटत होती. कितीतरी वेळ तो इसम तिथंच तसा उभा होता.

बजाजजी वेशीजवळ आले तेव्हां त्यांना तो स्पष्ट दिसला. खूप म्हातारा झालेला लटपटत्या अंगाचा आणि पाठींत पोंक आलेला.

'कौन है आप !' त्यानं बजाजजींना सुरकुतलेल्या आवाजांत विचारलं.

'मी एक मुसाफर आहें. बडोद्याहून आलोंय्.' बजाजजींनीं उत्तर दिलं.

'कुणाकडे जायचंय् ?'

'कुणाकडं असं नाहीं. मी आपला सहजच आलोंय्. गाडी लेट झाली तेव्हां खालीं उतरलों आणि आलों चालत झालं !'

'कसे आलांत ?'

'कसे म्हणजे ? ह्या रस्त्यानं. तुमच्या गांवाचा रस्ता मात्र फारच सुरेख आहे हं ! मुळीं दमायलाच होत नाहीं ! माहेरची वाट दाखवणारा असं वाटतो. केव्हां एकदा गांवांत जाईन.'

तो म्हातारा माणूस हंसायलाच लागला. खूप कौतुकानं.

'चहा वगैरे कांहीं घेणार ? चला, करून देतों.'

'चला.'

बजाजजी त्या म्हाताऱ्याच्या मागोमाग त्याच्या झोंपडींत शिरले.

त्या म्हाताऱ्यानं चुलींत जाळ केला आणि काळं झालेलं भांडं त्यावर ठेवलं.

'आतां चहा घ्या, मग पोटभर जेवून घ्या.'

'कशाला त्रास घेतां तुम्हीं ?'

'असूं द्या. पुण्य घडतंय् माझ्या हातून तर मोडता कशाला घालताय्? ...कुठून आलांत म्हणालांत ?'

'बडोद्याहून.'

'काय करतां आपण ?'

'मी लेखक आहें. कहाण्या लिहितों मी. इथं येण्याचं कारणसुद्धां—'

'ठाऊक आहे मला.'

'तुम्हांला कसं ठाऊक ? मी इथं आलोंय् तें म्हटलं तर सहज, म्हटलं तर कहाणी लिहायला.'

'कहाणी ? कसली कहाणी ?'

'ह्या...ह्या रस्त्याची आणि गांवाची. मला कुणीतरी सांगितलेली इथली कहाणी अर्धवटच आहे—'

'तुम्हांला या गांवाची कहाणी नाहीं लिहितां येणार !' तो म्हातारा कांहींसा ठांसून म्हणाला.

'तरी मी लिहिणार ! हा नागिणीसारखा देखणा पण विषारी समजला जाणारा रस्ता—'

'विषारी नाहीं हें लिहिणार आहेस ?'

'हो. लिहीनसुद्धां.'

'तुला लिहितांच येणार नाहीं. कारण ही गोष्ट अगदीं खरी आहे. ह्या गांवाला तूं अनोळखा आहेस हें जेवढं खरं आहे तितकीच ही गोष्ट खरी आहे. कारण ह्या गांवाची ठरलेली तारीख आजची आहे. ह्याच तारखेला एक अनोखा इसम ह्या रस्त्याच्या प्रेमांत पडतो—'

'झूट ! बिलकूल झूट !!' बजाजजी किंचाळले.

'झूट नाहीं हें ! इतकीं वर्षं पहातोंय् मी. सारा दिवस संपत आला तरी अजून कसा अनोखा इसम यंदा आला नाहीं म्हणूनच दिवा घेऊन मी वेशीजवळ उभा होतों.'

—आणि तो खदखदा हंसायला लागला. बजाजजींना त्याचं हंसणं ऐकूं येणं शक्यच नव्हतं !

० ० ०

# २ : अेक झोंपीं गेलेला कारकून जागा झाला, त्याची गोष्ट

दुपारीं दोन वाजले तेव्हां पारडीवाला अग्निहोत्रीं-कडे आला. ‘ केम डिका, पगार घेतला के नाई ? ’ त्यानं अग्निहोत्रींना विचारलं. ‘ घेतला तर ! साला मोजून छप्पन रुपया नऊ आणा घेतला. ’

‘ मग मॉंजिनींत येते का ? ’ पारडीवाल्यानं डोळे बारीक करून म्हटलं.

एक तारखेला पगार घेतला कीं मॉंजिनींत जाऊन केक्स खायचे नि किंचित् गुंगी येईल इतपत मद्य घ्यायचं हा त्यांचा गेल्या कित्येक महिन्यांचा ठरलेला कार्यक्रम होता. पारडीवाल्यानं अग्निहोत्रींसारख्या कित्येक जणांना हा कार्यक्रम आखून दिला होता. नि बहुतेक कारकूनवर्ग या कार्यक्रमावर खूष होता. त्या थोडयाशा गुंगीनं कचेरींतलं कंटाळवाणं काम ते महिनाभर आनंदानं करीत, नि पुढल्या एक तारखेच्या कार्यक्रमाची वाट बघत.

पारडीवाला आल्याबरोबर त्याच्यासह बाहेर पडायचं नि मॉंजिनींत ठराविक टेबलावर जाऊन बसायचं, हें पगार घेतांना एक आण्याच्या स्टॅंपवर स्वाक्षरी करतेवेळीं मनाशीं आंखलेलं स्वप्न हेडक्लार्क पुरं करूं देईल असं अग्निहोत्रींना वाटत नव्हतं. हेडक्लार्कनं अग्निहोत्रींना दहा वर्षांपूर्वीची एक

जुनी फाईल शोधून आणायला सांगितलं होतं, नि ती फाईल लौकर मिळेल अशी किंचित्‌हि अशा नव्हती.

त्याचबरोबर पारडीवाल्याला नकार देणं अग्निहोत्रींच्या जिवावर आलं होतं. त्यानं पुन्हा तोच प्रश्न केला तेव्हां अग्निहोत्री म्हणाले, ' उशीरां जाऊन चालायचा नाई का ? '

' नाई चालायचा. साला एक तारीकला कटकट करते म्हंजे काय ? '

' अरे, पण हेडक्लार्कनं मला त्या रेकॉर्ड सेक्शनला जायला सांगितलं आहे. '

पारडीवाला हेडक्लार्ककडे गेला नि त्यानं अग्निहोत्रींना सोडायची त्याला विनंती केली. हेडक्लार्कनं सगळा मतलब ओळखून ' हो ' म्हटलं नि अग्निहोत्रींना जपून प्यायची सूचना केली.

मॉंजिनींत गेल्यावर अग्निहोत्रींनीं पारडीवाल्याबरोबर भरपूर केक्स खाल्ले नि मद्याचं प्रमाण नेहमीपेक्षां किंचित् वाढवलं. आजची गुंगी कांहीं और आहे असं त्यांना सारखं वाटू लागलं. या खाण्यापिण्यानंतर खरं म्हणजे चांगली दोनचार तास झोंप काढायला हवी होती. निदान टेबलावर बसून अर्धा तास डुलकी घ्यायला हवी होती त्याऐवजीं त्या धुळीनं भरलेल्या रेकॉर्ड सेक्शनमध्यें फाईल शोधायला जायचं म्हणजें फांशीची शिक्षा होती.

रेकॉर्ड सेक्शन तळघरांत होता नि कधींहि झाडूचा हात न फिरल्यामुळं तिथं अतिशय धूळ होती. क्वचितच कुणी तिथं जात असल्यामुळं तिथली हवा अगदीं कुबट होती. या रेकॉर्ड सेक्शनमध्यें जुन्या दहा वर्षांच्या फायली धुंडाळायच्या नि त्यांतली नेमकी हवी असलेली फाईल घेऊन यायचं ही कांहीं साधी गोष्ट नव्हती. अग्निहोत्रींच्या चौदा वर्षांच्या नोकरींत ते फक्त एकदांच तिथं गेले होते, नि त्याच वेळीं पुन्हां तिथं कधींहि न जाण्याची त्यांनीं शपथ घेतली होती.

प्लॉट नंबर १२७–एन् ' वर एक सार्वजनिक बाग उभारायची होती नि त्याबाबतचे कागदपत्र निकालांत काढण्यासाठीं दहा वर्षांपूर्वीची एक फाईल हवी होती. डिमेलोसाहेबाला सगळा इतिहास ठाऊक होता. त्यानं दहा वर्षांपूर्वीची ' प्लॉट नंबर २४९– के वर अशीच एक सार्वजनिक बाग उभा-

रण्याबद्दलची फाईल आपल्याला आठवत असल्याच सांगितलं, नि हेडक्लार्क दामल्यांनीं अग्निहोत्रींना ती शोधायचा हुकूम दिला. कांहींहि करून फाईल हवीच होती, नि ती बहुतकरून रेकॉर्ड सेक्शनमध्येंच होती. फाईल न मिळाल्यास डिमेलोसाहेबानं सगळ्यांना फांसावर चढविलं असतं.

माँजिनींतून अग्निहोत्री कचेरींत आले नि आपल्या टेबलाशीं बसले; त्यांचे डोळे झोंपेनं जड झाले होते. डोक्यांत आनंदाची पवनचक्की चालू झाली होती. या क्षणीं झोंपेच्या आनंदासाठीं नोकरीवर लाथ मारावी असा एक ऐटबाज विचार अग्निहोत्रींच्या डोक्यांत आला; पण तो फार काळ टिकला नाहीं.

हेडक्लार्क दामल्यांनीं फाईल शोधण्याबद्दल अग्निहोत्रींना पुन्हा आठवण दिली. ओठांतल्या ओठांत डिमेलोसाहेबाला एक नि दामल्यांना दोन अशा अशा एकंदर तीन चुरचुरीत शिव्या देऊन अग्निहोत्री जागेवरून उठले.

घड्याळांत तिनाचे ठोके पडले, तेव्हां आणखी दोन-अडीच तासांनींच आपण त्या तुरुंगांतून सुटूं अशी मनाला वेडी आशा लावून अग्निहोत्रींनीं रेकॉर्ड सेक्शनमध्यें पाऊल ठेवलं.

धुळींत पावलं उमटवीत ते पहिल्या कपाटाजवळ गेले. त्यांनीं जेमतेम पंधरावीस फायली पाहिल्या नि मग त्यांना दिसेनासं होऊं लागलं. डोळ्यां-वर मद्याची गुंगी चढूं लागली. गुंगीनं जडावलेल्या पापण्या सारख्या खालीं जाऊं लागल्या.

... आतां शक्य नव्हतं ! त्या जडावलेल्या पापण्या उचलणं शक्य नव्हतं, फायली शोधणं शक्य नव्हतं, हवी असलेली फाईल घेऊन साहेबापुढं उभ राहणं तर अगदींच अशक्य होतं. साऱ्या शरीरानं बंड पुकारलं होतं.

अर्धमिटल्या डोळ्यांनीं अग्निहोत्री तसेच कोपऱ्याकडे चालत गेले नि तिथल्या खुर्चीवर त्यांनीं बैठक मारली. अशा स्थितींत फाईल शोधण्याचा प्रयत्न करावा कीं थोडीशी झोंप घेऊन मग उत्साहानं कामाला लागावं, असा विचार करीत असतांनाच अग्निहोत्री झोंपीं गेले. नकळत--अगदीं नकळत.

✦ ✦ ✦

जाग झाल्यावर अग्निहोत्रींनीं मोठी जांभई दिली, डोळ्यांवरून हात फिरवला.

विजेचा झटका बसावा तसा त्यांचा हात मागें आला ! त्यांनीं स्वतः-कडे निरखून पाहिलं.

... म्हणजे ? काय भुताटकी आहे कीं काय ?

डोक्याच्या गोटयावर जटा उगवलेल्या, एकाद्या साधूसारखी दाढी वाढलेली, अंगावरच्या कपडयांचीं लक्तरं झालेलीं. हा काय प्रकार आहे ? कुणी चावटपणा तर केला नाहीं ना ?

अग्निहोत्रींनीं आठवून पाहिलं. आज एक तारीख...दुपारीं दोन वाजतां आपण पारडीवाल्याबरोबर मॅाँजिनींत गेलों...तिथं केक्स खाल्ले... मद्य घेतलं---नेहमींपेक्षां वेगळं नि किंचित् जास्त... कचेरींत परत आल्यावर दामल्यांनीं इथं पाठविलं... प्लॉट नंबर... प्लॉट नंतर १२७ – एन् वर सार्वजनिक बाग उभारायची आहे, त्यासाठीं प्लॉट नंबर . . . प्लॉट नंबर २४९ के वरल्या बागेच्या उभारणीची दहा वर्षांपूर्वींची फाईल डिमेलोसाहेबाला तांतडीनं हवी आहे . . .

अग्निहोत्री लगबगीनं उठले. प्रथम फाईल शोधून मग ह्या भुताट-कीचा विचार करूं. मद्यामुळं पोटांत उसळलेल्या भुकेचा डोंब शांत करूं, असा विचार करून त्यांनीं कपाटं धुंडाळायला सुरुवात केली.

तासभर शोध करूनहि ती फाईल मिळाली नाहीं. पोटांत भुकेचा वडवानल उसळला, तेव्हां ते नाइलाजानं रेकॉर्ड सेक्शनच्या बाहेर आले. डिमेलोसाहेबाला कांहींतरी थाप मारून वेळ भागवून नेऊं असं त्यांनीं ठरवलं.

ते तळमजल्यावरून पहिल्या मजल्यावर आले, नि तिथं त्यांना स्त्रियांच्या हंसण्याचा आवाज ऐकूं आला. इथं स्त्रियांचं काय काम आहे ? कीं हा आवाज हाहि आपल्याला होणारा आणखी कांहीं भ्रम आहे ?

एवढयांत रंगीबेरंगी कपडे घातलेल्या, चेहेरे रंगवलेल्या, राजरोसपणें पदराचं नीट भान न ठेवलेल्या कांहीं मुली समोरून हंसतखिदळत आल्या.

अग्निहोत्री त्यांच्याकडे अचंब्यानं पाहूं लागले, तशी एक साळुंखी-सारख्या आवाजाची मुलगी अतिशय धीटपणें त्यांच्यापुढं आली नि म्हणाली,

'बुवा, तुम्हांला कुणाला भेटायचं आहे ? हें ऑफिस आहे, हें ठाऊक आहे ना तुम्हांला ?'

अग्निहोत्री एकदम संतापले.

'कार्टे ! हा प्रश्न मीच तुला विचारणार होतों. तुम्हां मुलींना ठाऊक आहे का हें ऑफिस आहे म्हणून ? तुमचं काय काम आहे इथं ? आणि उलट मलाच विचारतेस, हें ऑफिस आहे हें ठाऊक आहे का म्हणून ? अग, गेलीं चौदा वर्षं मी इथं काम करतोंय्.'

शरमून जाण्याऐवजीं एखाद्या वेड्याकडे पहावं तशा नजरेनं त्या साऱ्या मुली अग्निहोत्रींकडे पाहूं लागल्या. आपापसांत तशाच अर्थाचं कांहीं कुजबुजूं लागल्या.

मग ती अत्यंत धीट मुलगी न लाजतां म्हणाली, 'असेल हो तस ! बरं, तुम्हीं कुठंसं काम करतां आहांत चौदा वर्षं ?'

'पार्क्स ॲन्ड गार्डन्स सेक्शनमध्यें ! झालं समाधान ?' अग्निहोत्रींनीं रागानं म्हटलं.

'अय्या ! तिथं होय ? तुमच्या हेडक्लार्कचं नांव काय ?'

'दामले. एल्. के. दामले. पण तूं कोण मला विचारणार ?'

'मी ? मी इथंच आहें, लीज सेक्शनला.'

एवढं बोलणं होईतों अग्निहोत्रींजवळ आणखी गर्दी जमली. स्वच्छ कपड्यांतले कुणी ऐटबाज तरुण आले, आणखी नपट्टाट्टा केलेल्या मुली आल्या. मुलींसारखे दिसणारे आणखी तरुण नि मुलांसारख्या दिसणाऱ्या आणखी मुली आल्या. शिपाई आले. प्रत्येकजण अग्निहोत्रींकडे निरखून पाहूं लागला.

आतां अग्निहोत्रींची खात्री पटली कीं आपण मॉंजिनींत जें मद्य घेतलं तें बरंच कडक असलं पाहिजे नि त्यामुळं आपल्याला झोंपेंत असलं कांहींतरी चमत्कारिक स्वप्न पडत असलं पाहिजे. त्या गमतीदार स्वप्नावर खूष होऊन अग्निहोत्रींनीं ठरवलं कीं पारडीवाल्याला हें सगळं सांगायचं नि त्याला म्हणायचं, पुढल्या एक तारखेला पुन्हा असलं कडक पेय कांहीं देऊं नकोस बुवा !

पडत असलेलं स्वप्न आणखी चालू राहावं म्हणून अग्निहोत्री सगळ्यांना उद्देशून म्हणाले,—' हें मी जें काय पहातों आहे तें मी पूर्ण ओळखून आहें. हें असं कां दिसतं हेंहि मला ठाऊक आहे. पण ही गंमत चालूं द्या अशीच ! तुम्हीं सगळींजणं इथंच असतां नोकरीला ?'

' हो. '

' ह्या रंगीत बाहुल्यादेखील ?' मुलींकडे पहात अग्निहोत्रींनीं पुन्हा मजेदार प्रश्न केला.

सगळ्यांनीं जेव्हां ' हो ' म्हटलं तेव्हां ते खूप मोठ्यानं हंसले नि म्हणाले, ' आनंद आहे ! या बाहुल्या काय काम करतात ?'

' इतर क्लार्क करतात तेंच. '

' आणि तरी यांना एवढं चित्रांतल्यासारखं नटायला वेळ मिळतो ? का नटायचं एवढंच काम असतं ह्यांना ?'

यावर सगळेजण हंसले.

त्यांच्या हंसण्यावर आपला एक मजला चढवून अग्निहोत्री म्हणाले, ' बरं, आतां तुम्हीं कुठं जातांय ?'

' लंचला.—— जेवायला. '

' लंच घ्यायची ही वेळ आहे ? किती वाजले आहेत आत्तां ? पांच वाजतां कुणी जेवायला जातं, का घरीं जातं ?'

' आत्तां कुठं दोन वाजताहेत ! ही लंचचीच वेळ आहे. ' मुलींनीं आपल्या मनगटावरल्या सोनेरी टिकल्यांत पाहून धीटपणें उत्तर दिलं.

' मला बनवतां काय ? कोण म्हणतं आत्तां दोन वाजले ? मी नि पारडीवाला दोन वाजतां जेवायला गेलों. तिथून परत आलों तेव्हां तीन वाजले होते. '

शिपायांनीं अग्निहोत्रींना कचेरीवरल्या टॉवरवरचं घड्याळ दाखवलं.

—आँ ? दोन वाजले ? पुन्हा दोन वाजले दुपारचे ? अरे, मॉंजिनींत काय जादूचं मद्य देतात का काय ?

आतां मात्र अग्निहोत्री गोंधळले. हें स्वप्न नसावं असं त्यांना वाटूं लागलं...मग हें काय चाललंय् ? हीं माणसं कोण ? त्यांचे पोषाख हे असे

काय ? ह्या मुली इथं कशा ? त्या धीटपणानं असं कां बोलतात ? एवढ्या कां नटतात ?...

अग्निहोत्रींनीं सगळ्यांना जवळ बोलावलं नि विचारलं, 'आज एक तारीख ना ?'

'हो.'

'इथं ह्या ऑफिसांत 'पार्क्स अँड गार्डन्स' नांवाचा सेक्शन् आहे ना ?'

'हो.'

'तिथले हेडक्लार्क दामले आहेत त्यांच्याकडे मला न्या, किंवा डिमेलोसाहेबांकडे न्या.'

'इथं कुणी दामले नाहींत नि डिमेलोसाहेबहि नाहीं.'

...पुन्हा घोटाळा !

'बरं, कॅशर आहे त्याचं नांव म्हापसेकर आहे ?'

'बरोबर.'

... हें कसं जमलं ?

'त्याचं पुरं नांव पी. पी. म्हापसेकर ?'

'बरोबर.'

'मग दामले कुठं आहेत ? डिमेलोसाहेब कुठ आहे ?'

'आम्हांला ठाऊक नाहीं. आम्हीं सगळेजण नवीनच आहोंत.'

'नॉन्सेन्स !' अग्निहोत्री किंचाळले, 'तुम्हीं काय आत्तांच आलांत ह्या ऑफिसांत ?'

'नाहीं. झालीं दोनतीन वर्षं !'

'डोन्ट ट्राय टु फूल मी ! तुम्हांला डिमेलोसाहेब माहीत नाहीं, दामले हेडक्लार्क माहीत नाहींत, नि म्हणतां तीन वर्षं झालीं अं !'

'खरं आहे.'

'मूर्ख आहांत ! मला माझ्या सेक्शनकडे न्या पाहूं.'

अग्निहोत्रींच्या मागून सगळी वरात निघाली.

अग्निहोत्रींना सगळे नवीन चेहेरे दिसत होते. कुणी त्यांना ओळखत नव्हतं; ते कुणाला ओळखत नव्हते.

पहातात तों त्यांच्या सेक्शनचा हेडक्लार्कसुद्धां कुणी नवीनच इसम होता !

आतां मात्र अग्निहोत्रींना वेड लागायची पाळी आली.

त्यांनीं पाणी मागितलं.

पाणी पिऊन झाल्यावर ते म्हणाले, 'मला कांहीं कळेनासं झालं आहे. मला 'पार्क्स अॅन्ड गार्डन्स सेक्शनच्या साहेबांकडे घेऊन चला. आणि त्यापूर्वी प्रत्येकानं मला एकेक चिमटा काढून मी झोपेंत नसल्याची खात्री पटवून द्या.'

चिमटे झाल्यावर अग्निहोत्रींची खात्री झाली कीं हें जें चाललं आहे तें सत्य आहे, नि आपण आहोंत हें असत्य आहे ! जी गंमत वाटत होती ती गंमत नव्हती, तर आपणच गंमत बनलों होतों !

त्यांनीं मग एका सज्जन दिसणाऱ्या तरुण इसमाला बाजूला नेलं नि विचारलं, 'तुम्हीं माझी चेष्टा तर करीत नाहीं ना ?'

त्यानं नकार दिला.

'मी स्वप्नांत नाहीं ना ?'

'नाहीं.'

'मला साहेबाकडे घेऊन चल. मी त्यांचे पाय धरतों नि सांगतों, कीं मी झोपल्याबद्दल मला माफ करा.'

अग्निहोत्रींना साहेबापुढं नेण्यांत आलं.

साहेबान त्यांना खुर्ची दिली तेव्हां ते त्याच्याकडे पहातच राहिले.

'बसा ना ! बसा !'

साहेबांच्या विनंतीनुसार आग्निहोत्री खुर्चीवर बसले.

'आपलं नांव ?' साहेबानं विचारलं.

'आग्निहोत्री. दिगंबर बापूजी अग्निहोत्री. इथं मी पार्क्स अॅन्ड गार्डन्स सेक्शनमध्यें काम करतों.'

साहेब किंचित् हंसले नि म्हणाले, 'ठीक आहे. काय काम चाललंय् आज ?'

'प्लॉट नंबर १२७ – एन् वर सार्वजनिक बाग उभारायची आहे त्याबद्दचे कागद––'

अग्निहोत्रींचं बोलणं ऐकून साहेब चाट पडले. हा वेडा दिसणारा इसम अगदीं बरोबर माहिती सांगत होता. ती फाईल त्यांच्याच टेबलावर होती!

'बरं अग्निहोत्री, त्याबद्दल पुढं काय ? ती केस माझ्याजवळच आहे.'

'—ते कागद निकालांत काढण्यासाठीं डिमेलोसाहेबांना एक जुनी फाईल हवी होती.'

'कोणती ?'

'प्लॉट नंबर २४९ – के वरल्या बागेसंबंधीं.'

साहेबांनीं हा नंबर लिहून ठेवला.

'पण साहेब, मी ती फाईल शोधायला रेकॉर्ड सेक्शनमध्यें गेलों नि तिथं मला जरा डुलकी लागली.—'

अग्निहोत्रींनीं त्यापुढची सारी हकीकत साहेबांना सांगितली. साहेब म्हणाले.—

'तुम्हीं कुणाकुणाला ओळखतां इथं ?'

'आपटे हेडक्लार्कनां, डिमेलोसाहेबांना, आज ज्यांनीं पगार वाटला त्या म्हापसेकरनां.'

'थांबा. आपटे हेडक्लार्क केव्हांच रिटायर्ड झाले. डिमेलोसाहेबहि रिटायर्ड झाले.'

'पण केव्हां ?'

'झालीं सात आठ वर्षं !'

'साहेब, मी पायां पडतों तुमच्या. मला कांहीं कळेनासंच झालं आहे. आज मी मॅंजिनींत थोडीशी दारू घेतली—'

'कसं शक्य आहे हें ? अहो, मुंबईत दारूबंदी आहे. इथं राजरोसपणं दारू मिळू शकेल का ?'

'साहेब, तुमच्या पायाची शपथ मी आणि पारडीवाला दुपारीं दोन वाजतां तिथं गेलों नि तीन वाजतां परत आलों. वाटल्यास पारडीवाल्या—'

'अहो, आतां कुठं पावणेतीन होताहेत,—नि तुम्ही म्हणतां तीनला परत आलों ! ... बरं, तुम्हीं म्हापसेकर कॅशरनां ओळखतां ना ? काय नांव त्यांचं ?'

'पी. पी. म्हापसेकर.'

'बरोबर. त्यांना बोलावूं का ?'

'बोलवा. ते कांहींतरी सांगूं शकतील.'

शिपायानं म्हापसेकरांना बोलावून आणलं.

'म्हापसेकर, तुम्ही या बुवांना ओळखतां का ?' साहेबांनीं विचारलं.

'नो सर.'

'अग्निहोत्री, तुम्ही यांना ओळखतां ?'

'नाहीं साहेब.'

'मग आतां काय म्हणालांत ?'

'मी ओळखतों ते म्हापसेकर कॅशर आहेत. त्यांचं नांव पी. पी म्हापसेकर.'

'मग तेच आहेत हे.'

'नाहीं साहेब. हे म्हापसेकर तरुण आहेत. माझ्या ओळखीचे ते म्हातारे होते.'

— आणि मग म्हापसेकरनं प्रश्न सोडवला ! तो म्हणाला. 'साहेब, माझे वडील इथंच होते कॅशर म्हणून. त्यांचं नांव पाडुरंग प्रल्हाद नि माझं नांव प्रभाकर पांडुरंग. हे बुवा माझ्या वडिलांना ओळखत असतील.'

साहेब म्हणाले, 'तुम्हीं त्यांच्या वेळचं रेकॉर्ड काढा नि त्यांत दिगंबर बापूजी अग्निहोत्री अशा नांवाचा कुणी क्लार्क आहे का तें पहा.'

— म्हापसेकर रेकॉर्ड घेऊन आला नि त्यांत पाहून म्हणाला, 'दिगंबर बापूजी अग्निहोत्री हे इथं पार्क्स ॲन्ड गार्डन्स सेक्शनमध्यें क्लार्क होते खरे ! ते रिटायर्ड होऊन चार वर्षं झालीं.'

'कोण ? मी रिटायर्ड झालों ?'

'हो. आज एक तारखेला तुमचं पेन्शनदेखील पाठविण्यांत आलं आहे, अडतीस रुपये चार आणे.'

अग्निहोत्री म्हणाले, 'म्हापसेकर, नीट पहा ! अहो, रिटायर व्हायला मला आणखी सोळा वर्षं आहेत.'

म्हापसेकर म्हणाला, 'चार जानेवारी एकोणीसशें पंचावन्न सालीं तुम्ही रिटायर झालां आहांत.'

'एकोणीसशें पंचावन्न ? म्हणजे ? आज - किती तारीख आहे ? —

एक ऑगस्ट एकोणीसशें एकूणचाळीस नाहीं ?'

'नाहीं. आज आहे एक मे एकोणीसशें एकूणसाठ.'

म्हापसेकरनं साहेबांच्या टेबलावरचं कॅलेंडर दाखवलं तेव्हां अग्निहोत्री म्हणाले, 'हें खरं आहे ?'

'अर्थातच.'

'मग मीं काय वीस वर्षं झोंपलों होतों ?'

'तें तुम्हांला ठाऊक !'

कचेरींतून बाहेर पडतांना अग्निहोत्रींना झाल्या प्रकाराचं आश्चर्य तर वाटत होतंच, पण त्यांना त्याहून आश्चर्य वाटलं तें याचं कीं, गेल्या वीस वर्षांत कचेरीच्या कामांत मात्र कांहींहि सुधारणा झालेली नव्हती, हें कसं ?

कारण प्लॉट नंबर १२७ एन् वर बाग उभारायची केस अजूनहि भिजत पडली आहे, नि माणसांचे नि त्यांच्या पगारांचे घोटाळे अजूनहि पूर्वींसारखेच चालू आहेत !

० ० ०

## २ : अ, ब, क आणि मी

दर शनिवारीं कचेरी सुटली कीं मी त्या हॉटेलांत जाऊन बसतों. हॉटेल खूप छान आहे. तिथं बसल्या बसल्या समुद्र दिसतो. उत्तम तऱ्हेचीं खाद्यपेयं मिळतात आणि मुख्यत: फारशी गर्दी नसल्यामुळं कुणीहि तास न् तास तिथं बसूं शकतो. माझ्या घरीं फारशी जागा नाहीं. स्वस्थपणें बसून कांहीं लिहावं म्हटलं तर जमत नाहीं. माझ्या धाकट्या तिघी बहिणी आणि मोठ्या भावाचा संसार या साऱ्यांची गडबड आमच्या दोन खोल्यांत कोंबून ठेवलेली असते.

शनिवारीं मी त्या हॉटेलांत जातों. एकदोन कप कॉफी घेतों आणि स्वस्थपणें तिथं लेखन करीत रहातों.

त्या शनिवारीं मी असाच लिहीत बसलों होतों. दोनचार परिच्छेद लिहून झाले असतील नसतील तोंच माझ्या कानीं दोघांचा संवाद आला.

एक होता तरुण मुलगा आणि एक होती तरुण मुलगी. दोघंहि दिसायला तरतरीत होतीं, देखणीं होतीं. ती तरुणी त्याला कांहींतरी सांगत होती नि तें कांहीं केल्या त्याला पटत नव्हतं. मग त्यांचे आवाज जरासे वाढले आणि तिकडे माझं लक्ष गेलं.

दोघहि मराठींत बोलत होतीं. आणि त्या हॉटेलांत तें बोलणं मला कांहींसं विशेष वाटलं. मी इथं यायला लागल्यापासून मला महाराष्ट्रीयन माणसं कधींच दिसलीं नव्हतीं. नेहमीं पहावं तर ख्रिश्चन, पारशी, बोहरी, ज्यू आणि क्वचित् प्रसंगीं सिंधी माणसं तिथं दिसत.

दोन तरुण माणस, तींहि देखणी, त्यांतून मराठींत बोलणारीं, तेव्हां साहजिकच माझ्यांतला लेखक म्हणाला, 'ऐक लेका ते काय बोलताहेत तें!'

...तो तरुण म्हणाला, 'मला वाटतं, हें तूं चौथ्यांदा मला सांगत आहेस. पहिल्या वेळीं तुझी त्या दिघेशीं दोस्ती झाली. मीं तुला सांगून पाहिलं पण तुला आपलंच खरं वाटतं. तेव्हां तूं माझ्याशीं बोलायचंहि बंद केलं होतंस. तुला वाटे, त्या ऐटबाज दिघेपुढं मी म्हणजे आपला हा--'

'तसं नाहीं रे पण मला खरंच तो आवडला होता. किती सुरेख बोलायचा. मला त्याच्या बोलण्याचा मोह पडला. आणि माझ्या मनांत त्याला मागणी घालावी असंहि आलं होतं--'

'तें सगळं पाठ झालंय्.' तो तरुण म्हणाला, 'त्या वेळीं तूं मला मागणीबद्दल सांगितलस नि मीं म्हटलं कीं तो दिघे लुच्चा आहे. त्यानं कितीतरी जणींना असं फसवलं आहे. पण तुला तें पटेना! पटलं तेव्हां फार उशीर झाला होता.'

'हो रे, तूं होतास म्हणून मी वांचले त्यांतून. त्यानं जेव्हां माझा हात धरला तेव्हां डोक्यांत प्रकाश पडला. पण तेव्हां मी तुझ्याकडे आलें कीं नाहीं?'

'नाहीं कोण म्हणतंय्? पण त्यावेळीं जशी आठवणीनं आलीस तशीच मग तो दुसरा मेहता भेटला तेव्हां दूर गेलीस...'

त्या दोघांचं बोलणं मला मनोरंजक वाटलं. मीं आतां आणखी लक्ष दिलं; मनाशीं तर्कवितर्क करूं लागलों.

मला मघाशीं वाटलं त्याहून ही मुलगी दिसायला देखणी होती. तिचे केस लांबसडक होते, अंगकांति तेजस्वी होती, डोळे सुरेख होते. जिवणी कांहींशी रुंद होती. अधरोष्ठ किंचितसा ओघळलेला होता. तिच्या एकंदर रूपाकडे बघून आणि त्या तरुणाशीं चाललेलं तिचं संभाषण ऐकून मला

वाटलं, ही मुलगी जेवढी आकर्षक आहे तेवढीच भोळी असावी. हिच्याकडे आकर्षित झालेले तरुण हिच्या भोळेपणाचा फायदा घेत असतील आणि मग ही बेचैन झाली कीं ह्या तरुणाकडे येत असेल.

...आणि हा तरुण कोण असेल ? तिचा प्रियकर ? छे:, तें शक्य दिसत नव्हतं. ती मग त्याला इतर तरुणांबद्दलच्या अशा गोष्टी सांगणार नाहीं... मग हा तिचा कुणी नातेवाईक असेल ? भाऊ ?...तेंहि शक्य नाहीं. नातं असलंच तर हा तिचा मेहुणा असूं शकेल...कीं हा तिचा मित्र आहे ? शक्य आहे...

मी तिच्याकडे असं रोखून पाहूं लागलों तेव्हां तिच्या तें लक्षांत आलं. ती त्या तरुणाला माझ्याबद्दल कांहींतरी बोलली. कारण मग तो तरुण माझ्याकडे पाहूं लागला.

मीं नजर वळवून पुन्हां लेखनांत गढल्याचं नाटक केलं.

--'मी तुला शेवटचं सांगतों-' तो तरुण तिला सांगूं लागला, 'यापुढं तुला ह्यानं फसवलं तर माझ्याकडे रडत येऊं नकोस. मीं त्या भानगडींत मुळींच पडणार नाहीं. तुझ्यामुळं माझं नि दिघेचं वाकडं आलं. मेहताचं नि माझं बिनसलं, तो काळे आणि टिपणीस अजूनहि माझ्याकडे मारक्या म्हशीसारखे पहातात.'

'पण या वेळीं असं कांहींहि होणार नाहीं रे.' ती म्हणाली, 'आणि हा तर तुझ्या ओळखीचा आहे चांगला.'

'म्हणूनच म्हणतों आमची ही चांगली ओळख तशीच राहूं दे. मी ह्या भानगडींत पडणार नाहीं. तुला प्रत्येक जणच चांगला वाटतो. आतांपर्यंत तूं एकतरी खरोखरचा चांगला मनुष्य पाहिला आहेस ?' त्यानं त्राग्यानं विचारलं.

'हो, पाहिला आहे. तो माझ्या शेजारीं बसला आहे आणि मला प्रांजळपणें शिव्या देतो आहे.'

तिनं असं म्हटल्यावर दोघंहि खूप हंसलीं. आलेलं हंसूं दाबण्याचा मीं विफल प्रयत्न केला आणि तो तिच्या लक्षांतहि आला.

जरा वेळानं दोघं निघून गेलीं.

कांहीं काळ मी तिथंच बसून राह्यलों; मनाशीं त्या दोघांबद्दल आराखडे बांधूं लागलों. कांहीं उकल होईना.

✦ ✦ ✦

त्यानंतरच्या एक दोन शनिवारीं मी त्या हॉटेलांत गेलों, पण मला त्या दोघांपैकीं कुणीच दिसलं नाहीं.

एका संध्याकाळीं मी त्या हॉटेलांत शिरलों तर तिथं वेताच्या खुर्चीवर ती बसलेली. एकटीच. फिकट हिरव्या रंगाच्या कपड्यांत. तिच्या समोरचा कॉफीचा रिकामा कप ती बराच काल तिथं थांबल्याचं दर्शवीत होता.

मी समोरच्या टेबलावर बसलों आणि वेटरला कॉफी आणायला सांगून लेखनाला सुरुवात केली. मधून मधून माझी नजर तिच्याकडे जाऊ लागली आणि मी लेखन थांबवून तिच्याबद्दल विचार करूं लागलों.

— ती त्या तरुणाची वाट पहात होती कीं दुसऱ्या कुणाची ? दिघे, मेहतासारख्या कुणाची ? आणि ती कुणाची वाट पहात होती हें समजून घेण्यासाठीं मीहि त्याची वाट पाहूं लागलों.

सारखी दाराशीं जाणारी तिची नजर मीं दोनचारदां पकडली तेव्हां ती प्रथम लाजली. पुन्हां जेव्हां तसंच झालं तेव्हां ती माझ्याकडे पाहून हंसली, मीहि हंसलों.

आपली जागा सोडून ती माझ्याकडे आली आणि म्हणाली, 'मी तुमच्याच टेबलाशीं बसलें तर हरकत नाहीं ना तुमची ? कारण, मला तिथं एकटीलाच बसणं चमत्कारिक वाटतंय् !'

'छे छे ! हरकत कसली ? बसा नं. कॉफी मागवूं ?'

'चालेल.'

मी कॉफी मागवली.

'तुम्हीं लेखन करतां का हो ? मीं बऱ्याचदां तुम्हांला इथं लिहित बसलेलं पाहिलंय्.' तिनं बोलायला सुरवात केली.

'हो. मला हौस आहे लेखनाची.'

'कुठं प्रसिद्ध करतां का हो तुमचं लिखाण ?'

'हो. मासिकांतून.'

'मला बाई अगदीं कंटाळा आहे वाचनाचा. लहानपणीं मला खप हौस होती लिहिण्यावाचण्याची. आतां अगदीं पूज्य.'

माझ्या कल्पनेंत ती जशी होती तशीच ती प्रत्यक्षांत होती. भोळी आणि बडबडी.

'आपलं नांव काय ?' मी तिला विचारलं.

'कां ? त्या दिवशीं तुम्हीं ऐकलंत कां हो आमचं बोलणं ? मीं अगदीं फार नर्व्हस् झालें होते.'

'ऐकलं थोडंफार. पण आपलं नांव नाहीं सांगितलं तुम्हीं ?'

'मला भीति वाटते. तुम्हीं कदाचित् माझ्यावरच गोष्ट लिहाल एकादी, त्या दिवशींच्या आमच्या बोलण्यावरून !'

'लिहिलीच गोष्ट तर मी काय तुमचं खरं नांव लिहिणार आहें ?'

'अं हं ! मी सांगेन तेंच नांव लिहा. माझं नांव 'ब'.'

'ब' म्हणजे बकुल ?'

'तें नाहीं सांगाणर. 'ब' म्हणजे 'ब'.'

'—बरं मग त्या दिवशीं तुमच्याबरोबर जो तरुण होता तो कोण ? 'अ' का ?'

—'अय्या ! त्याची तीच गंमत आहे. त्याला 'अ' च नांव बरोबर. तो आहे माझा मित्र. मित्र म्हणजे मित्रच हं. लहानपणापासून आम्हीं एकत्र वाढलों आहोंत. तुम्हीं लेखक आहांत ना ? मग तुम्हांला मी आमची गोष्ट सांगते. तुम्हीं सल्ला दिलात तरी हवाय् मला. मात्र 'अ' ला हें कांहीं कळतां कामा नये हं.'

'बरं.'

'मी किनई खरं म्हणजे पक्की आहें. मी कुणाला फारसं माझ्याजवळ येऊं देत नाहीं. 'अ' ला वाटतं मी भोळी आहें, बडबडी आहें...'

'यांत 'अ' चं बरोबर; तुमचं चूक !' मीं म्हटलं.

'कसं काय ?'

'कसं काय म्हणजे ? आत्तांच पहा कीं. आपली कांहींहि ओळख नसतांना तुम्हीं खुशाल आपली गोष्ट मला सांगूं लागलांत.'

'एकादे वेळचं सोडा. पण नेहमीं मी पक्की असतें. पण माझ्या सह-वासांत येतात ते सगळे मेले लबाड निघतात.'

यावर मी हंसलों तशी ती म्हणाली, 'तुमच्याबद्दल नाहीं. मीं मागलं सांगतेय्! तर मला वाटलं कीं हा मनुष्य लबाड आहे, कीं मी त्याच्याशीं संबंध तोडून टाकते. आतां तुम्हींच सांगा. अशा वेळीं वाईट नाहीं का वाट-णार? मी 'अ' ला सांगायला गेलें कीं तो म्हणतो, तूं सगळ्यांवर विश्वास टाकतेस – तूं भोळी साहेस, अशी आहेत नि तशी आहेस.'

'मला वाटतं, खरं सांगतों हं,, कीं तुमचे तिसऱ्याशीं जडणारे हे संबंध 'अ' ला पसंत नसायचं कारण ते संबंध निराळ्या दिशेकडे धावणारे असावेत. नुसते संबंध तुटले कीं कुणाला इतकं वाईट वाटत नाहीं, कीं त्यावर इतका वाद होत नाहीं. तुम्हांला ह्या इतर जणांबद्दल कांहीं खास वाटूं लागलं होतं कीं नाहीं?'

'हो!' ती लाजून म्हणाली.

'म्हणूनच 'अ' ला वाईट वाटतं. त्याचं लग्न झालं आहे का?'

'नाहीं.'

'मग एक सुचवूं?'

'सुचवा.'

'तुम्हीं ह्या 'अ' लाच विचारा ना. त्याला तुमच्याबद्दल तसं कांहीं वाटत असेल एकादे वेळीं.'

'पण...पण बघेन मी. त्याबद्दल मी कधींच विचार केला नव्हता. तशीच वेळ आली तर विचारीनदेखील त्याला.'

'आतां नाहीं विचारूं शकणार?'

'नाहीं. सध्यां किनई माझी आणि 'अ' च्या एका मित्राची मैत्री जमली आहे.'

'त्याला आपण 'क' म्हणूं?'

'कम्माल आहे! त्याचंहि नांव 'क' च जमतंय्. तर ह्या 'क' बद्दल सगळी चौकशी करायला मी 'अ'ला सांगितलंय्. 'अ' चा अजून पत्ता नाहीं. हा 'क' मनुष्य वाईट निघाला कीं मला 'अ' ला दाखवायला तोंड उरणार नाहीं!'

'हें सगळं मिटविण्यासाठींच मघाशीं गल्ला दिला कीं तुम्हीं 'अ' ला मागणी घाला.'

'कठीण आहे. पण बोलूं पुन्हां केव्हांतरी.'

'ब' नें घड्याळांत पाहिलं नि ती म्हणाली.

'आतां कांहीं हा 'अ' येत नाहीं. मी जातें.'

'नमस्ते !' मीं म्हटलं

--त्यानंतर खूप दिवस मला कुणी दिसलं नाहीं. 'अ' नाहीं कीं 'ब' नाहीं. एक दिवशीं माझा एक चित्रकार मित्र नि मी त्या हॉटेलांत गेलों. तिथं बोलतां बोलतां मी त्याला ही गोष्ट सांगितली. तो म्हणाला, 'त्यांतल्या 'ब' ला मी इथंच परवां पाहिलं आहे. तिच्या बरोबर एक तरुण होता तो 'अ' असेल किंवा 'क' असेल.'

'किंवा 'ड' हि असेल !'

'नाहीं. 'अ' किंवा 'क' च. त्या दोघांचं खूप वेळ बोलणं चाललं होतं. त्यांत असा कांहींतरी संदर्भ असावा. तूं सांग, हा 'अ' कसा आहे दिसायला ?'

मी 'अ' चं वर्णन केलं तशी तो चित्रकार मित्र म्हणाला, 'मग तो 'क' च. तुझ्या वर्णनाशीं तो जमत नाहीं.'

'दिसायला कसा आहे तो ?'

'खूप छान आहे. खूप रुबाबदारहि. स्वभावानं चांगला असावा असा आपला माझा तर्क आहे.'

हें ऐकून मला आनंद झाला आतां तरी 'ब' लवकर भेटावी आणि तिच्या तोंडून सगळी कथा ऐकावी.

□ □ □

पुढच्या वेळीं ती दिसली तेव्हां कथेचा शेवट समजला पण बारकावे न कळतां, कांहीं मधले धागे उलगडले न जातां !

रविवार होता. मला कचेरींत यावं लागलं होतं. दुपारीं जेवायला म्हणून मी त्या हॉटेलांत गेलों. माझं खाणं होत आलं नि एवढ्यांत 'अ' आणि 'ब' येतांना दिसलीं.

'ब' विशेष खुषींत दिसली. ती सारखी हंसत होती, बडबडत होती. आम्हीं दोघांनीं एकमेकांकडे पाहिलं पण तिनं मुद्दामच ओळख दर्शविली

२९४०५



नाहीं. ती एकटी असती तर छान झालं असतं.

——इतक्यांत समुद्रावरून वाऱ्याचा एक झोत आला. पदरं सावरण्या-साठीं म्हणून तिनं तो हातांत घेतला नि मला तिच्या गळ्यांतलं मंगळसूत्र दिसलं.

——म्हणजे या तीन चार महिन्यांत तिनं सगळ्याचा निर्णय घेतला होता. तिनं 'अ' शीं केलेलं लग्न माझ्या सल्ल्यानुसार होतं का ?

तीं दोघं अशी बसलीं कीं 'अ' ची माझ्याकडे पाठ आली नि 'ब' चं तोंड मला दिसूं शकत होतं.

मीं तिच्याकडे पाहून स्मित केलं तिनं पाणी पिण्याचं निमित्त करून ग्लास तोंडाशीं धरला नि मला प्रत्युत्तर दिलं.

मीं माझ्या गळ्याशीं हात नेला नि तिला ओठांची हालचाल कळण्या-साठीं म्हणालों, 'अभिनंदन !'

तिनं फक्त मान डोलावून आभार मानले.

माझं खाणं संपलं होतं. वेटरनं बिल आणलं. बिल देऊन मी उठलों.

एवढ्यांत 'अ' उठला, कौंटरजवळ सिगरेट आणण्यासाठीं गेला.

तिच्या टेबलाजवळ जातांना मी तिचे शब्द ऐकले, 'उद्यां संध्याकाळीं साडेपांचला या. बोलूं.'

——म्हणजे मला आतां कथेचे मधले धागे मिळणार होते !

बरोबर साडेपांच वाजतां ती तिथं हजर झाली.

'अभिनंदन.' मीं म्हटलं.

'आभार.'

'कालचं अभिनंदन पोंचलं होतं का ?'

'हो–आणि माझे आभार ?'

'पोंचले होते. मला वाटत होतं कीं तुम्हीं मला बोलावून माझी नि 'अ' ची ओळख करून द्याल.'

'तुमची माझी ओळख 'अ' ला नामंजूर आहे. तो बोललाहि मला त्याबद्दल. तो म्हणाला. 'हा लेखक कदाचित् 'ड' होण्याचा विचार करीत असेल.'

'मग राहिलं माझं बोलणं. तुम्हीं आज भेटलांत हें छान झालं. आतां

सांगा, ‘अ’ला मागणी घालण्याचा माझा सल्ला बरोबर होता कीं नाहीं ?’

‘होता आणि नव्हताहि. ‘अ’ चं नि माझं पति-पत्नी म्हणून पटणं अशक्य होतं’

‘मग त्याच्याशीं लग्न कां केलंत ?’

‘कुणी ? मी ? अहो, मी सौ. ‘क’ आहें ‘अ’ नाहीं. मी आणि ‘अ’ काल बरोबर आलों म्हणून तुम्हांला वाटलं असेल. काल आम्हीं तिघे इथं जमणार होतों नि मग सिनेमाला जाणार होतों. ‘क’ यायला उशीर झाला मी माहेराहून आले होते.’

मी आश्चर्यचकित झालों.

‘मग माझा सल्ला बरोबर कसा होता ?’

‘अहो ‘अ’ कांहीं केल्या ‘क’ बद्दलचा आपला निर्णय मला सांगेना. ‘क’ त्याचा मित्र आणि माझी सगळी भिस्त ह्या ‘अ’ वर. शेवटीं मीं त्याला म्हटलं, ‘हें पहा ‘अ’, तूं जर ‘क’ बद्दल कांहीं निर्णय दिला नाहींस तर मी तुलाच मागणी घालीन, आणि तुझा हात धरून लग्नाला उभी राहीन.’ तेव्हां तो घाबरला. त्यानं मग चौकशी केली नि मला म्हटलं, ‘ही तुझी निवड बरोबर आहे.’ आणि मी झाले सौ. ‘क’.

‘म्हणजे गोष्ट संपली. ?’

‘बरोबर. आतां तुम्हीं लिहा ही गोष्ट. नांवं हींच ठेवा. अ, ब आणि क’

मी कॉफी मागवली. कॉफी घेऊन झाल्यावर ती म्हणाली, ‘मी जाते. नमस्ते. आतां आपली भेट होणं कठीण दिसतं. भेट झाली तरी ओळख नाहीं हं दाखवायची ! –’

‘बरं. पण तुमचं नांव सांगा कीं, नुसतं ‘ब’ म्हणजे !’

‘सॉरी. नांवाशीं काय करायचंय् ? मी विचारलं होतं, कधीं तुमचं नांव ? तुम्हांला मी ओळखते ‘लेखक’ या नांवानं. अच्छा.’

–आणि आपली पर्स हलवीत ‘ब’ निघून गेली.

मीं पुढ्यांतले कागद ओढले नि लिहायला सुरुवात केली.

‘दर शनिवारीं कचेरी सुटली कीं.........’

## ४ : यमराजाची स्वारी

थिएटर माणसांनीं फुलून गेलें होतें, 'विश्वकल्याण नाटक–मंडळी 'चें 'सती सावित्री ' हें नाटक आणि तेंहि वटपौर्णिमेच्या दिवशीं लावलेलें. 'सावित्री ' चें काम करणारी मिस् मैनावती हें आणखी एक आकर्षण. तिकिट मिळालें नाहीं म्हणून कित्येकजण परत गेले. अर्थात् परत गेले ते घरींच गेले. समोरच्याच थिएटरमध्यें लागलेल्या 'आत्मकल्याण नाटकमंडळी ' च्या 'जन्मोजन्मीं हाच पति ' ह्या नाटकाला गेले नाहींत !

'विश्वकल्याण नाटक–मंडळी ' आणि 'आत्मकल्याण नाटक–मंडळी ' या दोन्ही मंडळयांतून विस्तवहि जात नव्हता. 'एकमेकांचीं नाटकें कशीं पडतील इकडे लक्ष देण्यापेक्षां स्वतःचीं नाटकें नीट बसवलीं असतीं तर गंधर्व कंपनीलाहि पब्लिक विसरला असता, ' असें दोन्ही मंडळयांचे म्हातारे हितचिंतक म्हणत. 'विश्वकल्याण ' नें 'सती सावित्री ' बसवायला घेतलेलें कळलें रे कळलें, कीं 'आत्मकल्याण ' नें आपल्या लेखकाला त्याच कथानकाचें 'जन्मोजन्मीं हाच पति ' लिहायला सांगावें. 'आत्मकल्याण ' नें 'कल्याण खजिना ' निवडला, कीं विश्वकल्याण ' च्या बोर्डावर 'सुभेदाराची सून ' दिसूं लागे. इथवरहि ठीक होतें; भांडणाला खरी सुरुवात झाली ती मिस् मैनावतीच्यामुळें.

ही मैना पूर्वी ' आत्मकल्याण ' च्या ' जन्मोजन्मीं ' मध्यें ' सती सावित्री ' चें काम करायची मैनेची ' सावित्री ' लोकांना आवडली होती. ' जन्मोजन्मीं ' नें ' आत्मकल्याण ' ला जो पैसा मिळावून दिला तो मैनेमुळें. परंतु मंडळींत भांडणें सुरू झालीं. ' सत्यवाना ' चें काम करणारा बाबू पेठे आणि ' यमा ' चें काम करणारा अण्णा महाजन--दोघांनाहि ही ' सावित्री ' हवी होती. या भांडणांत मैना उडून गेली ती ' विश्वकल्याण ' च्या गच्चीवर जाऊन बसली ! ' सती सावित्री ' मध्यें ती ' सावित्री ' चें काम करूं लागली. दोन मंडळ्यांचें तंटे विकोपाला गेले.

खूप दिवसांनंतर ही संधि प्राप्त झाली होती. समोरासमोर नाटकें आणि एका कंपनीची हिरॉइन दुसऱ्या कंपनींत काम करायला लागलेली. ' सती सावित्री ' चें तिकिट मिळत नव्हतें, तर ' जन्मोजन्मीं ' ला प्रेक्षक मिळत नव्हते !

पहिली घंटा झाली. पडदा उघडला गेला. नाटक सुरू झालें.--अर्थातच ' विश्वकल्याण ' चें. कारण, ' आत्मकल्याण ' ला प्रेक्षकच नव्हते !

' विश्वकल्याण ' चे दिग्दर्शक श्री. कावळे अर्थात् मास्टर संतोष खुषींत होते. कित्येक वर्षांनीं त्यांनीं ही चुरस जिंकली होती. ' या विजयाची माला आपल्या गळ्यांत घालणारी मिस् मैना--ही मैना खरोखरीचा हार आपल्या गळ्यांत घालील का ? . . . ' या विचारानें संतोषांच्या अंगावर नाजुक कांटा उठला

पहिला अंक संपला. नाटक कल्पनेंबाहेर रंगलें होतें. एवढ्यांत राणे धांवतधांवत मास्टर संतोषांकडे आला.

' कावळेसाहेब ! '

' तुम्हांला किती वेळां सांगितलंतय् मीं, कीं रंगभूमीच्या परिसरांत मला ' संतोष ' म्हणा ! ' मास्टर संतोष खेंकसले. ' काय झालं ? '

' आपले भुस्कुटे आले नाहींत अजून ! तिसऱ्या अकांत एंट्री असली म्हणून काय झालं ? एव्हांपर्यंत तरी--'

' काय ? ' यमा ' चा पत्ता नाहीं ? मला येऊन काय सांगतां मग ? धांवत जाऊन घेऊन या त्याला ! '--मास्टर संतोषनीं फर्मावलें.

छे:! आयत्या वेळीं हें नसतें लफडें उभें राहिलें होतें. दुसरा अंक सुरू झाला तरी भुस्कुटयांचा पत्ता नव्हता. संतोष संतापानें लाल झाले. 'यमा'ला आणायला त्यांनीं भराभर माणसें पिटाळलीं.

'साला खरा यम नको तेव्हां येतो, आणि ह्या यमाला बोलावणं धाडावं लागतंय् !' ते सारखे पुटपुटत होते. या घडीला त्यांना जरा देवानें विचारलें असतें, 'तुला काय हवें' म्हणून तर त्यांनीं (प्रॉम्प्टिंगशिवाय) चटकन् सांगितलें असतें, 'मला यम तरी दे, नाहींतर मरण तरी दे. माझी अब्रू जायची वेळ आली आहे.'

पण एवढ्यांत भुस्कटे आलाच.

'तुम्हीं कोण समजतां स्वतःला?--' मास्टर संतोषनीं आपल्या नांवाला मुळींच न शोभणाऱ्या आवाजांत भुस्कुटयाला प्रश्न केला. 'मुकाटयानं मेकप् करून घ्या, दुसरा अंक संपत आलाय्.'

'मला काल रात्रींपासून ताप येतोय्. मला उभंहि रहावत नाहीं. कसाबसा आत्तां येतोंय् मी.' भुस्कुटे एका दमांत म्हणाला आणि मटकन् खालीं बसला.

'बरं बरं ! विश्रांति घ्या आतां एंट्री येईपर्यंत. डायलॉग पाठ आहेत ?' संतोषनीं विचारलें.

'आहेत.'

हरकत नव्हती. अब्रू वांचली होती.

दुसरा अंक संपला. इंटरव्हलनंतर तिसरा अंक सुरू झाला.

'यमा'चा मेकअप् चढवून भुस्कुटे विंगमध्यें बसला होता.--अंगांत खूप ताप, डोळे लाल झालेले, अशा अवस्थेंत. 'सत्यवाना'नें कुऱ्हाड टाकली कीं विकट हास्य करीत एंट्री घ्यायची, एवढेंच त्याच्या ध्यानांत होतें. त्याचें सर्व लक्ष 'सत्यवाना'च्या हातांतल्या कुऱ्हाडीकडे होतें.

अंगांतला ताप चढतच होता. ह्या तापांतून आपण वांचू कीं आपल्याला न्यायला खरा यम येईल...

भुस्कुटयाच्या मनांत हा विचार आला आणि त्याच क्षणीं त्याच्या खांद्यावर एक पंजा पडला. भुस्कुटयानें मागें वळून पाहिलें.--आणि त्याची बोबडीच वळली !

'माझ्याबरोबर चल मुकाट्यानं ! ' त्या पंज्याच्या मालकानं घोगऱ्या आवाजांत म्हटलं, ' ओळखलंस मला ? '

' मी—मी—'

' म्यांव् म्यांव् नको ! चल लौकर. मी यम आहें.—तुमच्यासारखा खोटा नव्हे ! खरा. '

धाडकन् आवाज झाला आणि भुस्कुटे खालीं पडला. त्याचा तो काळाशार उघडाबंब देह अस्ताव्यस्त पडला.

' काय झालं, ' ' काय झालं, ' करीत सगळेजण त्याच्याभोंवतीं जमले.

पलीकडल्या विंगमध्यें संतोष होते. त्यांनीं हा प्रकार पाहिला आणि ते धांवतच पुढें झाले. आणखी एक पान झालें, की यमाची एंट्री होती,

' काय झालं ? त्याला उठवा आधीं. साले आयत्या वेळीं दगा देतात. !'

' बहुतेक खलास झालाय्. '

' नाहीं. धुगधुगी दिसतेय् थोडी. '

' यम मेला, ' ' यम मेला ' म्हणून एकच ओरड झाली. बाहेर स्टेजवर ' सावित्री ' ला आणि ' सत्यवाना ' लाच फक्त कशाची कांहीं दाद नव्हती. विंगमध्यें ' यम ' दिसला नाहीं म्हणून ' सावित्री ' ' सत्यवाना ' च्या कानांत कांहींतरी पुटपुटली आणि स्वतःचे संवाद बोलूं लागली. ' सति सावित्री ' मधले आणि मग वेळ काढण्यासाठीं ' जन्मोजन्मीं ' मधलेसुद्धां.

भुस्कुट्याच्याभोंवतीं गर्दी झाली. काय झालें असावें याची चर्चा सुरू झाली.

' मी सांगतों. ' डायरेक्टर म्हणाले.

' कावळ्या ! तूं नको ! मी सांगतों. मला ठाऊक आहे सगळं. ' डायरेक्टर मागें खेंचला गेला.

मंडळींत इतक्या वर्षांत कुणी कधीं मास्टर संतोषांचा असा अपमान केला नव्हता. ते संतापानं लाल झाले. ' तूं कोण साल्या ? ' ते ओरडले.

' मी यम आहें.—खरा यम. ' यमानें म्हटलें.

त्या काळ्या कुळकुळीत धिप्पाड आकृतीकडे पाहून सगळ्यांच्या जिभा आंत ओढल्या गेल्या. ' कावळ्या. तुला कळलं का ? '—त्या आकृतीनें डायरेक्टरला विचारलें.

'क्---कळलं---कळलं.'

'तुझ्या यमाला न्यायला आलोंय् मी!'

एव्हांपर्यंत सगळेजण मागल्या दारानें पसार झाले होते. इतक्यांत यमानें त्यांची मानगूट धरली. 'कावळचा, माझ्यावर विश्वास ठेवत नसलास तर तुलाच नेऊं का बरोबर?'

'प्---पण---पण---'

'येतोस का बोल? आणि कावळ्या, ह्या भुस्कुटचाला तूं यम केलास? दिसतोय् का तो माझ्यासारखा?'

'न्-नाहीं. प्-पण---'

'पण काय?'

'न्---नाटक---नाटकाचं---क्-कसं---व्हायचं?'

'आजचा दिवस यमाचं काम मीच करतों. 'सावित्री' थांबली आहे ना?'

'त्---त्---प्---प्---'

'चूप. मी हें काम केलेलं आहे. खऱ्या 'सावित्री'शीं बोललोंय् मी, समजलास?'

एका फटक्यानें संतोषला कालीं पाडून यम स्टेजवर घुसला.

'आपण कोण आहांत महाराज?' सावित्रीनें विचारलें.

'मी यमधर्म.'---यमानें उत्तर दिलें.

'काय हवंय् आपल्याला? आपण इथं येण्याचं प्रयोजन?' सावित्रीनें दुसरा प्रश्न केला.

'मी भुस्कुटचाला न्यायला आलों आहें---तुमच्या ह्या भिक्कार नाटकांतल्या यमाला.'

प्रेक्षकांनीं शिटचा वाजवल्या, आरडाओरडा केला. सावित्री भयचकित नजरेनें यमाकडे पाहूं लागली. आडवा 'सत्यवान' ताडकन् उठून बसला.

'महाराज, आपली कांहींतरी चूक होते आहे. आपण माझ्या पतिराजांनाच न्यायला आलेले दिसतां' अजून सावित्रीनें धीर सोडला नव्हता. नंतर ती हळूच यमाला म्हणाली, 'शू ऽ ऽ! नाटकांतलं बोला!'

'होय सावित्री, तुझ्या पतीला न्यायला मी आलों आहें. देवाधिदेव जो इंद्र, त्याच्या दरबारांत--'

हें वाक्य वेगळेंच होतें. ते 'सती सावित्री' मधलें नव्हतें, कीं, 'जन्मोजन्मीं' मधलेंहि नव्हतें. त्याला अडवीत सावित्री म्हणाली, 'महाराज, प्राणाहून प्रिय असलेल्या माझ्या पतीचे प्राण हिरावून घेऊन आपल्याला काय मिळणार आहे ?'

'सावित्री, तूं, सावित्री जें बोलली तें बोलणार नसलीस तर माझं तरी--'

'नाटकांतलं--नाटकांतलं.' सावित्री हळूच कुजबुजली.

प्रेक्षकांना कांहींतरी वेगळेंच भासूं लागलें. अर्धवट उठलेला 'सत्यवान आपल्या दोन्ही पायांवर उभा राहिला. 'सावित्री 'हि आतां धीर सोडूं लागली. हा नवीन शिरलेला नट चुकतोय्. त्याला आंतून प्रॉम्टिंग मिळत नाहीं कीं विंगमधले दिग्दर्शक...छे:! विंगमध्यें कुणीच नव्हतें. फक्त आदळआपट ऐकूं येत होती.

'सावित्री' नें विंगच्या दिशेनें पाऊल टाकलें आणि नाटक सांवरण्याचा अखेरचा प्रयत्न केला.

'माझ्या पतींना खरोखरच जीवदान दिलंत काय महाराज? जन्मोजन्मीं हाच पति मिळावा अशी माझ्या मनांतली प्रार्थना ऐकलीत काय आपण ?'

'हें--हें बोलली होती सावित्री ? ऐक मैने ! --'

'चूप ! तुम्ही कोण हो टिकोजीराव ? नाटकाचा निक्काल लावलात तुम्हीं ? आमचे भुस्कुटे म्हणजे--'

'मैने, आवाज चढवूं नकोस ! मीं कोण टिकोजीराव सांगूं ? मी यम आहें. प्रत्यक्ष यम ! नाटकांतला यम नव्हे ! खरा यम ! भुस्कुटेला न्यायला आलों होतों, एवढ्यांत तुमचा कावळा म्हणाला, 'आल्यासरखं नाटक पुरं करून जा.' पण तुझी 'सावित्री' पाहिली आणि असा संताप आला...कुठं ती सावित्री आणि कुठं तूं ? समोरच्या नाटककपनींतल्या अण्णा महाजनला कायावाचामनें लग्नाआधीं वरणारी तूं मैना--'

'यम्या !'

'तोंड संभाळ ! नाहींतर तुलाहि घेऊन जाईन !'

'कुणाला दम देतोस ?'

'तुला घेऊन जाईन तरच यम !'

एव्हांपर्यंत प्रेक्षकांतली गडबड थांबली होती. यमानें त्यांच्याकडे पाहिलें आणि म्हटलें, 'चूप ! खबरदार कुणी हसेल तर. आणि ए सत्यवान....'

मागल्या बाजूनें पळणारा 'सत्यवान' उभा राहिला.

'तुला जन्मोजन्मीं ही बायको हवी आहे ?' यमानें विचारलें.

'न्—नको ! मी आपला—तुमच्यासारखा खरा नाहीं.'

विंगमध्यें संतोष साहेब आले होते.

'ए कावळ्या.'—यमानें हांक मारली 'इकडे ये नि ह्या मैनेला मी कोण आहें तें सांग.'

संतोष पुढें म्हणाले, 'महाराज, आपण यमधर्म आहांत. मला जीवदान द्या.'

'हूं ! त्या मैनेला सांग.'

'मला कांहींएक ऐकायचं नाहीं.'

'तर मग मी तुला घेऊन जाणार. कावळे, तो भुस्कुटचा काय म्हणतोय् ?'

'अजून बेशुद्ध आहे तो'

'ठीक. डॉक्टरला बोलवा. तो बरा होईल. त्याच्याऐवजीं ह्या कुरेंबाज मैनेला नेतों मी.'

प्रेक्षागार पूर्णतः रिकामें झालें होतें. इतक्या रात्रीं रस्त्यावर फिरणाऱ्या चुकार पोलिसाला कुणीतरी बातमी दिली. तो डोळे चोळीत थिएटरमध्यें आला.

'काय गडबड आहे ?'—त्यानें पहिला प्रश्न केला.

'हे—हे यमधर्म.' कावळे सांगूं लागले.

'हा कोण आहे ?' यमानें कावळ्यांना विचारलें.

'हा पोलिस आहे.'

'पोलिस म्हणजे ?' यमानें विचारलें.

'साला पिऊनबिऊन आलाय् का ?' पोलिसानें यमाकडे पाहून म्हटलें.

कावळयांनीं पोलिसाला हळूच सगळी गोष्ट सांगितली. त्याची बोबडीच वळली.

'मी–मी जातों.' पोलिस यमाच्या पायां पडून जायला निघाला.

यमानें मैनेचा हात धरला आणि तिला घेऊन तो काळोखांत दिसेनासा झाला.

मागाहून आलेल्या डॉक्टरांनीं सर्वांना तपासलें. भुस्कुटे शुद्धीवर आला. डायरेक्टर संतोषहि शुद्धीवर आले. स्टेजवर पडलेला 'सत्यवान' आणि थिएटरच्या दाराजवळ पडलेला पोलीस सगळयांना तपासून झालें. पांचपन्नास इंजेक्शनें देऊन डॉक्टरांनीं नाटकाचा गल्ला खिशांत घातला.

✦ ✦ ✦

'इकडे कुणी पोलीस आलाय् ?' – 'आत्म कल्याण नाटक–कंपनी'चा मनुष्य 'विश्वकल्याण'च्या थेटरांत चौकशी करीत आला.

'कशाला हवाय्! आत्तांच शुद्धीवर येतोय् तो!'

'कंप्लेंट द्यायची आहे. आमच्या कंपनींतले कपडे आणि पैसे चोरीला गेले आहेत.'

'किती कपडे गेले ?'

'यमाचा सगळा ड्रेस आणि पांचपन्नास रुपये.'

'कुणाचा संशय आहे ?'

'कंपनींत यमाचं काम करणारा अण्णा महाजन पळून गेलाय्.'

० ० ०

# ५ : गलीव्हर

घड्याळांत सहा वाजले तेव्हां मीं हेडक्लार्क कानड्यांकडे हळूच नजर टाकली. कचेरी सुटून अर्धा तास होऊन गेला होता तरी त्यांची समाधी भंग पावली नव्हती. त्यांचं काम जोरांत चालू होतं. दुपारचा राग अजूनहि त्यांच्या चेहऱ्यावर ठाण मांडून होता.

वास्तविक इतकं रागावण्यासारखी कांहीं चूक मीं केली नव्हती. आमच्या कचेरींत अशा चुका नकळत घडत असतात, त्या मुकाट्यानं गाजावाजा त करतां सुधारल्याहि जात असतात. पण मीं रजेसाठीं केलेला अर्ज हेडक्लार्कना आवडला नव्हता आणि त्याचा राग काढण्यासाठीं कांहीं ना कांहीं कारण शोधणं त्यांना क्रमप्राप्तच होतं. माझ्या चुकीमुळं त्यांना ती संधि मिळाली होती नि त्यांनीं तिचा (अ) योग्य उपयोग करूनहि घेतला होता.

मीं पुन्हां कानड्यांकडे नजर टाकली नि त्यांच्या रागाचा अंदाज घेतला; कचेरी आतां सोडतां येईल कीं नाहीं हें कळायला तोच एक मार्ग होता.

आपल्यावर खिळलेली माझी नजर ओळखून त्यांनीं घड्याळाकडे पाहिलं नि मला म्हटलं, ‘ सप्तर्षी, जा आतां. अधिक थांबून कांहीं दुपारची चूक सुधारतां येणार नाहीं. पुन्हां मात्र अशा चुका करून रजेचा अर्ज पाठविलात तर मी तो सरळ फाडून टाकीन. ’

कांहीहि न बोलतां मीं माझं टेबल आवरलं नि दुसऱ्या दिवशीं करायच्या कामाचा आढावा घेत कचेरीच्या बाहेर पाऊल टाकलं.

बस स्टॉपजवळ येईपर्यंत मला सारखी ती चूक आठवत होती, कानड्यांचे बोचरे शब्द आठवत होते नि वाटत होतं, आपलं आयुष्य शून्य किंमतीचं वाटत आहे ! कानड्यांसारख्या कुणाहि मूर्खानें आपल्याला चाहेल तें बोलावं, आपला वाटेल तसा अपमान करावा म्हणजे काय ? ही नोकरी कसली ? मिळणारा पगार कसला ? यापेक्षां रस्त्यावरला भिकारी सुखी आहे. हा गजरे विकणारा पोरगा सुखी आहे, हा बस ड्रायव्हर सुखी आहे—

माझा संताप अनावर झाला. कानडे समोर दिसले असते तर त्यांना मी याचा जाब विचारला असता नि शेवटीं म्हटलं असतं, ' कानड्या—'

माझ्या तोंडांतली अर्वाच्य शिवी तशीच अडखळली.

—कुणीतरी माझ्या पाठीवर हात ठेवला होता नि मला प्रश्न केला होता, ' काय सप्तर्षी, ओळखलंस का मला ?'

कांहीं क्षण असेच निघून गेले. डोक्यांतला राग नाहींसा व्हायला तेवढा वेळ हवाच होता. जराशानं मी त्या थुलथुलीत शरीराच्या इसमाला ओळखलं. तो बेबी रेळे होता.

बेबी रेळे ! कॉलेजांत असतांना होता तसाच गलेलठ्ठ नि हंसतांना हिरड्या दाखविणारा.

आमच्या कॉलेजांत दोन रेळे होते. एक होता एस. पी. रेळे नि दुसरा बी. बी. रेळे, ह्या दुसऱ्याला आम्हीं गंमतीनेंच बेबी रेळे म्हणायचे.

' ओळखलंस का मला ?' त्यानं माझ्या पाठीवर पंजा रोवून पुन्हां विचारलं.

' अर्थात्. तूं बेबी रेळे ना ?'

मीं असं म्हटल्यावर तो हिरड्या दाखवीत नि शरीर गदगदून हलवीत हंसला म्हणाला, ' बस्स ! तूं मला ओळखलंस याची खात्री पटली. '

' इकडे कुठं तूं ?' मी त्याला विचारलं, ' इथं फोर्टमध्येच नोकरीला असतोस कीं काय ?'

' छे : नोकरीला कुठंच नाहीं. '

' म्हणजे ?'

'म्हणजे काय ? नोकरी सुटून दोन महिने झाले. अर्ज केले आहेत दोनपांच ठिकाणीं. बघायचं आतां. ह्या दिवसांत कुठं नोकरी मिळायला ?'

तो हें इतक्या तटस्थतेनं म्हणाला कीं त्यानं बरेचसे नकार पचविलेले दिसले.

मीं उगाचच म्हटलं, 'त्याचं कांहीं सांगतां येत नाहीं.'

'तें तर झालंच. आपण आपलं अर्ज करीत रहायचं. आज इथं इंटरव्ह्यूला आलों होतों एका ठिकाणीं.'

'कसा काय झाला इंटरव्ह्यू ? एनी होप्स ?'

'अगदीं शून्य. आम्हांला अकरापासून जें थांबवून ठेवलं तें आत्तां सोडलं. जवळ जवळ शंभर जणांना बोलावलं होतं. केव्हां कुणाला बोलावतील नेम नव्हता. चहाला का कशाला बाहेर जातां आलं नाहीं. आपण चहाला म्हणून जायचं नि आपलं नांव पुकारलं जायचं म्हणजे खलास. पांच वाजतां माझा नंबर लागला. दिवसभर कंटाळलों होतों. पोटांत पाण्याचा थेंब नव्हता. कांहीं उत्तरंच सुचेनात. इंटरव्ह्यू अगदीं होपलेस् झाला. कांहीं आशा नाहीं. आतां दुसऱ्या ठिकाणची वाट पहाणं !'

त्यानं आपल्या पँटच्या खिशांत हात घातला. नि जराशानं रुमाल बाहेर काढला. त्यानं बहुधा तेवढ्यांत आपलं पाकीट असल्याची खात्री करून घेतली होती. मग सहज असं तो म्हणाला. 'फार तहान लागली आहे. चहाला येणार ?'

'नको.'

'अरे चल, इतक्या वर्षांनीं भेटतो आहेस. आणि मला कुणीतरी बरोबर हवं आहे चहाला एकट्यानं चहा प्यायला आवडत नाही मला.'

दोन महिने नोकरी नसली कीं मनुष्य किती लाचार होतो, कुठली ओळख दाखवतो कांहीं सांगतां येत नाही. माझ्या पाठीवरला त्याचा पंजा मला सांगूं लागला कीं त्याला चहाचे पैसे द्यायला कुणी तरी हवं होतं.

मी त्याच्याबरोबर निघालों.

आम्हीं एका हॉटेलांत शिरलों. तिथं जाईपर्यंत मी माझ्या जवळच्या पैशांचा हिशेब केला होता नि रेळेसाठीं रुपयाभर खर्च करायचं ठरवलं होतं.

टेबलाशीं बसल्यावर रेळेनं पदार्थांची यादी वाचली नि मला विचारलं,

'तूं चहाच घेणार नुसता कीं कांहीं खायला घेशील ?'

माझा पहिला अंदाज बरोबर ठरला होता ! 'मी नुसतां चहाच घेईन. तूं खा वाटलं तर. दिवसभर कांहीं खाल्लं नाहींस तूं.'

त्याचा डाव ओळखल्याचं मीं जराहि दर्शवलं नाहीं.

त्यानं आपला पंजा पुन्हां माझ्या हातावर दाबला नि म्हटलं, 'तूं जर कांहीं घेतलं नाहींस तर मीहि घेणार नाहीं.'

कांहींहि न बोलतां मीं वेटरला बोलावलं नि चहा आणि केक आणायला सांगितलं.

वेटरनं केकची बशी टेबलावर ठेवल्याबरोबर रेळेनं त्यातला मोठ्यांतला मोठा केक उचलला नि त्याच्या भोवतालचा कागद काढायला सुरवात केली.

मी त्याच्याकडे कुतुहलानं बघत होतों.

त्यानं तो केक संपवला नि लगेच दुसरा उचलला. मी कांहीं खात नव्हतों हें त्याच्या लक्षांतहि आलं नव्हतं.

चारपांच केक खाल्ल्यावर त्यानं पाण्याचा ग्लास तोंडाला लावला नि तो रिकामा करून खालीं ठेवला.

पुन्हां हिरड्या दाखवत तो हसला नि म्हणाला, 'आतां जरा बरं वाटलं बघ. अरे रोज दुपारीं जेवायची संवय. आज जीव जातोय् कीं रहातोय् असं होऊन गेलं होतं.'

त्याचं तें अधाशासारखं खाणं पाहून मला दया आली. वाटलं, महिना संपायला अवकाश आहे, माझ्या खिशांत पैसे आहेत हें बरं झालं. हा जर आणखी दहाबारा दिवसांनीं भेटला असता तर त्याला पोटभर खायला घातल्याचा आनंद मला लाभला नसता. आज जर मी ह्याला भेटलों नसतों तर ह्यानं आपली भूक चण्यांवर भागवली असती !

तो म्हणाला, 'आणखी कांहीं मागवायचं आहे का !'

'मला नको आहे.'

'घे रे. इथं समोसे फार चांगले मिळतात नि ह्या गोड केक्सवर लगेच चहा बरा लागायचा नाहीं. कांहींतरी तिखट हवं.'

त्यानं वेटरला बोलावून समोसे आणायला सांगितलं.

आतां मात्र मला त्याची थोडोशी चीड आली. माझ्या खिशांत पैसें असतील असं समजून हा खुशाल खात होता, मलाच आग्रह करीत होता. जरा वेळानं हा माझ्याकडे कांहीं पैसे उसने मागेल तेव्हां त्याला स्पष्ट नकार द्यायचा असं मीं ठरवून टाकलं.

त्यानं मग मला विचारलं, ' तूं कुठं असतोस नोकरीला ?'

मीं आमच्या कंपनीचं नांव सांगितल्यावर तो म्हणाला, ' म्हणजे खाजगीच दिसतेय् नोकरी. कंपनी बरी आहे का ? '

' चांगली आहे. '

' पगार किती मिळतो ?'

त्याला त्याच्यांतला नि माझ्यांतला फरक फार जाणवूं नये म्हणून मी माझ्या पगारांतले पन्नास रुपये कमी करून त्याला म्हटलं, ' मिळतात दोनशें रुपये. '

' म्हणजे फारच कमी आहे रे !--नि किती वर्षं नोकरी झाली ?'

' झालीं चारपांच वर्षं !'

' गुड् गॉड ! आणि दोनशेंच फक्त ?'

त्यानं असं म्हटलं कीं जणुं कांहीं त्याला पांचसातशें रुपये पगार होता !

मला त्याचं बोलणं आवडलं नाहीं.

मीं मुद्दामच म्हटलं, ' हल्लीं मिळताहेत कुठं नोकऱ्या ? तूंच पहातो आहेस ना, काय ठंचाई आहे नोकऱ्यांची ती ! त्या मानानं आय् अॅम् व्हेरि लकी. दर महिन्याला दोनशें का होईना, पगार हातीं पडतोय्. '

रेळेला माझ्या नोकरीबद्दल, पगाराबद्दल सांगतां सांगतां मी मोठा होऊं लागलों. मला वेळच्या वेळीं मिळणारा पगार, कायम नोकरी, पगारवाढ, पुढंमागं हेडक्लार्कची जागा मिळण्याचा संभव... रेळेच्या मानानं मी सुखी होतों. फार सुखी होतों.

... माझ्या बुटाएवढचा उंचीच्या रेळेकडे मीं पाहिलं नि मला त्याची दया आली. दोन महिने बेकारी काढणारा थुलथुलीत देहाचा तो रेळे... रस्त्यांत ओळखीचे चेहरे शोधणारा... त्यांच्याकडे चहा मागणारा... त्यांच्या पैशानं लाचारीनं केक्स खाणारा...

मीं त्याला विचारलं. ' लग्न-बिग्न कांहीं केलं आहेस का ?

' हो तर ! ' तोंडांत समोसा ढकलीत तो म्हणाला, ' दोन मुलं आहेत मला. एक मुलगा, एक मुलगी. '

' आणखी कोण आहे घरीं ?'

' आई आहे. वडील गेल्या वर्षींच वारले. '

' मग घरचं तुलाच बघावं लागत असेल. का आहे कुणी मोठा भाऊ ? मी त्याच्या परिस्थितीचा अदाज घेऊं लागलों.

' नो बडी ! मी एकटाच. '

–नि तो पुन्हां सगळं शरीर हलवीत हसला.

मला त्याची कींव आली. मी जर त्याच्या जागीं असतों तर एव्हांना वाळून गेलों असतों. डोक्यावर एवढ्या कुटुंबाचा बोजा ठेवून किंचित्हि हंसू शकलों नसतों.

. . . अशा माणसांच्या बायकांचे फार हाल असतात. नवऱ्यानं बेजबाबदारपणें झुगारलेला संसार सावरतां सावरतां त्या टेकीला येतात. मला रेळेच्या बायकोची दया वाटूं लागली. ती कसा संसार ओढत असेल ? घरभाडं, दूधवाला, वाणी, मुलांचीं आजारपणं . . .

गिरगांवांत ट्रॅमनं जातांना मी एकदोनदां ह्या रेळेला रस्त्यावरल्या एका इमारतीच्या गॅलरींत नाईटलेंग्यांत उभा राहिलेला पाहिलं होतं तो जर तिथं रहात असेल तर त्या जागेचं भाडंच पाऊणशें ऐशीं रुपये असेल. दोन मुलांपुरतंच दूध म्हटलं तरी महिना वीस पंचवीस रुपये हवेत... वाण्याचे साठ ते सत्तर रुपये...मी मनांतल्या मनांत आंकडे मांडूं लागलों...

छे: ! ह्या थुलथुलीत देहाच्या, हिरड्या दाखवीत हंसणाऱ्या रेळेची परिस्थिती फार कठीण होती ! मी फार सुखी होतों मग. दो...न...शें...पन्ना...स...पगार घेणारा मी...

मी आणखी मोठा झालों.

...माझ्याकडे बघतांना रेळेची मान मोडायला आली. तो छोटासा रेळे...त्याची छोटी पत्नी...दोन छोटीं मुलं...तो संसार...

मीं खालीं वांकून रेळेच्या कुटुंबाला तळहातावर घेतलं.

ह्या लहानशा रेळेसाठीं मला कांहींतरी करायला हवं होतं. मी एकट्यानंच इतकं मोठं होणं चांगलं नव्हतं. आपल्या उत्तम स्थितींत आपण गरीबांना विसरणं योग्य नव्हतं. आपण आपला मोठेपणा त्यांना देऊं शकलों नाहीं तरी त्यांच्यासाठीं तो वापरला तरी पाहिजे.

ह्या बिचाऱ्यासाठीं काय करावं? ह्याला कुठं नोकरी मिळवून द्यावी?

मीं रेळेकडे पाहिलं.

त्यानं खिशांतून कॅप्स्टनचं पाकीट बाहेर काढलं नि एक सिगारेट शिलगावली.

अचंबा करीत मीं मनाशीं म्हटलं, ह्याला अजून परिस्थितीची कल्पना आली नाहीं कीं काय? मला अडीचशें रुपये मिळत असूनहि मी ही उंची सिगारेट कधीं घेऊं शकत नाहीं!

कांहीं जणांना हलाखींत आपला रुबाब विशेष दाखवावासा वाटतो. लोकांना फसवायला नि ते फसले कीं स्वत:लाहि फसवून घ्यायला!

...पण हें परवडतं कसं ह्या रेळेला?

एवढ्यांत मला आमच्या कचेरींतल्या नंदू ठाकूरची आठवण झाली. महिन्याला सव्वाशें रुपये मिळविणारा नंदू आपल्या श्रीमंत नातेवाइकांच्या वस्तू आपल्या म्हणून नेहमीं वापरीत असतो! त्या नंदूसारखाच रेळेहि कुणातरी श्रीमंत नातेवाइकाचं चोरलेलं सिगारेटचं पाकीट वापरीत असावा.

—माझ्या तळहातावरल्या त्याच्या कुटुंबाकडे पहात मी म्हणालों, 'हा रेळे महामूर्ख आहे. डोक्याकर इतका बोजा असतांना हा इतका खोटा रुबाब दाखवून काय करणार आहे?.. आणि मला म्हणतोय् दोनशेंत तुझं काय होणार म्हणून!'

त्याच्या दिमाखाचं मला हंसू आलं. मीं म्हटलं, 'तूं नेहमीं कॅप्स्टन ओढतोस का? मला तर कॅप्स्टननं गरगरतं.'

माझ्या प्रश्नाचं उत्तर देण्याऐवजीं रेळेनं 'हूं' केलं. त्या 'हूं'चा अर्थ कोणताहि व्हावा!

त्याच्या सगळ्या खोट्या रुबाबाचं कौतुक वाटण्याऐवजीं मला त्याची कींव आली. आपलं पूर्वीचं ऐश्वर्य दाखविण्याची त्याची केविलवाणी धडपड

चालली होती. या धडपडीसाठीं लागणारा पैसा तो माझ्यासारख्या नोकरीदार माणसांकडून कर्जाऊ म्हणून घेत असणार ! आत्तांच्या खाण्याचं बिल मीं दिलं कीं हा माझ्याजवळ पैशांची मागणी करील कीं काय असं मला वाटूं लागलं. त्या मागणीला नकार देण्याऐवजीं विषय बदलून पहावा म्हणून मीं विचारलं, 'तूं आतां काय करणार आहेस ? दुसरीकडे कुठं नोकरी मिळण्याची शक्यता आहे ?'

'तशी शक्यता कांहीं दिसत नाहीं. तुला कुठं खटपट करतां येईल का ? तुझ्या कंपनींत—'

'बघेन खटपट करून. कांहीं जागा भरायच्या आहेत आमच्याकडें.'

'थँक्यू व्हेरि मच् ! नोकरी मिळाली कीं बायकोची किरकिर तरी संपेल !'

त्याच्या बायकोची मला आतां इतकी कींव वाटूं लागली कीं वाटेल तें करून त्याला नोकरी मिळवून द्यायची असा मीं निश्चय केला. कंपनींत कुणाजवळ चौकशी करावी, कुणाचा वशिला लावावा याचा मी विचार करूं लागलों.

त्याला नोकरी मिळालीच पाहिजे. एकट्यानंच सुखी होण्याचा आपल्याला अधिकार नाहीं. आपण त्या गरीबाला मदतीचा हात दिला पाहिजे. त्यानं जन्मोजन्मीं आपलं ऋण आठवलं पाहिजे...त्याला समजलं पाहिजे कीं नुसत्या बेकार दिखाऊ रुबाबानं कांहीं होत नसतं; त्यासाठीं माझ्यासारखा पगारदार, कायम नोकरीवाला मनुष्य असावा लागतो !

आमचं खाणं संपलं होतं. आम्ही उठलों. रेळेनं पुढं होऊन पाकिटांतून दहाची नोट ऐटींत काढली नि आपल्याजवळच्या दहाच्या शेवटच्या नोटेनं रुबाब दाखविण्याचा पुन्हां एकवार प्रयत्न केला.

मीं त्याचा हात दूर केला नि पैसे दिले.

'तूं कशाला दिलेस पैसे ?' असं संभावितपणें म्हणायला तो अर्थात्‌च विसरला नाहीं.

'मीं दिले म्हणून काय झालं ?'

'मीं तुला चहाचा बोलवायचं नि तुला बिचाऱ्याला पैसे भरायला लावायचं हें कांहीं खरं नाहीं.'

माझ्याबद्दल काळजी करण्यापेक्षां ह्या शहाण्यानं स्वतःबद्दल काळजी करावी हें अधिक योग्य होतं !

--बाहेर आल्यावर त्याला परिस्थितीची कल्पना देण्यासाठीं म्हणून मीं म्हटलं, ' सध्यां नोकरीची टंचाई तूं पहातो आहेसच. पण मी आमच्या कंपनींत खटपट करीन. काम फार असतं, साहेबांच्या कटकटी देखील फार असतात पण तें विसरून जायचं. झालेला अपमान अगदीं मुकाट्यावं गिळून टाकायचा. परिस्थितीच आहे अशी. आतां माझंच बघ ना. मला इतका थोरला पगार मिळतो पण तो सुखाचा आहे का ? साहेबाच्या शिव्या आहेत. काम तर वाढतंच आहे. कधीं कुणा नातेवाइकाकडें जायचं म्हटलं, नाटक–सिनेमाला जायचं म्हटलं तरी वेळ मिळत नाहीं !'

' अरे अरे ! काय हाल आहेत रे !'

माझ्या बोलण्याचा त्याच्यावर थोडा परिणाम झालेला दिसला. मीं पुढें म्हटलं,

' शनिवारीं संध्याकाळपर्यंत थांबावं लागतं. रविवारींहि यावं लागतं–

' तुला मीं बसस्टॉपजवळ पाहिलं ना, तेव्हांच मला वाटलं, कीं हा सप्तर्षी कांहीं सुखी नाहीं. तूं अगदीं त्रासलेला, दमलेला दिसलास.' रेळे माझ्या पाठीवर हात ठवीत म्हणाला. ' मग हें बघ, तूं कांहीं माझ्या नोकरी-साठीं त्रास करून घेऊं नकोस.'

त्यानं दुसरी सिगरेट शिलागवली. एक मला दिली.

सिगरेट पेटवीत मी म्हणालों. ' अरे, त्रास कसला त्यांत ? तुझ्यासाठीं एवढं नाहीं होणार माझ्या हातून ? मी जरूर खटपट करणार. जमलं जमलं. तशी शक्यता वाटली तर मी तुला घरींसुद्धां येऊन सांगेन. तूं पत्ता देऊन ठेव.'

' थँक्स. पण तूं '––

' कांहीं बोलूं नकोस. तूं गिरगांवांत रहातोस ना ? मी घरीं येईन तुझ्या. ट्रॅममधून जातांना तुला एकदोनदां गॅलरींत पाहिलंय् मी––बिल्डिंगचं नांवहि सांगूं शकेन मी––मला वाटतं, ' बलवंत भुवन ' कीं––' बलवंत सदन.' असं कांहींतरी नांव आहे.'

" बरोबर. दोन्हीं बिल्डिंग्ज् लागूनच आहेत एक आहे ' बलवंत भुवन '

नि एक आहे ‘ बलवंत सदन. ’ तिथं कुठंहि विचार तूं रेळे म्हणून. दोन्ही बिल्डिंग्ज् माझ्याच आहेत. वडिलांचं नांव दिलंय् त्यांना—आणि हें पहा, सहज म्हणून घरीं आलास तरीहि चालेल. मला नोकरीची तेवढी कांहीं आवश्यकता नाहीं. हजार अकराशें रुपये भाडं येतं मला. पण घरीं बसायचं. त्यापेक्षां कुठं नोकरी मिळाली तर बरं म्हणून बघायचं. तुला कंपनींत फार काम असतं, त्यांत मी आणखी तुला बिचाऱ्याला त्रास देणं म्हणजे— ’

बेबी रेळे माझा निरोप घेऊन केव्हां गेला तें मला नीटसं कळलंच नाहीं. पण तो जातांना इतका मोठा होत गेला कीं मी त्याच्या बुटाइतक्या उंचीचा झालों होतों नि त्यानं दिलेलीं कॅप्स्टन सिगरेट चुरगळून बस स्टॉपवर द्यायची राहिलेली अर्वाच्य शिवी हेडक्लार्क कानड्याच्या नांवापुढं जोडत होतों ! !

० ० ०

## ६ : तुझीच

घरांतून मी बाहेर पडतांना आक्कानं हटकलं नि म्हटलं, 'कायरे, आज फार खुषींत दिसतो आहेस. इतकी ऐंट करून कुठं चालला आहेस ?

'झालं ? बाहेर पडतांना असं हटकलं कीं काम होत नाहीं. माहीत आहे नं ?'

'पण इतकं काय मोठं काम आहे ?'

'तें झालं तर सांगेनच.'

असं म्हणून मी बाहेर आलों. मनाशीं म्हटलं, ठरल्याप्रमाणं काम झालं तर प्रथम ती गोष्ट आक्काला सांगायची.

वाढदिवसाच्या निमित्तानं म्हणून मी चांगले कपडे घातले होते. जातांना आरशांत पहातांना मी मनाशीं म्हटलं होतं, मुक्तानं मला पाहिलं कीं ती नक्की खूष होईल नि मला म्हणेल, 'रमेश,–आज तूं इतका रुबाबदार दिसतो आहेस'––

मी तिला सांगेन, 'मुक्ता, इतके दिवस मी धीर काढला. आतां मला रहावत नाहीं. तूं मला 'हो' कीं 'नाहीं' काय तें उत्तर दे. तूं माझी आहेस ना ?'

आजच्या माझ्या येण्याबद्दल मी मुक्ताला सांगितलं आहे तें तिच्या लक्षांत राहील कीं नाहीं, भेटल्यावर काय म्हणेल, माझ्याकडे कशी बघेल,

या विचारांत मी गुंगून गेलों होतों. मनांतल्या कल्पना मी एका तऱ्हेनं मांडत होतों, पुन्हां ती रचना मोडून दुसरी रचना करीत होतों.

माहीमला मुक्ताच्या घरीं जाईपर्यंत माझा हा खेळ चालू होता. दारावरली बेल दाबली नि इतका वेळच्या विचारांतलं कुठलं चित्र समोर दिसेल अशी पुन्हा कल्पना केली.

मीं पुन्हां बेल दाबली काहीं वेळ गेला.

मीं पुन्हां बेलवर बोट ठेवणार एवढ्यांत दार उघडलं गेलं.

दारांत मुक्ताची आई उभी होती.

'नमस्कार.'

'नमस्कार. या नं आंत.'

मी आंत जाऊन बसलों. मला वाटलं, मुक्ताची वेषभूषा चालली असेल. माझ्यासाठीं चहा घेऊनच ती बाहेर येईल.

तोहि अंदाज चुकला. मुक्ताच्या आईनं चहा आणून दिला. मीं विचारलं, 'मुक्ता काय करतेय ?'

'मुक्ता ना ? ती घरांत नाहीं. मघाशीच बाहेर गेली.'

'कांहीं निरोप ठेवलाय ?'

'नाहीं बाई.'

'पण तिला मी आज येणार हें ठाऊक होतं.'

'हो नं. ती मला म्हणालीसुद्धां, पण दुपारीं काय एकदम लहर फिरली–म्हणाली, मी बाहेर जातें. फ़ार महत्त्वाचं काम आहे.–'

'अच्छा, मग मी येतों.'

'थांबायला सांगितलं असतं, पण मुक्ता केव्हां येईल देव जाणे ! मला कांहीं म्हणालीदेखील नाहीं.'

मी रागानं बाहेर पडलों. म्हणे, लहर फिरली ! ही अशीच लहरी आहे मुक्ता. नि म्हणूनच इतके दिवस असे वांया गेले. कधीं आपण होऊन मला म्हणेल सिनेमाला जाऊं; तर कधीं मी चारपाचदां विचारूनहि येणार नाहीं. बरं, कबूल केल्याप्रमाणं कार्यक्रम होईलच असं नाहीं सिनेमाच्या, नाटकाच्या इथं वाट पहावी नि ऐत्या वेळीं तिनं येऊं नये अगर मैत्रिणीबरोबर निरोप पाठवावा असं कित्येकदां होई. तिनं मला कुठंतरी भेटायला बोल-

 १५७८ १२।८।६१ 

वावं नि मग त्यावेळीं न येतां दुसऱ्या दिवशीं वाद घालवा—त्या सोमवारीं नाहीं, पुढल्या सोमवारीं भेटायचं ठरलं होतं, असंहि होई......

...एकदां तिनं कसलंतरी सेंट लावलं होतं. मीं म्हटलं, ‘मी बरोबर असतांना हें सेंट लावत जाऊं नकोस. माझं डोकं दुखतं.’

‘असं ? मग मी जेव्हां हें सेंट लावलं असेल तेव्हां तूं बरोबर येऊं नकोस, असं मी म्हटलं तर ?’

‘तर तो मूर्खपणा ठरेल !’

‘जसा आतां तुझा ठरला !’ हें सेंट मला माझ्या मित्रानं बक्षीस दिलं आहे. मला तें वापरलं पाहिजे.’

‘तो मित्र तुला माझ्याहून—’

‘तो प्रश्नच उद्‌भवत नाहीं. दोन मित्रांत तुलना कशी करूं ? हां’ तुझीं–माझीं नातीं दुसरीं असतीं तर गोष्ट वेगळी होती—’

‘ह्या मित्रानं तुला लग्नाचं विचारलं तर तूं काय उत्तर देशील ?’

‘कदाचित हो म्हणेन मी. चांगला आहे तो. रुबाबदार आहे. शिकलेला आहे. नोकरी उत्तम आहे—’

‘अस्सं ! नि मी जर कधीं विचारलं तर—’

‘मला नाहीं उत्तर देतां येत—’

नेहमीसाठीं लिहायला म्हणून मी एक छोटंसं पेन तिला बक्षीस दिलं होतं. मी दिलं तेव्हां तिनं त्याची किंमत मला देऊं केली. मी ती घेतली नाहीं. आणि तिनं तें पेन आपल्या दोस्ताला खुशाल देऊन टाकलं.

मी एक दिवशीं तिला म्हटलं, ‘मुक्ता, पेन कुठं आहे ?’

ती हंसली.

‘हरवलं ना ?’

‘नाहीं. सुरक्षित आहे.’

‘पण कुणाजवळ ?’

‘माझ्या मित्राजवळ.’

‘कोण–ज्यानं सेंट दिलं तो ?’

‘हो.’

‘पण तें मी बक्षीस दिलं होतं तुला !’

'पण माझा नाइलाज झाला. त्यानं तें माझ्याकडून मागून घेतलं नि तो देईनाच. म्हणे, मला हवंच आहे हें.'

'त्यानं तुला कांहीं दिलेलं मी मागितलं असतं तर ?'

'तर मी तुला वेडा म्हटलं असतं.'

'मग त्या मित्राला तूं काय म्हणालीस ?'

'अर्थातच वेडा.'

'पण तुला मी दिलेल्या पेनबद्दल कांहीं वाटलं नाहीं ?'

'वाटलं तर !'

'मग असं कां वागलीस ?'

'लहर माझी !'

'अशाच लहरीनं कुणाच्या तरी बरोबर—'

'लग्न करीन, हेंच ना ? मग त्यांत तुला वाईट वाटायचं कारण ?'

मला मुक्ताचं मत कधींच कळलं नाहीं. तिला माझ्याबद्दल काय वाटत होतं, मी तिला मागणी घातली असती तर तिनं काय म्हटलं असतं याचा अंदाज मला कधींच लागला नाहीं. हा अंदाज आज घ्यायचाच असं मी ठरवलं होतं नि म्हणून दुपारीं माहिमला तिच्या घरीं गेलों होतों, तर ती बाहेर गेली होती; मी येणार हें माहीत असतांनाहि ती बाहेर गेली होती.

आतां मुक्ता कधीं दिसली तरी ओळख दाखवायची नाहीं, तिनं बोलावल्यावर आपण मुद्दामच जायचं नाहीं. कधीं कौतुक करायचं नाहीं. तिच्या मित्राबद्दल कुतूहल दर्शवायचं नाहीं असं मी ठरवलं. पण ह्या गोष्टी घडायला प्रथम मुक्ता भेटायला हवी होती नि तिचा तर पत्ताच नव्हता.

मला काय करावं तें कळेना. तिच्यासाठीं मीं मुद्दाम रजा घेतली होती नि ती भेटली नव्हती. माझा दुपारचा वेळ अगदीं मोकळा पडला होता.

मी बसस्टॉपजवळ आलों. मनाशीं विचार केला, आतां बसनं फाउंटनपर्यंत जावं नि एकादा इंग्रजी बोलपट पहावा, त्यांतला प्रणय पाहून हरखून जावं बाहेर पडल्यावर कुठंतरी हॉटेलांत जाव नि सिगारेटचे मनसोक्त झुरके घ्यावेत.

एवढ्यांत 'ए' रूटची बस आली. मला हवी असलेली प्रत्येक ठिकाणीं थांबणारी मी तींत चढलों. बस चालू झाली.

बसमध्यें शिरल्यावर मला प्रथम जाणवला तो मंदमधुर वास. कुणीतरी जुईचा गजरा डोकींत माळला होता. माझा आवडता गंध डोक्यावर माळणारी ही स्त्री कोण असेल ? ह्या सुगंधानं जडावलेला गजरा माळणाऱ्या ह्या स्त्रीचा केशसंभार कसा असेल ? ह्या सुगंधाला, त्या गजऱ्याला, त्या विपुल केशसंभाराला साजेसं तिचं रूप असेल ?

मी नजर टाकली. तो सुगंधित गजरा मला हंसून म्हणाला, 'मी इथंच आहें.' त्या गजऱ्यानं आपल्या मालकिणीला काय सांगितलं कोण जाणें, पण त्या तरुण स्त्रीनं मागं वळून माझ्याकडे पाह्यलं. क्षणभर मला वाटलं, त्या तरुणीच्या तारुण्याचा हा गंध असेल. त्या सुरेख डोळ्यांतील नि लाल-चुटुक ओठांवरील लाडिक भावनांचा हा गंध असेल !

ती स्त्री बसली होती त्या मागील बाकावर खिडकीशीं मी बसलों. तो जुईचा गंध मला आतां जवळून मिळत होता. तो रेशमी विपुल केशसंभार मी निरखून पाहूं शकत होतों.

त्या स्त्रीनं पुन्हां एकदां मागें वळून पाहिलं नि मी तिच्याकडेच पहात असल्याची खात्री करून घेतली.

कंडक्टर आला. त्यानं हातांतला पंच वाजवून त्या तरुणीला तिकिट विचारलं.

आणि ती दचकली. ओठांतल्या ओठांत ती 'My God !' म्हणून पुटपुटली. इकडे तिकडे बघूं लागली.

मी ओळखलं, कांहींतरी घोटाळा आहे. हिचं पाकीट कुणीतरी चोरलं आहे आणि हिच्याजवळ पैसे नाहींत.

किती नामी संधि ! कधीं नव्हे ती चालून आलेली. ह्या गोड तरुणीला मदतीचा हात द्यायचा, तिची ओळख करून घ्यायची नि जमल्यास--

तिनं माझ्याकडे केविलवाण्या चेहऱ्यानं पाहिलं. आपल्या डोळ्यांनीं मला म्हटलं, 'मला आतां मदत हवी आहे, द्याल का ?'

मी पुढं झालों नि तिला म्हणालों, 'माफ करा. आपल्याला कांहीं मदत हवी आहे ?'

'अं ? हो. थँक्यू. मी किनई, पर्स घरींच विसरलें. तिकिटाला एक पैसाहि नाहीं माझ्याजवळ.'

'तुमची हरकत नसेल तर मी काढूं का तुमचं तिकीट ?

'थँक्यू. तुम्हांला कुठं जायचं आहे ?' तिनं विचारलं.'

'फाउंटनला. आपल्याला ?'

'मलाहि खरं म्हणजे तिकडेच जायचं आहे. पण तुम्हीं माझं तिकीट फक्त खोदादाद सर्कल पर्यंतचंच काढा.'

'तें मी बघतों. तुम्हीं फाउंटनला जाणार होतां ना ?'

'हो.'

मी कंडक्टरला दोन तिकिटांचे पैसे दिले नि आमचीं तिकिटं घेतलीं.

त्या तरुणीनं पुन्हां माझे आभार मानले.

बस आणखी जराशी पुढं गेली. त्या तरुणीच्या शेजारची जागा रिकामी झाली. तिनं मला आपल्या बाकावर बसायला सांगितलं.

मी हरखून गेलों. आज माझे कपडे चांगले होते, सुटी घेतली होती, भरपूर वेळ होता, अंतर बरंच होतं नि मुख्य म्हणजे ह्या सर्वांना आवश्यक असा स्त्रीसहवास मला मिळत होता. एक तरुण, सुस्वरूप स्त्री मला आपल्या शेजारीं बसायला बोलावीत होती.

मी तिच्या शेजारीं बसल्यावर ती मला म्हणाली, 'आपल्याला कुठं जायचं आहे ?'

'फाउंटनला. तिथं एकाद्या पिक्चरला जायचा विचार आहे. तुम्हीं कुठं जाताय् ?'

'फाउंटनलाच. मला माझ्या मैत्रिणीकडे जायचं आहे.'

'आपलं नांव ?' मी जरा धीर करून प्रश्न केला.

'माझं नांव लक्ष्मी मुदलियार.'

'मुदलियार ? म्हणजे तुम्ही दक्षिणी नाहीं. मग—'

'मराठी कसं बोलतें हेंच ना ?'

'हो.'

'मला मराठी येतं. गुजराथी येतं. इंग्रजी, हिंदी नि तामिळ–एवढ्या भाषा बोलतां येतात.–'

'असं कां ?'

'असं का काय ? मी सध्यां सिंधीहि बोलायला शिकतेंय. वाटते तेवढी

ती भाषा कठीण नाहीं. माझी आई म्हणते, जमतील तेवढ्या भाषा शिकून घे.'

'छान.'

'आपलं नांव ?'

'रमेश जठार.'

'काय करतां आपण ?'

'मी एका जाहिरात कंपनींत अधिकारी आहें.'

'मला तुमचा हात बघूं दे.' तिनं माझा हात हातांत घेतला नि मला विचारलं, 'तुम्हांला हस्तसामुद्रिक कळतं ?'

'नाहीं, तुम्हांला ?'

'कळतं. थोडंफार. सांगूं ?'

तिनं आपले मऊ तळवे माझ्या हातावरून फिरवले. मला फार बरं वाटलं.

'तुमची परिस्थिति खूप चांगली आहे नि ती तशीच रहाणार आहे.'

'आणखी ?'

'आणखी, तुम्ही स्त्रियांच्या सहवासांत येऊनसुद्धां अजून नवखे आहांत.'

मी चमकून विचारलं, 'म्हणजे ?'

यावर ती मनसोक्त हंसली. आपल्या तळव्यांत माझे हात झाकून घेत ती म्हणाली, 'अगदीं नवखे—'

'पण म्हणजे काय ?'

'जरा जवळ सरका, कानांत सांगतें—'

'इथं बसमध्यें ?'

'हो.'

'नको. मोठ्यानं सांगा.'

'लोक हंसतील तुम्हांला.'

तिनं माझे हात सोडले नि आपला पाय माझ्या पायाजवळ ठेवला.

मी माझा पाय दूर केला तर तिनं आपला पाय पुन्हां माझ्या पायाजवळ ठेवला नि माझ्याकडे चमत्कारिक नजरेनं पाहिलं.

एवढ्यांत बसनं वळण घेतलं नि ती माझ्या अंगावर कोसळली. अशी कीं मी चटकन् तिला धरायला म्हणून हात पुढें केले. माझ्या हातांना तिच्या लुसलुशीत शरीराचा स्पर्श झाला.

माझं शरीर तापून निघालं. डोक्यांत रक्त चढलं. डोळ्यांची आग होऊं लागली.

लक्ष्मी माझ्याकडे पाहून हंसली नि म्हणाली,

'रमेश, तूं अगदींच—'

'आँ ?'

'तूं ज्या तऱ्हेनं मला उचललंस त्यावरून मी अंदाज केलाय तुझ्याबद्दल.'

मी अंग जरा मोकळं सोडून बसलों. माझ्या शरीराच्या अर्ध्या भागाला तिच्या शरीराचा स्पर्श होत होता. दाहक नि मादक. शरीराचा प्रत्येक अणु प्रज्वलित करणारा.

लक्ष्मीनं माझं लक्ष कुठंतरी बाहेर वेधलं नि मी खिडकीकडे वळून पहायला लागलों, तसं माझ्या लक्षांत आलं, कीं ती मुद्दाम पुढं सरकली होती नि आपल्या मादक शरीराचा मला अगदीं निकटचा स्पर्श देत होती...

बाहेर कांहींच नव्हतं हें माझ्या लक्षांत आलं तेव्हां मीं मुद्दाम म्हटलं,

'बाहेर कांहींच नव्हतं.'

'पण बसमध्यें इथं कित्तीतरी होतं. तुला हवं तर मिळण्यासारखं होतं.'

'तें कळलं मला.'

मी तिच्या पाठीमागून हात नेऊन खिडकीशीं ठेवला. तिला बिलगून बसलों. तिनं खिडकींतला माझा हात उचलला नि आपल्या गुबगुबीत दंडावर ठेवला.

मी हांक मारली 'लक्ष्मी—'

'रमेश—' तिनं नाजुक साद दिली.

'तूं किती सुंदर आहेस !'

'तुझ्यापुढं कांहींच नाहीं.'

'चल्. आणि तुझ्या डोक्यांतला गजरा मला भारी हैराण करतोय. हा

जुईचा सुगंध मला फार आवडतो.–'

'–– आणि तूं लावलेलं जून सेंट मला फार आवडतं. वाटतं...वाटतं कीं, त्या सुगंधांत स्वतःला गुरफटून घ्यावं. त्याच्या कुशींत शिरावं.'

'तूं बोलतेसदेखील किती छान. तूं दिसतेस छान. तुझे डोळे छान आहेत. तुझा आवाज छान आहे. हे केस छान आहेत. हा गजराहि छान आहे––'

'नि माझा शेजारीहि छान आहे बसमधला. वाटतं कीं, ही बस अशीच जात रहावी–'

इतक्यांत फौंटनचा स्टॉप आला. मीं म्हटलं, 'लक्ष्मी, उतरूं या.'

'ओऽ ह, वेळ इतका छान गेला––'

'माझाहि.'

आम्हीं खालीं उतरलों. तिनं माझ्याशीं हस्तांदोलन केलं नि आम्हीं दोन दिशांना वळलों.

चारच पावलं टाकलीं नि मला वाटलं, चुकलं आपलं. ह्या लक्ष्मीचा पत्ता घ्यायचा राहिला. तिला पुन्हां भेटायला हवं होतं...तिच्याबरोबर चहातरी घ्यायला हवा होता. छेः, आलेली संधी मी सोडली होती.

मीं उलट दिशेनं धूम ठोकली.

लक्ष्मी एका दुकानांत शिरत होती.

'लक्ष्मी'––मी हांक मारली.

'ओऽह्. परत कां आलास?'

'तूंच ओळख.'

'माझा पत्ता हवा असेल?'

'चूक.'

'आतां नक्की बरोबर सांगेन.'

'सांग.'

'आपण चहा घ्यायला हवा आहे. बरोबर ना? माझ्या तें लक्षात होतं; पण तुझा नवखेपणा मला पडताळून पहायचा होता. अशा नवखेपणाची मला फार हौस आहे.'

'खरं म्हणजे, तूंच मला चहाचं विचारायला हवं होतंस.'

'मी मुद्दाम नाहीं विचारलं. मी विचारायचं नि तूंच पैसे द्यायचेस. माझ्याजवळ कांहीं नव्हतं. दुसरं म्हणजे, सगळ्या गोष्टींची सुरुवात स्त्री-कडून होईल म्हणून वाट पहाणाऱ्यांना कांहीं मिळत नाहीं, हें तुला मला दाखवायचं होतं–'

'कळलं सगळं. चल, चहा घेऊं.'

'मी कुठल्या तरी काळोखी हॉटेलांत येणार नाहीं. कोंदट खोलींत बसणार नाहीं. आपण बोलत बोलत एम्पायर सिनेमापर्यंत जाऊं नि तिथल्या हॉटेलच्या बागेंत चहा घेऊं.'

आम्हीं बोलत बोलत निघालों. तिनं आपल्या हातांत माझा हात घेतला. एकमेकांना लगटून आम्हीं चालूं लागलों.

हातांतून निसटलेली संधी मी पुन्हां पकडली होती. ती मी अशी अर्ध-वट सोडणार नव्हतों. मी लक्ष्मीला पुन्हां भेटणार होतों, तिच्याबरोबर आणखी फिरणार होतों. एकाद्या तरुण सुंदर स्त्रीनं आपण होऊन बेफिकीर-पणें सर्वस्व देऊं करावं यासारखं कोणतं सुख आहे? हें सुख मला मिळवा-यला हवं होतं. पूर्णांशानं तें चाखायला हवं होतं.

मी आणि लक्ष्मी असे जात असतांना माझ्या ओळखीच्या दोघांनीं आम्हांला पाहिल नि त्यांच्या नजरेंत उभा राहिलेला हेवा पाहून मी स्वतःला धन्य मानल. लक्ष्मीला आणखी जवळ ओढलं.

आम्हीं त्या मोकळ्या हॉटेलांत शिरलों. झाडाच्या सावलींत ठेवलेल्या एका टेबलापाशीं बसलों.

'तूं काय घेणार?' मी लक्ष्मीला विचारलं.

'तूं घेशील तें.'

मी खाद्य पदार्थांची यादी बघून ऑर्डर दिली.

खातांना लक्ष्मीनं माझ्या पायाजवळ पाय ठेवला. मीं म्हटलं, 'लक्ष्मी, तुला ही भारी वाईट खोड आहे.'

'तुला टोंचतो माझा पाय?'

'छट्. बरं वाटतं कीं, पण–'

'पण काय?'

मी कांहीं उत्तर देणार होतों, एवढ्यांत माझं लक्ष पलीकडल्या टेबलाकडे गेलं. तिथं एक प्रौढा बसली होती नि ती आमच्याकडे पहात होती.

मीं लक्ष्मीला म्हटलं, 'लक्ष्मी, ती बाई तुझ्या ओळखीची आहे?'

'हो, चांगल्या ओळखीची आहे.'

मी जरा बाजूला सरकलों, तशी लक्ष्मी म्हणाली, 'रमेश, दचकलास कां?'

'त्या बाईमुळं. तिला वाटायला नको.'

'वेडा आहेस. अगदीं नवखा!' असं म्हणत लक्ष्मी त्या बाईकडे गेली, तिच्याशीं कांहीं बोलली आणि परत आली; मला खेटून बसली.

'कोण बाई आहे ती? वयाला न शोभेलसं-'

मला आडवीत लक्ष्मी म्हणाली, 'पुढं बोलूं नकोस, ती माझी आई आहे!'

'आई?' मी आश्चर्यानं विचारलं. ती ओठ रंगवलेली, झिरझिरीत कपडे घातलेली, शेजारीं बसलेल्या इसमाशीं अति मोकळेपणानं वागणारी बाई लक्ष्मीची आई असूं शकेल हें मला पटेना!

'लक्ष्मी, चेष्टा नको करूंस.'

'तुझी शपथ. ती माझी आई आहे!'

'मग तुझं माझ्याशीं असं वागणं पाहून-'

'तिला बरं वाटलं. तेंच सांगत होती ती.'

'म्हणजे?'

'म्हणजे काय? उगाच नाहीं तुला नवखा म्हणत मी. आमचा व्यवसायच आहे हा!'

'तूं...तूं...तशी आहेस? तूं व्यवसाय करतेस?'

[ 'हो. एवढ्याशा ओळखींत तुझ्याशीं मी ज्या तऱ्हेनं वागलें त्यावरून तुला कळायला हवं होतं. कुठलीही चांगली स्त्री कितीहि देखणा पुरुष असला तरी-' ]

'लक्ष्मी, हें खरं आहे? मला वाटत नाहीं-'

'मी शिकलेली आहें, दोनचार भाषा चांगल्या बोलतें, चांगल्या लोकांच्या सहवासांत असतें म्हणून एवढं बोलूं शकतें, अशी सफाईदार वागूं शकतें, म्हणून तुला वाटतंय ! खरं सांगूं ? बसमध्यें मी तो डाव टाकला होता. माझी पर्स ही बघ माझ्याजवळ आहे '

लक्ष्मीनं आपल्या पोलक्यांतून पर्स काढून दाखवली.

'लक्ष्मी–'

'जाऊं दे. पुन्हां केव्हां भेटशील ? उद्यां जमेल ?'

'जमेल.'

'मी तुला माझा पत्ता देतें. तूं दुपारीं घरीं ये माझ्या. मग जरा गप्पा मारूं. सिनेमाला जाऊं हरकत नसली तर—'

खरं म्हणजे त्या घटकेला माझं मन बधिर झालं होतं. इतका वेळ आकर्षित करणारा लक्ष्मीचा हा गोंडस देह दुसऱ्या कुणालाहि मिळूं शकतो हें ऐकून मी दचकलों होतों. त्या देहाचं पहिलं आकर्षण राहिलं नव्हतं. पण तरीहि तें तोडवत नव्हतं. कुठंतरी अजून तें शिल्लक होतं.

मीं दुसऱ्या दिवसाचा कार्यक्रम आंखला. म्हटलं, 'किती वाजतां येऊं तुझ्याकडे ?'

'दोन वाजतां जमेल ?'

विचार करण्यासाठीं म्हणून मी सहज बाहेर पाहूं लागलों–

– आणि मला मुक्ता दिसली !

'मुक्ता' – मी अभावितपणें हांक मारली.

मुक्ता किंचित् थांबली नि कुणी दिसलं नाहीं म्हणून चालूं लागली.

मी खिशांतून पांचाची नोट टेबलावर ठेवली नि लक्ष्मीला म्हटलं, 'मुदलियारबाई, हे पैसे घ्या. बिल भागवून उरतील ते तुम्हांला बक्षीस !'

मी धांवत जाऊन मुक्ताला गांठलं. तिच्या खांद्यावर हात ठेवून म्हटलं, 'मुक्ता–मुक्ता–तूं मला इतकी हवी आहेस ग–!'

'वेड्या, रस्त्यांत काय हें ?'

'रस्त्यांतच सांगणार आहें मी. तूं दुपारीं कुठं गेली होतीस ? मी येणार हें तुला ठाऊक नव्हतं ?'

'होतं रे. नि हेंहि ठाऊक होतं कीं, तुझा आज वाढदिवस आहे,

तुझ्यासाठीं कांहींतरी घ्यायचं म्हणून मी इकडे आलें. तूं कितीहि रागावलास तरी तुझा राग जाईल अशी वस्तू आणली आहे मी. क्षणभरापूर्वीं कुणीतरी 'मुक्ता' म्हणून हांक मारल्यासारखं मला वाटलं, तो तूं असशील तर किती छान होईल. आत्तां हा तुझ्यासाठीं घेतलेला सुरेख शर्ट तुला दाखवतां यईल—!'

मी टॅक्सी बोलावली. टॅक्सींत बसल्यावर मी म्हटलं, 'मुक्ता, तुला मी विचारणार आहें—'

'कांहीं विचारूं नकोस. तुझा प्रश्न मला ठाऊक आहे नि त्याला माझं उत्तर आहे—मी तुझीच आहें...तुझीच होतें नि तुझीच राहणार आहें, राजा!'

—आणि ती माझ्या कुशींत शिरली.

० ० ०

## ७ : शतक

> तुमचं ज्या मुलीवर प्रेम आहे तिनं जर तुम्हांला 'माझा स्वीकार कराल का? म्हणून विचारलं तर तुम्हीं काय उत्तर द्याल?

वास्तविक हा प्रश्नच होऊं शकत नाहीं. प्रश्न असा हवा कीं, उत्तरासाठीं विचार करावा लागला पाहिजे; हें उत्तर द्यावं कीं तें उत्तर द्यावं, असा संभ्रम पडला पाहिजे. प्रेयसीनं 'माझा स्वीकार कराल का?' असं विचारलं तर कुणीहि चटकन् 'हो' म्हणेल; यांत विचार करण्यासारखं काहीं नाहीं.

काल संध्याकाळपर्यंत मलाहि असंच वाटत होतं. म्हणजे, असा कांहीं प्रश्न असूं शकेल यावर मी कधीं विचारच केला नव्हता. पण काल जेव्हां सदू परांजपे माझ्याकडे आला तेव्हां मला पटलं कीं प्रश्न कसाहि असूं शकतो नि त्याला पर्यायी उत्तरंहि असूं शकतात.

काल संध्याकाळीं सदू परांजपे माझ्याकडे धाबऱ्याघाबऱ्या आला. चेहेऱ्यावर घाम डंवरलेला, डोळ्यांत प्रश्नचिन्हांची मालिका नि तोंडून शब्द फुटत नसलेला, अशा तऱ्हेचा त्याचा अवतार मी पुष्कळदां पाहिला होता; पण काल त्याचा चेहेरा मनस्वी भेसूर दिसत होता. त्याला पाहून मी दचकलों. आदल्या दिवशींच त्याच्या वडिलांना मीं डॉक्टर ढब्रूंच्या दवाखान्यांत खोकत बसलेले पाहिलं होतं. त्या वेळीं कांहीं ते इतके थकलेले...

'मधू—' सद्यानं कोरडया स्वरांत मला हांक मारली.

'हें बघ, तूं जरा विश्रांति घे. सावकाशीनं बोलूं आपण. अरे, आयुष्यांत असे प्रसंग—'

मी सद्याला सांगूं लागलों तशी त्यानं चेहेरा केविलवाणा केला नि मानेनं नकार दिला. धांवत आल्यामुळं त्याला बोलवत नव्हतं.

'सद्या, तुला पाणी हवंय् का ?'

त्यानं मानेनं होकार दर्शविला.

मी घरांतून तांब्याभांडं आणलं. सद्यानं तांब्या तोंडाला लावला नि एका दमांत तो रिकामा केला. त्याला आतां हुषारी वाटूं लागली.

'मधू, मी या वेळीं फार मोठ्या संकटांत सांपडलों आहें!' सद्यानं बोलायला सुरुवात केली.

सद्याच्या तोंडचं हें वाक्य ऐकून माझी काळजी दूर झाली. सद्याच्या ह्या वाक्याचा एकच अर्थ होता कीं, त्याच्या चालू प्रेमप्रकरणांत माशी शिंकली होती.

मीं ओळखलं, आतां सद्या चारआठ दिवस दाढी वाढवणार, सुतकी चेहेऱ्यानं रस्त्यावरली एकहि मुलगी न पहातां चालणार, आणि मग एका रविवारीं संध्याकाळीं स्वच्छ कपडे घालून माझ्याकडे येऊन म्हणणार, 'लेका, आज सकाळीं एका अतिशय गोड मुलीशीं माझी ओळख झाली. पहिल्याच भेटींत मीं तिला बोलून अगदीं गार करून टाकलं. आतां आमच्या संसारांत...'

सद्याच्या वाक्यानं मला पुढल्या आठवडयाचं भविष्य चक्क दिसूं लागे.

—सद्यानं जेव्हां तारुण्यांत पहिलं पाऊल टाकलं तेव्हां त्याचं दुसरं पाऊल प्रेमप्रकरणांत पडलं. तो इंग्रजी पांचवींत गेला नि पांच वारांचा तुकडा आपल्या शरीराभोंवतीं बावळटपणें गुंडाळणाऱ्या वर्गांतल्या सुमन तळपदेच्या प्रेमांत पडला.

मधल्या सुटींत तो सुमनच्या गोष्टी बोलायचा, वर्गांत तिच्याकडे बघत बसायचा आणि संध्याकाळीं तिच्या घरावरून मैल सव्वा मैलाचा फेरफटका करून आपल्या घरीं परतायचा.

जेमतेम महिनाभर असं चाललं. तोंवर सुमनचंहि आपल्यावर असंच निरतिशय प्रेम बसलं आहे, अशी त्याची खात्री पटली नि त्यानं इतिहासाच्या पुस्तकांत एक प्रेमपत्र ठेवून तिच्याजवळ दिलं.

'पुस्तक कशाला ? माझ्याकडे आहे ना पुस्तक ! ' सुमननं आपल्या अरुंद कपाळाची उंची अगदीं भुंवईला भिडवली.

'तूं ठेव हें पुस्तक ! उद्यां परत दे. त्यांत – अं – त्यांत एक गंमत आहे.' सद्यानं वाक्य पुरं केलं. तिच्या हातांत पुस्तक टाकलं नि तिथून धूम ठोकली.

दुसऱ्या दिवशीं सद्याच्या ह्या इतिहासाबद्दल हेडमास्तरांनीं छड्यांचा प्रसाद त्याच्या हातावर ठेवला आणि सद्याच्या प्रेमभंगाची बोहनी केली. हा प्रेमभंग दारुण होता. सद्या मनानं अगदीं खिळखिळा होऊन गेला. हें दुःख त्याच्यानं सहन झालं नाहीं तर तो आपल्या जिवाचं बरंवाईट करून घेईल, अशी मला भीति वाटूं लागली.

सद्यानं मोठ्या धीरानं तें दुःख गिळलं. आणि त्याला त्याची चव आवडलीहि !

त्यानंतर बहुधा दरवर्षीं त्याला दोनपांच वेळां असं दुःख गिळावं लागे. व त्याला कुठलीतरी मुलगी आवडूं लागे, तिच्यावर तो मनःपूर्वक प्रेम करूं लाग आणि मग तिच्याकडून नकार आला कीं जिवाचं बरंवाईट करण्याच्या गोष्टी बोलूं लागे त्याच्या भाषेंत सांगायचं म्हणजे त्याचं दिव्य प्रेम कधीं कुणाला कळलं नाहीं. त्याच्या प्रेमाच्या तीव्रतेनं कुठली मुलगी कधीं हुरळली नांहीं.– त्या मुलींची ती कुवतच नव्हती.

दोनतीन प्रयत्नांनंतर सद्यानं मॅट्रिकचा उंबरठा ओलांडला. तो कॉलेजांत गेला. आतां त्याच्या प्रेमप्रकरणांना मोकळं कुरण मिळालं त्याला भराभर मुली आवडूं लागल्या, त्यांच्यावर भराभर त्याचं प्रेम जडूं लागलं, तें जडलेलं प्रेम त्याच वेगानं मोडूंहि लागलं.

सद्याचा एक गुण म्हणजे. तो प्रत्येक वेळीं मनमोकळेपणीं माझ्याकडे येऊन आपल्या एकविसाव्या, सत्ताविसाव्या, बत्तिसाव्या प्रेमभंगाची शोककथा सविस्तर मला सांगायचा त्याला कुमारी अमुकतमुक कुठं दिसली, दिसल्याबरोबर ती त्याला कशी आवडली, तिनं त्याला आपला अगोदरचा

प्रेमभंग कसा विसरायला लावलं, हा पहिला खंड असे. त्यानं तिच्याशीं ओळख करून घेण्यासाठीं केलेले भगीरथ प्रयत्न, मागाहून झालेली ओळख, आणि तिलाहि सद्याबद्दल उत्पन्न झालेलं विलक्षण आकर्षण, हा दुसरा खंड असे. प्रणयाराधनानं सुरू झालेला तिसरा खंड सद्यानं न सांगतांहि कळे. दाढी वाढवून रडव्या चेहेऱ्यानं सद्या माझ्याकडे आला कीं मी तिसरा खंड पूर्ण झाल्याचं समजत असें.

त्या दारुण प्रेमभंगानंतर मी सद्याचं सांत्वन करूं लागलों कीं सद्या म्हणे, 'मधू, हें शेवटलंच ! मी किती प्रेम केलं तिच्यावर ! आतां मला जगण्यासारखं कांहींतरी आहे का ?...'

त्या प्रेमभंगाच्या तडाख्यांत सद्या तोंडाला येईल तें बोलत असे. नवीन ऐकणाराला त्याचं बोलणं ऐकूण वाटे कीं, एकदोन दिवसांनीं हा सद्या आपल्या नजरेसहि पडणार नाहीं. परंतु तो आठवडा पार पार होण्यापूर्वींच सद्या पुन्हां दाढी घोटून, स्वच्छ परीटघडीचे कपडे घालून माझ्यासमोर उभा राही. म्हणे, 'मध्या, तूं म्हणतोस तेंच खरं ! तें प्रेम म्हणजे एक मृगजळ होतं, तें प्रेम म्हणजे एक बुडबुडा होता, एक भास होता. खरं प्रेम म्हणजे काय हें आज मला कळलं. दुपारीं मी फुले मार्केटमधून घरीं येत होतों. येतांना बसमध्यें माझं सहज लक्ष गेलं. एक लावण्यलतिका...'

सद्या नवीन प्रेमांत पडलेला असे. ही लावण्यलतिका अतिशय हळव्या मनाची, सद्याचं दुःख जाणून त्यावर फुंकर घालणारी असल्याबद्दल सद्या शपथपूर्वक सांगे. एकदोन आठवड्यांनीं तो तिला लग्नाची मागणी घालणार असल्याबद्दल वा तिच्या मनांतून तशी मागणी घालण्याचं असल्याबद्दल तो मला सांगे

सद्याचं हें सांगून झालं कीं मी विचार करूं लागें,—ह्या खेपेला कोणत्या शब्दांत याचं सांत्वन करावं बरं ?...

आठदहा सांत्वनपर भाषणं मीं तयार ठेवलीं होतीं नि आलटूनपालटून त्यांचा वापर करण्याची संधीहि सद्याकडून मला सतत मिळत होती.

सद्यानं इतके प्रेमभंग सहन केले कीं त्यांना मोजदाद नव्हती. भाण-सावर संकटसंकटं तरी किती कोसळावींत ? त्याला कांहीं सुमार ? सद्याच्या अंगांत पुन्हापुन्हा प्रेम करण्याची वा प्रेमभंग सोसायची ताकद होती म्हणूनच

तो प्रत्येक प्रसंगाला तोंड देऊं शकला.

मला हें माहीत झालं होतं. मागलीं उदाहरणं देऊन सद्याला हें सांगूनहि झालं होतं. पण त्यानं तें कधीं पटवून घेतलं नव्हतं. प्रत्येक प्रेमभंगानंतर तो म्हणे, 'या वेळचं माझं प्रेम अगदीं खरं होतं रे! ह्यापूर्वींचीं सगळीं प्रेमं तकलादू होतीं. मीं त्या वेळीं भावनेच्या भरांत प्रेम केलं नि त्या उतावळेपणाचा योग्य तो परिणामहि भोगला! या खेपेला मात्र जगणंच अशक्य झालंय्. आतां मीं कसा जगूं? मला तिची आठवण सारखी येत रहाणार. सारखी तिची मूर्ति मला दिसत राहील. तिला कधींच का माझं प्रेम कळणार नाहीं? मीं प्रेमाचा इतका वर्षाव केला तिच्यावर कीं बोलून सोय नाहीं! आतां मला आयुष्याची दोरी तोडावीच लागणार!...'

सद्या अगदीं तळमळीनं बोले नि तें बोलणं पाहिलंच नसल्यामुळं मी त्याच्या जिवाबद्दल काळजी करीत नसें. अनुभवामुळं सद्याच्या भाषणानंतर मी म्हणें, 'सदूभाऊ, याला एकच उपाय दिसतोय् मला!'

'कोणता?'

'या आठवड्यांत तुला एखादी नवी सुंदर मुलगी भेटली पाहिजे!'

'नॉन्सेन्स! ह्या प्रेमभंगानंतर मी आतां कुठल्याहि मुलीकडे पहाणं शक्य नाहीं. कुठलीहि मुलगी मला आतां आकर्षित करूंच शकणार नाहीं. स्त्रीजातीचा मला अगदीं वीट आलाय् आतां!'

सद्याच्या बोलण्यामुळं मी हल्लीं विचलित होतच नसें. ह्या कथेंत आणखी एक चिमणी येऊन दाणा घेऊन जाईल याची मला खात्री असे. या कथेला शेवट नव्हता...

—असा हा दारुण दुःखाचे कितीतरी तडाखे सहन केलेला, सदू परांजपे काल पुन्हां रडव्या चेहेऱ्यानं माझ्याकडे येऊन आपण मोठ्या संकटांत सांपडल्याचं जेव्हां मला सांगूं लागला, तेव्हां मी सांत्वनपर शब्द धुंडाळूं लागलों.

घरांतून आलेला चहाचा कप तोंडाला लावीत सद्या म्हणाला, 'मधू, माझ्या एका प्रश्नाचं उत्तर देशील?'

'पहातों प्रयत्न करून.' मी म्हणालों.

'प्रश्न अतिशय साधा नि तरीहि कठीण आहे.'

'सांग तर खरा तुझा प्रश्न !'

''क्ष' माणसाचं एका सुंदर मुलीवर प्रेम आहे. त्या सुंदर मुलीनं स्वतःच 'क्ष' ला लग्नाबद्दल विचारल तर 'क्ष' नं काय उत्तर द्यावं ?'

'अरे, हा काय प्रश्न आहे ? त्या 'क्ष' नं मनांतल्या मनांत देवाचे नि त्या सुंदर मुलीचे आभार मानावेत नि प्रत्यक्षांत ठणकावून 'हो' म्हणावं !'

'असा प्रसंग माझ्यावर आला आहे. नि तरीहि मी बुचकळ्यांत पडलों आहें !'

सद्याचं कुणाहि मुलीवर प्रेम बसणं जितकं शक्य होतं तितकंच कोणत्याहि मुलीनं त्याला लग्नाबद्दल विचारणं अशक्य होतं.

मी सद्याकडे आश्चर्यानं बघूं लागलों तशी तो म्हणाला, 'तूं सगळी कथा ऐक. तुला आमच्यासमोर साने रहातात ते ठाऊक आहेत ?'

'कोण ? साने वकील ?'

'येस्. त्यांची अमिता ठाऊक आहे ?'

मी ताड्कन् खुर्चीवरून उठलों. इतकी सुंदर, हुषार नि श्रीमंत मुलगी आमच्या सद्यावर आषक होईल हें एक वेळीं शक्य होतं; पण त्या शिष्ट मुलीनं आपण होऊन लग्नाबद्दल विचारणं कधींच शक्य नव्हतं. आत्तांपर्यंत तिनं कित्येकांना धुडकावून लावलं होतं नि त्या धुडकावून लावलेल्यांतले कितीतरी जण आमच्या सद्याहून सरस होते.

सद्या म्हणाला, 'तुला आश्चर्य वाटेल, पण ह्या अमितेवर माझा जीव जडलाय्, नि तिनं मला 'माझा स्वीकार करशील का ?' म्हणून विचारलंय.'

'इम्पॉसिबल् ! शक्य नाहीं हें ! त्रिवार शक्य नाहीं ! हें जर खरं असेल तर मग तुला प्रश्नच पडायला नको आहे.'

'माझी कथा तूं पूर्ण ऐकली नाहींस अजून. सगळी कथा ऐक नि उत्तर दे. तुला ही कथा अशक्य वाटण्याचीं दोन कारणं आहेत. एक म्हणजे, इतके दिवस मीं गांवांतल्या मुलींवर प्रेमं केलीं; मग ही समोरची मुलगी कशी कधीं नजरेंत आली नाहीं ?––अशी तुला शंका आहे. नि दुसरं कारण, हिची श्रीमंती, हिचं रूप, शिक्षण नि सर्वांत जास्त म्हणजे हिचा तोरा ! बरोबर आहेत कारणं ?'

'बरोबर.'

'मग ऐक आतां. माझे आतांपर्यंत किती प्रेमभंग झाले असतील ?'

'असतील एक पांचपन्नास !'

'चूक. माझे आतांपर्यंत नव्याण्णव प्रेमभंग झालेयत.'

'आँ ?'

'हो. माझ्याकडे यादी आहे. आपल्या पांचवीच्या वर्गांतली सुमन तळपदे पहिली. पंचविसावी कमल दातार एकावन्नावी सुमित्रा कर्णिक. पंचाहत्तरावी सुजाता कोरडे. नव्याण्णवावी मालती गांवस्कर ! पंचाहत्तरी उलटली तेव्हां मीं शपथ घेतली कीं, आयुष्यांत प्रेमभंगांचं शतक पुरं करायचं, त्याचा इतिहास ठेवायचा, नि मग जी मुलगी सांगून येईल तिच्याशीं लग्न करायचं. मग ती कशीहि असो. लंगडी, थोटी, आंधळी वा मुकी ! नव्याण्णव प्रेमभंग झाले तेव्हां मीं आढावा घेतला ह्या नव्याण्णव जणींत चार सुमन होत्या, पांच विमल होत्या, शकुन्तला तर अकरा होत्या ! तीन–अक्षरी नांवाच्या एकंदर अठ्ठेचाळीस होत्या, तर दोन–अक्षरी नांवाच्या होत्या सदतीस.–'

'सद्या, ह्या थापा पुरेत !'

'मधू, विश्वास ठेव. अमितावरल्या खऱ्या प्रेमाची शपथ घेऊन सांगतों, सर्व खरं आहे हें ! या प्रेमभंगांत बहुतेक सर्व जातींच्या मुली येऊन गेल्या. या प्रेमभंगांत सव्वीस 'भंग' पत्रानं झाले. पंधरा मुलींच्या बापांकडून, एकोणीस आयांकडून, भावांकडून दहा, तर इतर नातेवाइकांकडून एकवीस. दोघी बिचाऱ्या अचानक वारल्या ! हं...तेव्हां मीं शतक पूर्ण करायचं ठरवलं. नव्याण्णवाचा आंकडा गांठला तेव्हां नक्की नकार देणारी मुलगी मला हवी होती. मग ही समोरची अमिता गांठली. सुस्वरूप, श्रीमंत, बऱ्याच जणांना नकार दिलेली. माझं शतक पुरं करणं तिच्या हातीं होतं ! पण काल तिनं मला पेंचांत टाकलं. तिनं आपण होऊन मला लग्नाबद्दल विचारलं. मधू, अरे हा प्रसंग पन्नासाव्या वेळीं येता तरी चाललं असतं. चौऱ्याहत्तराव्या वेळींहि चालला असता. पण आतां मी शपथेनं बांधला गेलों आहें. असा प्रसंग अगोदर कधीं आला नाहीं, नि आतां आला तर ऐन घोटाळ्याच्या वेळीं ! आतां मी काय करूं ?'

सद्याचा प्रश्न खरंच बिकट होता. अगदीं एकासाठीं त्याचं शतक हुकत होतं, त्याच्या शपथेवर पाणी पडणार होतं.

मीं म्हटलं, 'सद्या, प्रश्न खरंच गुंतागुंतीचा आहे. पण समजा, तूं जर ह्या अमितेलाच सगळं सांगितलंस--'

'तें झालं सांगून!'

'मग ती काय म्हणाली?'

'ती म्हणाली कीं तिचाहि एक असाच पण होता, नि तो मी जिंकला आहे!'

'कसला होता तिचा पण?'

'पण असा होता कीं, पुढं पुढं करणाऱ्या शंभर जणांना सरळ नकार द्यायचा, नि मग एकशेंएकावा कसाहि जरी असला--'

'सद्या, म्हणजे तिचं कांहीं तुझ्यावर--'

'मला त्याच्याशीं काय करायचंय्? माझं तिच्यावर निरतिशय प्रेम आहे! ह्या वेळीं मीं नकार देऊन प्रेमभंग ओढवून घेतला तर मी जगूंच शकणार नाहीं रे! तिला मी कसा नकार देऊं? मधू, तूं म्हणतोस तेंच खरं! मागलीं नव्याण्णव प्रेमं म्हणजे नुसतीं मृगजळं होतीं, नुसते बुडबुडे, नुसते भास! खरं प्रेम म्हणजे काय हें आज मला कळतंय्. अरे, तुला सांगतों ही अमिता म्हणजे रत्न आहे रे! रत्न आहे!'...

सद्या बोलत होता नि मी त्याच्याकडे 'आ' वासून पहात बसलों होतों!...

० ० ०

# ८ : हुकमी कथा

प्रधानसाहेबांचा शिपाई सेक्शनमध्यें येऊन हेडक्लार्क आय्यरनां जेव्हां म्हणाला कीं, 'साहेबानी कुलकर्णींना बोलावलंय,' तेव्हां अनंता चांगलाच हबकला ! आतां काय होईल नि काय नाहीं तें त्याला कळेना !

खरं म्हणजे त्याच्याच मनांत गेले कित्येक दिवस आपण प्रधान साहेबांना भेटावं असं होतं. पण प्रत्येक वेळीं मिथिलेनं त्याला अडवलं होतं. ऑफिसांत काम करतांना मधेंच त्याला लहर येई. त्याला वाटे, आपल्या कथेंतल्या नायकासारखं आपण खाडकन् उठून प्रधानसाहेबांकडे जावं, त्यांना वाटूं द्यावं कीं आपण रजा मागण्यासाठीं आलों आहोंत नि त्यांनी रजा मंजूर करण्याच्या मेहेरबानी नजरेनं वर पाहिलं कीं त्यांना म्हणावं, 'सर, मी कांहींसं धाडस करून आपल्याकडे आलोंय्. माझी एक विनंति–'

'बोला कीं. रजा हवी आहे ?'

'न–नाहीं सर. आमच्या सेक्शनमधें आपली भाची मिथिला आहे नं, तिला मी मागणी घालण्यासाठीं आलों आहें !'

–या इथपर्यंतच्या संवादापर्यंत आनंताच्या कथेंतला नायक अनंताजवळ सांगत असे. पण यावर प्रधानसाहेब अनंताला कांहीं सांगत नसत. अनंताची कथा इथें थबकून राही. आपण प्रधानसाहेबांकडे मिथिलेला मागणी घालायला गेलों कीं ते काय म्हणतील याबद्दल अनंताला काय, मिथिलेलाहि कांहीं

सांगतां येत नसे. वाटे. ते मोठ्यानं हसून टेबलावरल्या सिगारेटकेसमधून एक सिगारेट काढून तोंडांत ठेवतील, लायटरनं ती पेटवून एक दमदार झुरका घेतील, अनंताचं कुतूहल आणखी वाढवतील नि मग म्हणतील, 'शाब्बास! आमच्या मिथिलेनं नोकरीबरोबर सोबतीहि मिळवला वाटत!' पण एक घटकेंत वाटे, ते नाकावरला चष्मा नीट बसवून नेहमींच्या रागीट नजरेनं म्हणतील, 'तुम्ही कोण समजता हो स्वतःला? तुम्हाला इथं पगार मिळतो तो प्रेम करायला कीं काय? यू गो टू युअर सेक्शन. पुन्हां येऊं नका माझ्याकडे!'

अनंता असे वेगवेगळे विचार मिथिलेला सांगूं लागला कीं ती म्हणे, 'मामा मुळींच रागावणार नाहीत. ते उलट हसून म्हणतील, 'तुम्ही सेक्शन-मधें जाऊन मिथिलेला घेऊन या बघूं इकडे.' पण आतां त्यांच्या केबिनमधें तुझ्याकडे बघायची मला भारी लाज वाटेल. मामांनी कांहीं विचारलं तर बोलतांहि येणार नाहीं कांहीं!'

'तें मग बघतां येईल. पण मिथिला, असं खरंच होईल का? मला तर त्यांची जेव्हांजेव्हां आठवण होते तेव्हांतेव्हां त्यांचे रागीट डोळे नि तो रागीट चष्माच आठवतो! मला वाटतं, ते म्हणतील, 'तुम्हाला इथं यासाठीं पगार मिळतो का? गेट् आऊट!' ए मिथिला, का घरींच येऊन मी मागणी घालूं?'

'माझं ऐकायचं असेल तर कांहीं दिवस स्वस्थ राहा.'

'पण स्वस्थ राहून त्यांचा होकार मिळणार आहे का? असं असेल तर मी राहतों स्वस्थ!'

'तें मी कसं सांगूं रे? तूं म्हणजे किनई--'

अनंत तिचा हात धरून म्हणे. 'मी म्हणजे किनई अस्सा उतावळा आहें. फारच वाटलं तर मी तुला अश्शी धरून त्यांच्या समोर उभा राहीन नि म्हणेन--'

'पुरे पुरे. असं गोष्टींतच लिहावं!'

'ए, पण सांग नं! तुझे मामा देतील का परवानगी?'

'अं?... देतील कीं. मी हल्लीं त्या दृष्टीनं प्रयत्न करतेंय् जरा.'

'म्हणजे काय करतेस?'

'आमच्या मामांना वाचनाचा नाद आहे, ठाऊक आहे नं? गेल्या महिन्यांत तुझ्या दोन कथा छापून आल्या ना, त्यांबद्दल मी त्यांना सहज म्हणून विचारलं. त्यांना खूप आवडल्या होत्या त्या. त्यांच्या कानांवर मी अनंत कुलकर्णी हें नांव सारखं घालतें हल्लीं. त्यांचं तुझ्याबद्दल खूप छान मत झालं ना कीं मग एक दिवशीं मीच त्यांना सांगणार आहें, 'माझी नि तुमच्या ह्या अनंत कुलकर्ण्यांची ओळख झाली आहे; आज दुपारीं मी त्यांना तुमच्याकडे घेऊन येईन...' दुपारीं तुला घेऊन त्यांच्या केबिनमध्यें गेल्यावर त्यांना केवढं आश्चर्य वाटेल रे! तसे ते हुषार नि मिस्किल आहेत हं! त्यांच्या लगेच लक्षांत येईल सगळं! ते हंसतील, 'आमची ही मिथिला नेहमीं तुमचं कौतुक करायची. आतां लक्षांत आलं ह्या कौतुकापोटीं काय होतं तें!' मग ते हो कीं नाहीं कांहींच न बोलतां तुला म्हणतील, 'कुलकर्णी, आतां ह्यावरच एखादी झकास गोष्ट लिहा. नायक दाखवा लेखक नि नायिकेचं नांव ठेवा मिथिला.'

'मिथिला, तूं बोलतेस मोठी गोड हं! बाकी ह्या तुझ्या ओठांतून येणारे शब्द गोडच असायचे म्हणा...ए, असं झालं तर किती छान होईल!'

'असंच होईल. पण तूं जरा धीर धरायला हवा. वेड्यासारखी घाई करूं नकोस. मी माझ्या मामांना अगदीं चांगली ओळखतें. ते काय म्हणतील तें अक्षरन् अक्षर मी सांगूं शकेन. मात्र तूं उगाचच आधीं गेलास नि वेड्यासारखी मागणी घातलीस तर त्यांना आवडणार नाहीं.'

'बरं, तूं म्हणशील तसं. मी स्वस्थ राहतों.'

'पण कथा मात्र एकाहून एक छान लिहीत जा हं! मामांना मी सांगेन तें पटलं पाहिजे. लिहिशील ना? वचन दे पाहूं!'

अनंतानं वचन देण्यासाठीं हात पुढं केला कीं मिथिला हंसून म्हणे, 'वचन मात्र बराच वेळ ठेवूं नकोस हं हातावर. नाहींतर तूं म्हणजे—'

मिथिलेला वचन देऊन एक आठवडा झाला नाहीं तोंच अनंताला प्रधानसाहेबांकडे जायची वेळ आली—मात्र अगदीं वेगळ्या तऱ्हेनं!

त्या दिवशीं सकाळींच ऑफिसांत आल्यावर अनंता मिथिलेच्या टेबलाजवळ गेला नि म्हणाला, 'मिथिला, आपलं काम फत्ते होणार. तुझे मामाच काय, त्यांचा...म्हणजे तुझे आजोबा परवानगी देतील आपल्या लग्नाला!'

२९८०५

‘काय वाघबीघ मारला आहेस कीं काय ?’

‘वाघ काय मारणार मी ? साहेबांकडे जातांना दहा वेळा भ्यायला होतं मला.’

‘मग केलं आहेस तरी काय एवढं ?’

‘केलं नाहीं. करणार आहें.’

‘हॅत् तेरी.’

हॅत् तेरी काय ? आज संध्याकाळीं बघ.’

‘तूं सांग रे काय तें. असं कोडं नको घालूंस.’

‘सांगूं का ? मला आज इतकी सुंदर कथा सुचली आहे ! अगदीं हुकमी कथा आहे. कथा वाचून मामा आपण होऊन मला पत्र टाकतील, आमची भाची चि. सौ. कां. मिथिला--’

‘खरंच का रे इतकी छान कथा आहे ?’

‘देखती रहो, रानी ! वाटतं, कथा पुरी झाली कीं तशीच ती तुझ्या मामांकडे घेऊन जावी. त्यांना म्हणावं, ‘वाचा. संध्याकाळीं येऊन विचारून जाईन. कथा आवडली तर मिथिलेला मी मागणी घालणार आहें.’

‘चल, वेडा कुठला !’

‘खरंच, छान होणार आहे कथा. मला तर आतां राहवतच नाहीं. आज ऑफिसांतच लिहून काढणार आहें कथा. संध्याकाळीं देईन तुला वाचायला. का देऊं मामांनाच ?’

‘नको रे बाबा !’

ऑफिसांत अनंता कथा लिहीत बसला. दोन चार पानं लिहून झाल्यावर त्यानं तीं लगेच मिथिलेला वाचायला दिलीं. मिथिलेला फार आनंद झाला. ती म्हणाली, ‘खरंच रे. किती छान होतेय् कथा !’

अनंता कथा लिहीत असतांना त्याच्या बाजूनं त्याचा हेडक्लार्क अय्यर गेला तरी त्याचं लक्ष गेलं नाहीं. तो लिहीतच राहिला.

एवढ्यांत अय्यर त्याच्या टेबलाजवळ गेला. ‘मि. कुलकर्णी, हें ऑफिसचं काम करताहां कीं...’

अनंता दचकला !

'मी तुम्हांला गेले दोन तास पाहतोंय्. टेबलावरले महत्त्वाचे कागद तसेच आहेत तुमच्या. आज तीं दोन पत्रं साहेबांकडे जायला हवीं होतीं, ठाऊक आहे ना ?'

'पण सर—'

'छे छे, कांहीं सांगू नका. कृपा करून तुम्हीं लिहितांय् हे कागद–तेहि ऑफिसचेच आहेत वाटतं ? हे सगळे कागद माझ्याजवळ द्या. मी ते प्रधान-साहेबांच्या ताब्यांत देणार आहें.'

'पण –'

'कांहीं सांगूं नका. तुम्ही कागद द्या बघूं.'

अय्यरनं अनंताच्या टेबलावरले सगळे कागद भराभर गोळा केले नि ते घेऊन तो प्रधानसाहेबांकडे गेला.

सेक्शनमधले सर्वजण अनंताकडे पाहूं लागले. मिथिला तर घाबरूनच गेली. आतां प्रधानसाहेब काय करतील नि काय नाहीं, कळेना ! अनंता पांढराफटक पडला. जवळचे जुने कारकून मोठे खूष झाले. म्हणाले, 'ह्यांना अिथं मिळणारा पगार पुरत नाहीं म्हणून कांहींतरी भरकटून पैसे मिळवायला हवेत. घ्या म्हणावं आतां ! '

मिथिला अनंताजवळ गेली. तिला बोलायला कांहीं सुचेना. ती कशी-बशी म्हणाली, 'मला वाटतं, मामा खूप रागावतील. आतां कांहींच आशा नाहीं रे आपल्याला.'

प्रधानसाहेबांचा शिपाई सेक्शनमध्यें येऊन हेडक्लार्क अय्यरनां जेव्हां म्हणाला कीं साहेबांनीं कुलकर्णींना बोलावलंय्, तेव्हां अनंता चांगलाच हबकला ! साहेबांकडे आपल्या लिखाणाबद्दल बोलण्यासाठीं आपल्याला अशा तऱ्हेनं जावं लागेल अशी त्याला कथेसाठींसुद्धां कल्पना सुचली नव्हती.

अनंतानं साहेबांच्या केबिनचं दार हळूच लोटलं नि विचारलं, 'मे आय् कम् अिन् सर ? '

प्रधानसाहेबांच्या हातांत त्याच्या कथेचे कागद होते. त्यांचा चेहरा भयंकर संतापलेला दिसत होता.

'मे आय् कम् अिन् सर ? ' अनंतानं पुन्हां विचारलं.

साहेबांनीं कपाळावर आणखी एक आठी चढवली नि दाराकडे पाहृचलं.

'मे आय्...'

'येस्.' त्यांचा आवाज फार चढला होता.

अनंता त्याच्यासमोर उभा राहिला.

'मि. कुलकर्णी, हें...हें तुम्हीं लिहीत होतां?' अनंता गप्प राहिला.

'तुम्हीं ऐकतांय् ना मी काय विचारतोंय् तें?'

'हो'

'हें तुम्हीं खरडलं आहे?'

'हो.'

'तुमच्या टेबलावर अत्यंत निकडीचं असं काम किती आहे? कालचीं दोन पत्रं तयार आहेत?'

'न...नाहींत.'

'मग हें काय चाललं होतं?' साहेबांनीं टेबलावर जोरानं हात आपटला. त्यांचा राग त्यांच्या चेहऱ्यावर मावेना.

'सकाळपासून तुम्हीं हेंच लिहीत बसलां आहांत...तुम्हांला पगार मिळतो ह्यासाठीं नाहीं. समजलांत?'

'हो.'

'मग हें काय करीत बसलां होतां?...मि. कुलकर्णी, मला तुमचा फार तिरस्कार वाटतोय्. माफ करा, तुम्हीं आणखी एक क्षणभर जरी इथं राहिलांत तर माझ्या तोंडून काय जाईल तें सांगवत नाहीं. यू गेट् आऊट् फर्स्ट!'

'सर —'

'गेट् आऊट्. आय् से, गेट् आऊट्.' साहेब इतक्या जोरानं ओरडले कीं त्यांच्या केबिनच्या बाजूनं जाणाऱ्या सगळ्यांना कळलं, कीं आज कित्येक महिन्यांनंतर साहेब कुणावर तरी भयंकर चिडले आहेत.

अनंता आपल्या टेबलाजवळ आला नि हातांत डोकं धरून बसला. आपलं प्रेम सफल होणार नाहीं हें झालंच, पण नोकरी टिकली तरी खूप, असं त्याला वाटू लागलं. मिथिलेलाहि आपले मामा किती चिडले तें कळलं

नि ती रडायलाच लागली. तिनं आपल्या हेडक्लार्कची परवानगी घेतली नि ती लौकर घरीं निघून गेली.

अनंताला मिथिलेशीं बोलण्याचं धैर्यंच झालं नाहीं. दिवसभर तो सुन्न मनानं बसला होता. त्याच्या कानांवर बाकीच्या कारकुनांचं बोलण पडत होतं. कुणी म्हणत होते, त्याला 'वॉर्निग' मिळेल. कुणी म्हणत होते, त्याला नोटीस मिळेल...पण सगळ्यांचं एक मत होतं, कीं त्याला आतां मिथिला मात्र मिळणार नाहीं.

अनंताला जेव्हां ती 'हुकमी कथा' सुचली होती, तेव्हां त्यानं डोळ्यां-पुढं कितीतरी चित्रं रंगवलीं होतीं. या कथेमुळें मिथिलेचे मामा आपल्याला नक्की परवानगी देतील असं त्याला वाटलं होतं आणि आतां त्याच कथेमुळं त्याच्या प्रेमावर घाला आला होता. कुठल्या कुमुहूर्तावर ही कथा सुचली असं त्याला झालं. यापुढं लिखाणाला पूर्णविराम द्यायचा असा त्यानं निश्चय केला. आपण बरं कीं आपली नोकरी बरी असं त्यानं ठरवलं. पण नोकरी टिकेल कीं जाईल, गेल्यास दुसरी मिळेल कीं, नाहीं . . . त्याला कांहीं कळेना.

संध्याकाळीं सव्वापांच वाजतां सर्वजण जायच्या तयारीला लागले. अनंताहि दिवसभराच्या मानसिक त्रासानं शिणला होता.

हेडक्लार्क अय्यर त्याच्याजवळ गेला आणि म्हणाला, 'मि कुलकर्णी मला माफ करा. माझा हेतु कांहीं तसा नव्हता. पण कालचीं तीं दोन पत्रं... साहेबांनीं मला जबाबदार धरलं असतं त्यांबद्दल.'

अनंताला अय्यरचा असल्या ढोंगी बोलण्याचा संताप आला. त्याला वाटलं, की ह्याला सांगावं, 'तुम्हीं एकदम जे साहेबांकडे गेलांत त्यापेक्षां मला सांगून तीं पत्रं तुम्हीं पुरीं करून घेऊं शकलां असतां;' पण तो कांहीं बोलला नाहीं!

'मि. कुलकर्णी, मी कांहीं रदबदली करूं का साहेबांजवळ?'

'कांहीं नको!' अनंता एकदम उसळला. 'केलंत त्याचेच उपकार खूप झाले! माझं मी पाहून घेईन!'

अय्यरचा अपमान झाला. 'मि. कुलकर्णी, नवीन आहांत म्हणून बोलतांय् असं! मला वाटतंय्, तुम्हाला जर नोटीस मिळाली तर तुमचा

स्वभाव बदलायला फार मदत होईल.'

'माझ्या स्वभावाची आपण नका काळजी करूं. पुरे आतां. साडेपांच झाले, मी निघतों.' अनता म्हणाला.

सेक्शनमधें शिरणाऱ्या शिपायाकडे हंसत पाहात अय्यर म्हणाले, 'आपण जाऊं शकत नाहीं. साहेबांचा शिपाई पुन्हा बोलवायला आलाय् तुम्हांला.'

अनंत ओशाळला.

—अनंतानं कॅबिनचं दार जरास लोटल नि भीतभीत विचारलं, 'मे आय्...'

'येस्. कम् इन."

अनंताच्या कथेचे कागद साहेबांच्या हातांत होते.

'मि. कुलकर्णी, मला तुमचं स्टेटमेंट घ्यायचंय्. हें तुम्हींच लिहिलंत का?'

'हो.'

'तुम्ही नेहेमीं गोष्टी लिहितां?'

'हो. पण सर, ऑफिसांत मात्र मी कधीं कांहीं लिहीत नाहीं. आज अगदीं राहवलं नाहीं म्हणून प्रथमच...'

'हो कीं नाहीं एवढंच उत्तर हवं आहे. तुम्हीं नेहमी गोष्टी लिहितां?'

'हो.'

'प्रसिद्ध करतां?'

'हो.'

'कुठल्या नांवानं?'

'अनत कुलकर्णी.'

'अस्सं. आतां मी विचारतों तें सांगा.'

'...?'

'मी ही कथा वाचली; या गोष्टींत पुढं काय होतं? मला सगळी गोष्ट सांगा पाहूं.'

अनंता महदाश्चर्यानं त्यांच्याकडे पाहूं लागला.

प्रधानसाहेब मोठ्यान हंसले. म्हणाले, 'काय सुरेख गोष्ट आहे हो ही. उगाच नाहीं आमची मिथिला सारखं तुमचं कौतुक करीत. आतां लक्षांत आलं ह्या कौतुकापोटीं काय होतं तें.'

–अगदी हेंच वाक्य मिथिलेनं त्याला सांगितलं होतं आणि ती म्हणाली होती...

'कुलकर्णी, ही गोष्ट इतकी छान आहे, कीं मला तुम्हांला तुमची आजची चूक माफ केलीच पाहिजे.'

'थँक्यू, सर!'

'तुम्ही सेक्शनमधें जाऊन मिथिलेला घेऊन इकडे या.'

'सर, ती दुपारींच घरीं गेली.'

'मग इथं समोरच्या खुर्चीवर जरा वेळ बसा. माझं आत्तां आटपेल, आपण बरोबरच घरीं जाऊं.'

मामांच्याबरोबर अनंताला घरीं आलेला पाहून मिथिला आश्चर्य-चकित झाली. तशी मामा म्हणाले, 'मिथिला, ह्यांना मी गोष्ट पुरी करायला इथं आणलंय. ह्यांना मी म्हटलं, तुम्ही ह्यावरच आतां एखादी झकास गोष्ट लिहा. नायक दाखवा लेखक आणि नायिकेचं नांव ठेवा मिथिला.'

...तिथून बाहेर पडतांना मिथिलेनं अनंताच्या हातावर कागदांत घालून सुपारी ठेवली. सुपारी तोंडांत टाकतांना अनंतानं खालचा कागद वाचला. त्यावर तिरप्या हस्ताक्षरांत लिहिलं होतं––'अन् कथेचं नांव ठेवा – हुकमी कथा!'

० ० ०

# ९ : आणि अेक कारकून मरतो त्याची गोष्ट

‘ वाङमय – शोभेंतली रेग्यांची गोष्ट वाचलीत का ?’ मी कचेरींत शिरल्याबरोबर हेडक्लार्क ढवळयांनीं मला विचारलं.

मी आश्चर्यचकित झालों. सकाळीं कचेरींत शिरल्यावर ‘ आज उशीर कां ?’ ‘ आज अमुक एक केस जायला हवी लक्षांत आहे ना ?’ अशा प्रश्नांनीं दिवसाची सुरुवात करणाऱ्या ढवळयांनीं रेग्यांच्या गोष्टीबद्दल मला प्रश्न करावा ?

मी कांहींसा अचंब्यानं त्यांच्याकडे पाहूं लागल्यावर त्यांनीं मला पुनश्च तोच प्रश्न विचारला.

‘ नाहीं बुवा; नाहीं वाचली. काय आहे ती गोष्ट ?’

‘ एक कारकून उडत जातो त्याची गोष्ट. ’

‘ अच्छा. म्हणजे आपल्याच लाअीफ्वर आहे का गोष्ट ?’ मी उगाचच विचारलं. आतां आम्हीं कारकून आहोंत, गोष्टीच्या शीर्षकांत ‘ कारकून ’ हा शब्द आहे तेव्हां माझा प्रश्न अगदींच हास्यास्पद होता. पण कचेरींतल्या वरिष्ठांजवळ असेच बावळे प्रश्न विचारणं शहाणपणाचं ठरतं !

‘ हो. गोष्ट वाचल्यावर मला वाटलं, तुम्हांला सांगावं—’

‘ काय ?’

'कीं तुम्हींहि आपल्या बारटक्क्यांवर एक गोष्ट लिहा; इथंच लिहा; आज.'

'आँ ? अहो, टेबलावरच्या ह्या केसीस–'

'Let go तुम्हीं आज लिहाच एक गोष्ट नि तिला नांव द्या–' एक कारकून मरतो त्याची गोष्ट !'

✦ ✦ ✦

माझी ही गोष्ट शंभरावर एक टक्का खरी आहे. तुम्हीं तिच्यावर विश्वास ठेवावा अशी माझी इच्छा आहे. आणि नाहीं ठेवलांत तरी हरकत नाहीं. आमच्या कचेरीतल्या एकूण एक जणांचा ह्या गोष्टीवर विश्वास आहे.

— मीं म्हटलं खरं, पण त्यांत तुम्हीं आमच्या–आमच्या मंदा दारशेतकरला धरूं नका हं !

गोष्टींत मुलगी हवी म्हणून मी मंदा दारशेतकर हें नांव लिहिलं आहे. गोष्ट आहे बारटक्क्यांची पण प्रास्ताविकांत मला ह्या कुमारी दारशेतकरबद्दल कांहीं सांगितलं पाहिजे.

ही मंदा दारशेतकर दिसायला चांगली आहे. कचेरींत काम करणाऱ्या मुलींमध्यें ह ! हिचे डोळे भारी वात्रट आहेत; हिच्या कपाळावरल्या बटाहि वात्रट आहेत आणि हिचा मेंदूहि वात्रट आहे. हिची बुद्धि तीक्ष्ण आहे. बी. ए. ला ही दुसऱ्या वर्गांत पास झाली. कचेरींतल्या परीक्षेंत नेहमीं पहिली आली आहे. कुठलीहि केस ही चटकन् निकालांत काढूं शकते. प्रत्येक हेडक्लार्क म्हणतो, 'माझ्या सेक्शन्मध्यें मिस् दारशेतकर असेल तर कधींच काम सांचणार नाहीं !'

ही कुमारी दारशेतकर सारखी हंसत असते. सहज आणि मुद्दामहि. चटकन् बघणाऱ्याला वाटावं ही सहज हंसतेय् म्हणून पण खरं म्हणजे ती वात्रटपणानं हंसत असते. आम्हांला आतां कुठं हें कळूं लागलंय् ती सहज हंसत असतांना मनांत कुणाची तरी नक्कल करीत असते. ही फार सुंदर नकला करते. कोण कसं चालतं, कोण कसं बोलतं, कुणाची काय संवय आहे इथपासून तर––हें वाक्य मी गोष्टीच्या शेवटीं पुरं करणार आहें !

...हं ! तर सध्यां ज्या टेबलाशीं मी बसतों तिथं आमचे बारटक्के बसायचे. जी. पी. बारटक्के. हा बारटक्के इसम दिसायला गबाळा, कांहींसा

घाणेरडा असा होता. नाकांत सारखी तपकीर नि तोंडांत पान. त्याच्या ओठावर असलेल्या फ्रेंचकट मिशा मूळच्या काळ्याभोर होत्या. तपकिरीमुळं त्यांना आपल्या मूळ रंगाला मुकावं लागलं.

बारटक्केचं टेबल हा आमच्या कचेरीचा विनोदाचा विषय होता. त्याचं टेबल नेहमीं भरलेलं असे. उजवीकडे. डावीकडे, समोर सगळीकडें फायलींचे ढीग असत. तो टेबलाचा उपयोग त्यावर लिहिण्याऐवजीं फायली ठेवण्यासाठीं करीत असे. आम्हांला कचेरींत दर आठवड्याला टेबलावरल्या कागदांचा तपशील द्यावा लागतो. टेबलावर आठवड्याला किती काम आलं, मागलं एक महिन्याचं दोन महिन्याचं, किती काम उरलं आहे वगैरे सगळ्या गोष्टी त्या तपशिलांत द्याव्या लागतात नि मग वरिष्ठ अधिकारी जुन्या तुंबलेल्या कामाबद्दल आम्हांला जाब विचारतात.

बारटक्केनं आपल्या हयातींत कधीं हा तपशील बरोबर भरला नाहीं. टेबलावर दोनशें कागद असले तर तो एकोणतीस तीसचा आंकडा तपशिलांत भरत असे आणि मग हा खोटा आंकडा त्याला सारखा सतावीत असे. त्यानं रोज दोनतीन तास जादा काम करून पाहिलं. रविवारीं अगर सुटीच्या दिवशीं राबून पाहिलं. पण ह्या आंकड्यांचं नि बारटक्क्यांचं कधीं जुळलं नाहीं! वरिष्ठांनीं त्याला कितीदां तरी जाब विचारला पण बारटक्के खालीं मान घालण्याखेरीज कांहीं करूं शकला नाहीं. त्याच्या चेहऱ्यावरली काळजीची छटा, त्याचं टेबल सोडून न जाणं, कचेरींत अधिक वेळ काम करणं ह्या साऱ्या गोष्टी त्याच्या जमेच्या बाजूला असल्यामुळं त्याचं निभावलं जात होतं, इतकंच !

टेबलावरलं काम आपल्या कुवतीबाहेर गेलं कीं बारटक्के तीनचार महिन्यांची रजा घेई नि मग त्या रजेंत रोज कचेरीला येऊन आपल्या टेबलावरले कागद तो निकालांत काढीत असे. तपशिलांत पूर्वीं कधीं न दाखविलेले कागद ह्या रजेंत निकालांत निघत नि मग बारटक्के पुन्हां हुरूपानं कामाला सुरुवात करी दर तीन वर्षांनीं मिळालेल्या तीन महिन्यांच्या रजेंतले पावणेतीन महिने हा कचेरींत येऊन काम करी नि मग उरलेला पाव महिना घरीं विश्रांति घेई. ह्या रजेंत त्याला समाधान एवढंच असे कीं नव्या कागदांची भर न पडतां फक्त जुने कागद तो निकालांत काढूं शकत असे. नि कचेरीला

केव्हांहि येऊन जाऊं शकत असे. कुणीकुणी तर त्यासंबंधीं अशी दंतकथा सांगतात कीं एकदां त्यानं अशाच कामासाठीं तीन महिन्यांची रजा घेतली नि मग रजा संपली पण काम संपलं नाहीं असं पाहून त्यानं रजा वाढवूनहि घेतली होती ! !

बारटक्के कधीं कुणांत फारसा मिसळला नाहीं कीं कधीं कुणाशीं सुखदु:खाचे चार शब्द बोलला नाहीं. त्याच्या बोलण्यांतले विषय म्हणजे वरिष्ठांनीं दिलेला दम, आपल्या टेबलावर सांचलेलं काम आणि नवीन निघणारे हुकूमनामे ! बारटक्केचं जग हें एवढंच होतं. चारी बाजूंनीं फायलींच्या भिंती असलेलं. बारटक्केला काळजी होती ती आपल्या टेबलावरच्या कामाचीच फक्त. त्याला प्रेम होतं तें कचेरींतल्या कामाबद्दलच. त्यानं स्वत:साठीं कधीं विश्रांति घेतली नाहीं. स्वत:ची, बायका-पोरांची कधीं काळजी वाहिली नाहीं. जें केलं तें कचेरीसाठीं, त्या टेबलाभोंवतालच्या जगासाठीं !

—— आणि असा हा एकनिष्ठ कारकून एकाएकीं आजारी पडला. त्याला स्वत:ला कल्पना नसतांना ! एकाएकीं आजारी पडल्यामुळं त्याचा नाइलाज झाला; त्याला घरीं रहावं लागलं. ऑफिसमधलं फायलींच्या ओझ्यानं दबलेलं टेबल त्याच्यासाठीं नि:श्वास सोडूं लागलं. एक दिवस झाला. दोन दिवस झाले. तीन दिवस झाले.

टेबलावरलं काम वाढूं लागलं. एका आठवड्याचे कागद दुसऱ्या आठवड्यांत शिरले. एक महिन्याची जुनी फाईल सव्वा महिन्यांनीं म्हातारी झाली...टेबलाची अगदीं आबाळ झाली. त्यावरले कागद पोरके पडले.

बारटक्क्याचा ताप हटण्याचीं लक्षणं दिसेनात तेव्हां त्याला इस्पितळांत पोंचविण्यांत आलं. डॉक्टरांची, नर्सेसची, वार्डबॉईजची धांवपळ चालू झाली. पण आशेचा धागा हातीं येईना.

कचेरींतलीं माणसं बारटक्क्याच्या समाचाराला जात. त्याला धीर देत. पण बारटक्केला तें कांहीं नको असे. आपल्याला भेटायला आलेल्या हेडक्लार्कला तो म्हणे, 'सध्यां फारसे नवीन कागद देऊं नका हं. बरा झाल्यावर मी चार एक महिन्यांची रजा घेऊन टेबल अगदीं क्लिअर करून टाकीन...' आपण वरिष्ठांकडे पाठविलेल्या फाईलसची कुठवर प्रगति झाली आहे हें तो मोठ्या आस्थेनं विचारी.

त्या दिवशीं त्याला भेटायला म्हणून मी इस्पितळांत गेलों तर हा आशेनं कुणाची तरी वाट पहात असलेला दिसला. मला वाटलं, तार गेल्यामुळं त्याचे वडील नि मोठे बन्धू आज येणार असतील त्यांची हा वाट बघतोय्. मीं त्याला तसं विचारल्यावर तो म्हणाला, ‘ छे छे: ! मी आपल्या साहेबांची वाट पहातोंय्. ते आज येणार म्हणून कळलं होतं ’--

मी चाट पडलों.

मग तो म्हणाला, ‘ आज साहेब आले कीं त्यांना मी सांगणार आहे ’--

मोठ्या आशेनं मीं प्रश्नार्थक चेहरा केला.

‘ त्यांना मी माझ्या टेबलाची पोझिशन् क्लिअर् करून सांगणार आहें ’--

आणि मग साहेब आल्यावर बारटक्केनं त्यांना सगळं सांगितलं नि म्हटलं. ‘ साहेब, कांहीं करा पण माझ्या कॉन्फिडेन्शियल फाइलमध्यें कांहीं शेरा देऊं नका. ’

त्याच्या ह्या स्थितीला आपण कारणीभूत झालों आहोंत असं साहेबांना उगाचच वाटलं नि त्यांनीं बारटक्क्यांना हवं होतं तें वचन दिलं.

इस्पितळांत एक महिना झाला पण बारटक्केला आराम पडला नाहीं. डॉक्डरांनीं शर्थ केली पण खात्रीपूर्वक कांहीं सांगतां येंईना.

त्या दिवशीं डॉक्टरांनीं आम्हांला सांगितलें कीं, रोगी फार तर एक दिवसाचा सोबती आहे. तो स्पष्ट बोलतोय् त्यावर जाऊं नका. त्याची परिस्थिति फार बिकट आहे !

आम्हांला कांहीं सुचेना. मग कुणीतरी बारटक्क्यांच्या बायकोला बोलावून आणलं. त्यांच्या वडिलांना, भावांना बोलावून आणलं. आमचे हेडक्लार्कदेखील कचेरींतून अर्धातास लौकर आले.

बारटक्के सारखा तळमळत होता. त्यानं आम्हां सर्वांना जवळ बोलावलं नि म्हटलं, ‘ मी आतां जाणार. ह्यांतून कांहीं मी वांचत नाहीं. मला कांहीं सांगायचं आहे. शेवटलं---’

आम्हीं त्याच्या बायकोला, वडिलांना तिथं बसवलं नि बाहेर पडूं लागलों एवढ्यात तो म्हणाला, ‘ थांबा. जें सांगायचं आहे तें तुम्हांलाच. ’

तो आपल्या फंडाबद्दल, बायकापोरांबद्दल कांही सांगेल म्हणून आम्हीं ऐकूं लागलों. तशी तो हेडक्लार्ककडे वळून म्हणाला, 'सर टेबलावर मी जें काम सांठवून ठेवलंय् त्याबद्दल मला क्षमा करा.'

'वारटक्के, जाऊं दे. त्याचा तुम्ही कांहीं विचार करूं नका—'

'असं कसं चालेल ? मी टेबलाबद्दलच तुम्हांला सांगायचं म्हणून जवळ बोलावलं आहे.'

बारटक्केनं आपला क्षीण हात उचलला नि म्हटलं, 'माझ्या टेबलावर उजव्या बाजूला ज्या फायली आहेत त्या सगळ्या चार एक महिन्यांच्या आहेत. त्या तुम्हीं आपल्या सान्यांना विचारून निकालात काढा. कांहींचीं मीं टांचणं केलीं आहेत—'

बारटक्के सतत वीस मिनिटं बोलत होता. फक्त त्याबद्दल ! बायको-बद्दल, मुलांबद्दल, एक अक्षरहि तो बोलला नाहीं. शेवटीं तो म्हणाला, 'अगदीं कुणाला कांहींच जमलं नाहीं तर कुमारी दारशेतकरांना त्या फायली द्या. त्याच एकट्या हें करूं जाणे ! आणि तुम्हीं माझ्यावर एवढेच उपकार करा कीं माझ्या कॉन्फिडेन्शियल् फायलींत कुणाचाहि कांहीं वाईट शेरा येणार नाहीं एवढं पहा. तांबड्या शाईचा त्या फायलीला स्पर्शहि होतां कामा नये. माझी शेवटची इच्छा हीच आहे !'

बारटक्केनं माझा हात धरला नि म्हटलं, 'कांहीं करून माझं टेबल क्लिअर् करा. तुमचे उपकार—'

त्या कारकुनाचीं तीं शेवटचीं वाक्यं ऐकून माझं डोकं सुन्न झालं !

—दुसऱ्या दिवशीं आम्हीं अर्ध्या दिवसाची सुट्टी घेऊन बारटक्केचा अंत्यविधि केला !

बारटक्केला वचन दिल्याप्रमाणें मी त्याचं टेबल ताब्यांत घेतलं नि कामाला सुरुवात केली. इतकं काम मी कधीं कुणाच्या टेबलावर पाहिलं नव्हतं. इतक्या कामानं कुणालाहि भोंवळ आली असती.

रोज उशीरा बसून, रविवारीं कचेरीला येऊन मी कामाचा फडशा पाडूं लागलों. रणांगणावर निकारानें लढणाऱ्या एकाद्या शिलेदारासारखा मी त्या टेबलावरल्या फायलींवर तुटून पडलों.

पांच सात आठवडे झाले. त्या रविवारीहि कचेरीला आलों होतों. पण अचानक कांहीं काम निघाल्यामुळें मी नेहमींसारखा संध्याकाळपर्यंत न थांबतां दुपारींच तीन वाजतां घरीं गेलों. सोमवारीं कचेरींत येऊन पाहतों तर निकालांत काढलेल्या फायलींचा ढीग दाढलेला !

मला कांहीं कळेना. ज्या फायली मी वाचल्याहि नव्हत्या त्या फायली योग्य तो मजकूर लिहिला जाऊन निकालांत काढण्यांत आल्या होत्या. मी मीं आश्चर्यचकित होऊन सर्वांना विचारलं. 'कुणी काल दुपारीं कचेरीला आलं होतं का ' म्हणून, पण कुणीहि 'हो' म्हणेना ! टेबलावर तर फायली निकालांत निघालेल्या !

--आणि मी अक्षर पाहिलं तर बारटक्केचं ! बारटक्केचं अक्षर कसं आलं इथं ? का त्यानं आजारी पडण्यापूर्वींच हें लिहून टाकलं होतं ? मला कांहीं कळेनाच. मी त्या सर्व फायली वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठवून दिल्या.

पुढल्या रविवारींहि मी कचेरींतून दुपारींच परत आलों नि सोमवारीं बघतों तर आदल्या सोमवारचाच प्रकार. टेबलावर आणखी फायली निकालांत निघालेल्या नि त्यावर हस्ताक्षर बारटक्केचं. मी पुन्हां सर्वांजवळल चौकशी केली, पण कुणीहि माझं कोडं उलगडूं शकलं नाहीं.

मी खूप विचार केला नि मला आठवलं कीं, बारटक्केच्या बोलण्यांत त्या लिहिण्याबद्दल एक शब्दहि आला नव्हता. त्या फायली तशाच पडल्या आहेत. अस तो म्हणाल्याचंहि मला स्मरलं.

-- आणि माझ्या अंगावर सर्रकन् कांटा उभा राहिला. मी सर्वांना ही गोष्ट सांगितली, तेव्हां ढवळे म्हणाले, 'मला वाटतं, बारटक्केचा जीव ह्या टेबलावर भारी गुंतला होता. त्यानंच हें काम केलं असलं पाहिजे. मरणानंतर कांहीं जीव आशेवर जगतात, ठाऊक आहेना ?'

ढवळ्यांनीं म्हटलं त्याची 'री' कुमारी दारशेतकरनं हंसत हंसत ओढली आणि आम्ही सगळे घाबरून गेलों.

त्यानंतर आलेल्या शनिवारीं कचेरी सोडण्यापूर्वी आम्हीं सर्वांनीं बारटक्केच्या टेबलाची कसून पहाणी करून ठेवली नि रविवारीं कुणीहि कचेरींत यायचं नाहीं नि काय होतं तें पहायचं असं ठरवलं.

सोमवारीं आम्ही पहातों तर बारटक्केच्या टेबलावर निकालांत काढलेल्या कागदांचा ढीग होता. त्या सर्वांवर बारटक्केचंच अक्षर होतं.

आम्ही पुन्हां पुन्हां एकमेकांची खात्री करून दिली नि बारटक्केच्या ह्या मरणोत्तर जीवनाची कींव केली. मेल्यानंतरदेखील त्याला टेबलाशीं बसून फायलींचे ढीग उपसावे लागतात ह्याबद्दल आम्हां सर्वांना भारी वाईट वाटलं. बारटक्केनं आपल्या जिवंतपणीं खप सोसलं होतं; आतां तरी त्यान आराम करावा असं आम्हांला फार वाटूं लागलं तेव्हां ढवळ्यांनीं एक तोड काढली नि ती आम्ही मान्य केली.

त्यानंतरच्या शनिवारीं संध्याकाळीं आम्हीं एक पत्रक लिहिलं बारटक्क्यांना उद्देशून. आम्ही सर्वांनी त्यांना लिहून दिलं कीं 'एक आठवड्याच्या आंत तुमच्या टेबलावरला एकूण एक कागद आमच्याकडून निकालांत काढण्यांत येईल. तरी तुम्ही पुन्हां अशी तसदी घेऊं नये ! असेंच वचन आम्हीं सर्वांत वरिष्ठ अधिकाऱ्यांनाहि दिलेलें आहे. तेव्हां तें आम्ही पाळूंच पाळूं याबद्दल खात्री बाळगावी. किंचितहि तसदी घेऊं नये.'

हें पत्रक आम्हीं सर्वांनीं सह्या करून बारटक्क्यांच्या टेबलावर ठेवलं नि रविवारीं कुणीहि कचेरींत यायचं नाहीं असा निर्णय घेऊन कचेरी सोडली.

सोमवारीं कचेरींत आल्यावर आम्हीं धांवतच माझ्या टेबलाशीं गेलों.

——त्या पत्रकावर 'थँक्स्' असं लिहिलं होतं ! तें अक्षर बारटक्क्यांचंच होतं याबद्दल आमची खात्री पटली.

एक आठवड्याच्या आंत आम्हीं सर्वांनी त्या टेबलावर चढाई केली नि बारटक्क्यांच्या आत्म्याला दिलेलं वचन पुरं केलं !

ही गोष्ट सगळ्या कचेरीभर पसरली. प्रत्येकानं येऊन आमचं तें पत्रक पाहिलं नि त्या खालीं बारटक्क्यानं लिहिलेला तो शब्दहि पाहिला !

मरणोत्तर अतृप्त राहिलेल्या आत्म्याचा हा खेळ आहे. आपल्या कार्यावर एकनिष्ठपणे प्रेम करणाऱ्या एका कारकुनाची इच्छा इथं ह्या टेबलावर राबवली गेली याबद्दल कुणालाच संदेह नाहीं !

एक कारकून मरतो त्याची ही गोष्ट इथंच संपली. ही गोष्ट अक्षरश खरी आहे. आम्ही सर्वांनीं ही घडतांना पाहिली आहे. इतकं सांगितल्यावर

ह्या गोष्टीवर तुमचा विश्वास बसेल अशी माझी खात्री आहे. तुम्ही आमच्या कचेरींत कुणालाहि विचारा ह्याबद्दल. तो हेंच सांगेल. तुमचा कुणाचा विश्वास बसला बसला नाहीं तरी माझ्या कचेरींतल्या प्रत्येकाचा ह्या गोष्टी-वर विश्वास आहे.

—— पण मला मात्र त्या मंदा दारशेतकरबद्दल असं कांहीं खात्रीपूर्वक सांगतां येणार नाहीं. ही गोष्ट निघाली कीं, गंभीर चेहरा करण्याऐवजीं ती नेहमींसारखंच मिस्किल हंसूं चेहऱ्यावर आणते. मी सुरुवातीला म्हटलं आहे—— ती सहज हसतांना मनांत कुणाची तरी नक्कल करीत असते. कोण कसं चालतं, कोण कस बोलतं, कुणाची काय संवय आहे इथपासून तर कोणाच्या हस्ताक्षराचं कसं वळण आहे ह्या सगळ्यांची ती बरोबर नक्कल करते !!

आणि म्हणून तिच्याबद्दल मला संशय येतो ! वात्रटपणा करण्यासाठीं म्हणून तिनंच तर बारटक्केसारखं अक्षर लिहून...

० ० ०

## १० : लख्याची गोष्ट

माझ्या बहिणीचं ऑपरेशन ठरलं, तेव्हां हॉस्पिटल-मध्यें तिच्या सोबतीला कुणाला ठेवावं याबद्दल चर्चा सुरू झाली आणि शेवटीं, मीं सोडून बाकी सर्वांनीं माझं नांव सुचवलं. मीं भराभर निरनिराळीं कारणं पुढं केलीं; पण कुणी आपलं मत मागं घ्यायला तयार नव्हतं. उरला तो इलाज मीं केला; --म्हणजे कचेरींतलं महत्त्वाचं काम काढून पुण्याला पोबारा केला !

पुण्याला माझ्या काकाकडे मी गेलों आणि त्याला ही गोष्ट सांगितली, तेव्हां त्यानं मला मूर्खांत काढलं. तो म्हणाला, 'अरे, अशी संधि कधीं मिळत नाहीं ! मिळते तेव्हां ती तुझ्यासारख्यांना मिळते, आणि तुझ्यासारखे ती फुकट घालवतात, हा जगाचा अन्यायच आहे ! '

काका माझ्याच वयाचा.--माझ्याहून फार तर दोन पावसाळ्यांत अधिक भिजलेला; पण त्याच्या गांठीचा अनुभव मात्र माझ्यापेक्षां दहाबारा अधिक पावसाळ्यांचा होता.

'काका, तूं ही संधि समजतोस ? ' मीं त्याला विचारलं.

'अर्थातच ! कां समजूं नये ? ' काका उद्‌गारला, 'तुझी बहीण श्रीमंत आहे. तिचं ऑपरेशन अर्थातच मुंबईच्या एखाद्या खाजगी आणि महागऱ्या हॉस्पिटलमध्यें होणार. अशा महागऱ्या हॉस्पिटलमध्यें देखण्या आणि तरुण

नर्सेस् असतात. रात्रीं तुझ्या बहिणीला सोबत करणाऱ्या तरुण नर्सला तूं सोबत करायचीस, ही कांहीं मामुली गोष्ट नाहीं !'

'या महागऱ्या हॉस्पिटलची आणि तिथल्या शिष्ट नर्सेस्चीच मला भीति वाटते.' मीं म्हटलं, 'माझा मित्र लख्या वागळे ठाऊक आहे तुला ?'

'आहे ठाऊक. कुरळ्या केंसांचा, तपकिरी डोळ्यांचा आणि मुख्य म्हणजे राजा गोसावी ज्याच्यासारखा दिसतो, तोच ना लख्या वागळे ?'

——काका नेहेमींच असं उलटं बोलतो.

'हो, तोच लख्या ! त्याचीच गोट सांगणार आहें तुला मी.' मीं काकाला म्हटलं.

'त्यांच्या प्रेमविवाहाची ? अरे, मी गेलों होतों त्याच्या लग्नाला !' काका म्हणाला.

'तुझी–त्याची काय ओळख ?' मीं विचारलं.

'अशीच. मला त्यानं खास आमंत्रण दिलं होतं लग्नाचं !'

'काका, या लख्याची गोष्ट ऐक नि मग तूं सांग मला, हॉस्पिटलमध्यें मीं जावं कीं नाहो तें !' मीं म्हटलं.

'काय तें सांग तर खरं !' काका म्हणाला.

मीं काकाला लख्याची गोष्ट सांगायला सुरुवात केली.——

✦ ✦ ✦

लख्याला कुणी कधीं एकटं पाहिलं नव्हतं. जिथं राजा जठार तिथं लख्या वागळे. 'राजाची सिगरेट लख्याशिवाय कधीं पेटली नाहीं नि राजाशिवाय लख्याच्या तोंडांत कधीं चहा गेला नाहीं.' असं सगळ्या होस्टेलमध्यें म्हटलं जाई. कुणी प्रेमानं म्हणत, तर कुणी कुचेष्टेनं असं म्हणून पुढं म्हणत, ——'कारण, राजा जठारजवळ पैसे असतात; लख्या नेहेमीं कफल्लक असतो !

लख्या दरसाल परीक्षा पास होत होताच असं नव्हतं; आणि त्यामुळं त्याला होस्टेलमध्यें जागा मिळणंहि शक्य नव्हतं राजाच्या खोलींत तो राही. राजाचीं बहुतेक (शक्य तेवढीं) सगळीं कामं तो करी.——लाँड्रीमधून राजाचे कपडे आणणं, तो म्हणेल तेव्हां चहा बनवणं, सिगरेटी विकत आणणं, राजाचा हिशेब लिहिणं, दर महिन्याला तो तपासून त्याच्यांत योग्य ते बदल करून राजाच्या वडिलांकडे पाठवणं, राजाला अभ्यासापायीं वेळ होत नाहीं.

या सबबीवर त्याच्या वडिलांना पत्र लिहिणं, वेगवेगळीं कारणं शोधून काढून खर्चाला अधिकाधिक रक्कम मिळवणं, हीं सर्व जबाबदारीचीं कामं राजासाठीं लख्या करीत असे.

लख्या राजाच्या ना गांवचा, ना नात्याचा. राजा जितका श्रीमंत, तितकाच लख्या गरीब. पण लख्याकडे जीभ होती, अक्कल होती. लख्याचा सहवास नेहमीं हवाहवासा वाटणारा होता. त्याच्याजवळच्या गोष्टींचा सांठा, त्याचे विनोद, त्याच्या युक्त्या —छे: ! सारा खर्च करून कुणाहि राजानं लख्याला आपल्या पदरीं ठेवाव ! अशा गुणांचा हा लख्या वागळे राजा जठारला मनापासून आवडे. राजा त्याचे भरपूर लाडहि करी. म्हणून कधीं कुठल्या हॉटेलांत पैसे देतांना लख्यानं नाटकीपणानं आपल्या खिशांत हात घातला नव्हता, कीं राजानं पुढं केलेली सिगरेट ( कॅप्स्टन' देखील !— कारण राजाला '५५५' आणि 'गोल्डफ्लेक' लागे ! ) कधीं अव्हेरली नव्हती. लख्यानं राजाच्या शिंप्याकडे जसे राजासारखेच कपडे शिवायला टाकले होते, तसेच ते धुवायलाहि त्याच्या धोब्याकडे दिले होते !

होस्टेलमधल्या आम्हां सर्वांच्या मतें राजाच्या खर्चाचा दोनतृतीयांश भाग लख्यापोटीं असे.

त्य दिवशीं लख्याला काय लहर आली, कोण जाणें. राजा अभ्यास करीत बसला होता, एवढ्यांत लख्याला कसलीशी आठवण झाली. तो राजाला म्हणाला, 'राजा, तूं रागावलेला दिसतो आहेस आज.'

'नाहीं बुवा !' राजा म्हणाला.

'खोटं बोलूं नकोस. तूं माझ्यावर रागावला आहेस नि त्याचं कारणहि मला ठाऊक आहे.' लख्यानं म्हटलं.

'काय आहे कारण ?'

'बऱ्याच दिवसांत तूं चिनी हॉटेलांत जाऊन कांहीं खाल्लेलं नाहींस, याची मीं तुला आठवण करून दिलेली नाहीं; म्हणून तूं माझ्यावर चिडणं अगदीं स्वाभाविक आहे !' लख्या म्हणाला.

'छट् ! मी मुळींच रागावलेला नाहीं तुझ्यावर.' राजा उत्तरला.

'तूं कांहीं सांगूं नकोस ! मीं ओळखलंय्. मग आज दुपारीं येणार का ? आज 'मेस्'मध्यें खाडा सांगून येतों.'—लख्या म्हणाला.

खरं म्हणजे लख्यालाच आज चिनी हॉटेलांत जाऊन यथेच्छ खायच होतं. राजानं तें ओळखलं होतं.

दुपारीं राजाच्या खर्चानं भरपूर खाऊन घेऊन दोघेहि होस्टेलवर आले, आणि अति खाण्याचा परिणाम म्हणून कॉलेजकडे न वळतां दोघेहि झोंपून राहिले.

लख्याला अशी झोंप लागली होती कीं, तो कांहीं रात्रीं नऊपर्यंत उठला नसता. (नऊला मात्र त्याला उठायलाच हवं होतं; कारण त्याच्या रात्रीच्या झोपेची ती वेळ होती ! नऊला जागा होऊन तो पुन्हा रात्रींच्या झोपेला आरंभ करणार होता.) संध्याकाळीं त्याची जराशी झोंपमोड झाली. राजा ठकार कण्हत असल्यासारखं त्याला वाटलं ! पण राजाचं कण्हणं लौकरच थांबलं नि लख्याची झोंप पुढं चालू राहिली.

रात्रीं दहाचा सुमार होता. राजा जठारचं कण्हणं वाढलं होतं. त्यानं लख्याला हांक मारली.

'काय रे ? काय झालं ?' लख्यानं विचारलं.

'अरे, माझ्या पोटांत भयंकर कळा येताहेत !' राजा जठार सांगूं लागला, 'आतां सहन करणं शक्य नाहीं. हें चिनी हॉटेल बाधलं बहुतेक. आतां कांहींहि कर नि मला एखाद्या हॉस्पिटलयध्यें घेऊन चल. तिथं सगळी परीक्षा होईल.'

'पण आपण आपल्या डॉक्टरकडे--'

'नको. हॉस्पिटलमध्यें दोन दिवस पडून राहीन म्हणतों. शिवाय वडलांना कळल तर ते रागावतील नुसतं डॉक्टरकडें जाऊन आलों म्हणून ! पैशांचा प्रश्न नाहीं. कांहींहि करून तूं उत्तमांतल्या उत्तम हॉस्पिटलमध्यें चल.' राजा म्हणाला.

लख्यानं कपडे चढवले. खालीं जाऊन टॅक्सी आणली. शेजारच्या देशपांडेला उठवलं आणि तिघेजण एका मोठ्या प्रसिद्ध हॉस्पिटलकडे गेलों.

हॉस्पिटलमध्यें शिरल्यावर तिथल्या रुबाबानं लख्याचे डोळे दिपले जिकडेतिकडे स्वच्छ, कुणीं कुणाशीं बोलायचं नाहीं, हंसायचं नाहीं.

इतक्यांत एक देखणी नर्स समोरून आली. लख्या लगबगीनं तिच्या-जवळ गेला नि म्हणाला, 'माझ्या मित्राला घेऊन --'

'शूऽ ! तिकडे पलिकडच्या खोलींत डॉक्टरांचे ॲसिस्टंट आहेत !' नर्स म्हणाली.

'पण जरा--'

लख्यानं बाजूच्या खोलींत डोकावून पाहिलं. तिथं डॉक्टरांचे ॲसिस्टंट बसलेले होते.

'येस्. आंत या.' लख्याची चाहूल लागतांच डॉक्टरांच्या असिस्टंटनीं म्हटलं.

लख्या त्यांच्या खोलींत गेला, आणि म्हणाला, 'डॉक्टर, माझा मित्र-'

'त्यांना आंत आणा.' डॉक्टरांनीं फर्मावलं.

लख्याशीं कांहींहि न बोलतां त्यांनीं राजाला तपासायला सुरुवात केली.

'ऑपरेशन केलं पाहिजे-तावडतोब !' राजाला वरवर तपासून डॉक्टरांचे असिस्टंट म्हणाले.

'अँ ? मागाहून केलं तर नाहीं चालणार ?' राजा म्हणाला, 'माझे वडील गांवाला आहेत--'

'माझी परीक्षा चुकणार नाहीं. लगेच केलं पाहिजे ऑपरेशन !' डॉक्टरांच्या असिस्टंटनीं ठाम शब्दांत सांगितलं, 'आतां तुम्हांला ॲड्मिट् करून घेतों. कांहीं खायचं नाहीं, प्यायचं नाहीं. आतां पहांटे नर्स येऊन एनिमा देईल नि डॉक्टर सकाळींच ऑपरेशन करतील -सहा वाजतां.'

'पण डॉक्टर--'

'मला वेळ नाहीं आतां.' असं म्हणून त्यांनीं नर्सला हांक मारली. वॉर्डबॉय्नं आणि नर्सनं राजाला एका खोलींत नेलं. नर्सनं त्याला लगेच एक पुडी खायला दिली.

'ह्या खोलींत सोबतीला म्हणून कुणी तरी राहावं लागेल.' वॉर्डबॉयनं लख्याला सांगितलं, 'कुणाशीं बोलायचं नाहीं, मोठ्यानं हंसायचं नाहीं. हॉस्पिटलची शिस्त आहे ही.'

राजाच्या खोलींत दोन खाटा होत्या. एकीवर राजाला निजवण्यांत आलेलं होतं, नि दुसरी सोबतीच्या माणसासाठीं होती.

लख्यानं देशपांडेला होस्टेलवर पाठवलं आणि आपण हॉस्पिटलमध्यें रहायचं ठरवलं.

तिथल्या वासानं, त्या गंभीर वातावरणानं लख्याच्या पोटांत गोळा उभा राहिला. त्याला कांहीं सुचेना. आपल्याला चिनी हॉटेलांत खायची दुर्बुद्धि सुचते काय, राजाच्या पोटांत अचानक दुखायला लागतं काय, आणि ह्या महागऱ्या, मिजासखोर हॉस्पिटलांत आपल्याला यावं लागतं काय, हें कोडं त्याला उलगडेना.

रात्रीं दहा वाजतां नर्स आली. तिनं राजाची नाडी तपालली; ताप पाहिला आणि ती लख्याकडें ढुंकूनहि न पहातां निघून गेली. खरं म्हणजे ती जेव्हां खोलींत आली होती तेव्हां लख्याला तिला कांहीं सांगायचं होतं. त्याच्याहि पोटांत आतां बारीक कळा येऊं लागलेल्या होत्या. त्यासाठीं एखादा डोस मिळाला तर त्याला हवा होता. मोठ्यानं बोलून उपयोग नव्हता. तिथले महागरे डॉक्टर त्याचं पोट चिरायलाच निघाले असते !

आतां राजा जठार स्वस्थ पडून होता, आणि लख्या पाय पोटाशीं मुडपून झोंपला होता. मनांतल्या मनांत तो त्या चिनी हॉटेलला, तिथल्या चिनी आचाऱ्यांना 'जगात चिनी आचाऱ्यांसारखे आचारी नाहींत.' असं नेहेमीं ऐटींत सांगणाऱ्या डिसूझाला, शिव्या मोजीत होता.

जराशानं राजा त्याच्याजवळ आला नि म्हणाला, 'लख्या, ह्या ऑपरेशनमधून मी वांचेन ना ? कारण घरीं वडलांना, आईला कांहींहि न कळवतां इथं येणं--'

'अरे, डॉक्टरांचं निदान चुकणार नाहीं !' लख्या म्हणाला, 'ते म्हणाले आहेत. हें ऑपरेशन लगेच झालं पाहिजे. आणि हें अगदीं साधं आहे. कांहींहि भीति नाहीं यांत.'

'पण माझ्या पोटांत बरं आहे आतां.' राजा सांगूं लागला.

'कृपा कर आणि बोलूं नकोस. मला स्वस्थ झोंप आली तर हवी आहे. माझ्या पोटांत बरं नाहीं आहे आणि शिवाय तुझं ऑपरेशन पहांटे आहे, तेव्हां मला चारला तरी उठलं पाहिजे.' लख्यानं भिंतीकडे तोंड केलं आणि राजाला वाटेला लावलं

घड्याळांत बाराचे टोले पडले. राजाच्या पोटांतलं दुखणं थांबलं होतं. गादीवर पडल्या पडल्या तो विचार करूं लागला,—हें ऑपरेशन इतक्या तांतडीचं आहे ?...घरीं आईवडलांना न कळवता इथं येऊन ऑपरेशन करून

वाईट झालं तर?...का पळून जावं?--पळून जावं का?...

--राजानं खाटेवरून उठून हळूच खोलीबाहेर पाऊल टाकलं. कुणींहि जागं नव्हतं. आणखी एक पाऊल...आणखी एक...आणखी एक...

'कुठं जातांय्?' वॉर्ड बॉयनं जागं होऊन राजाला विचारलं.

'बाहेर, सिगरेट आणायला.' राजा उत्तरला.

'वा: राव! उद्यां ऑपरेशन आहे ना? बाहेर जातां यायचं नाहीं तुम्हांला.' वॉर्ड-बॉय्नं बजावलं.

'अरे, ऑपरेशन आहे तें माझ्या दोस्ताचं. मीच नाहीं का त्याला घेऊन आलों? मी सोबतीला राहिलों इथं.' राजानं पटकन् थाप ठोकली आणि पुढं पाऊल टाकलं.

हॉस्पिटलच्या बाहेर पडल्यावर राजानं टॅक्सी बोलावली नि तो होस्टेलवर गेला.

त्याला पाहून सर्वजण चाट पडले.

राजानं त्यांना सगळी हकीकत सांगितली.

'पण आतां पहांटे काय होईल?' एका सहाध्यायानं विचारलं.

'काय होणार?' राजा म्हणाला, 'ते बघतील तर पेशन्ट गेलेला! उद्यां माझे वडील येतील. मी त्यांच्याबरोबर जाईन, पैसे भरीन, कीं झालं! लख्या रात्रभर तिथं राहून सकाळीं येईल शंख करीत.'

✦ ✦ ✦

पहांटे पांच वाजतां नर्स आली. बघते तो कांटवर पेशन्ट नाहीं! म्हणजे? हा काय प्रकार आहे?

इतक्यांत तिचं लक्ष पोटावर हात ठेवून कळवळणाऱ्या लख्याकडे गेलं.

'हं! कळा असह्य झाल्यामुळं पेशन्ट लोळतलोळत दुसऱ्या कॉटवर गेलेला दिसतोय्?' तिनं मनाशीं म्हटलं.

वॉर्ड बॉयनं पडदा आणून ठेवला.

'उठा एनिमाची वेळ झाली!' नर्सनं लख्याला म्हटलं.

'आँ?' लख्या दचकला. क्षणभर तो रात्रभरचं दु:ख विसरला.

'वेळ नाहीं! चला, कपडे काढा. एनिमा दिला पाहिजे आतां. मोठे

डॉक्टर यायला फक्त अर्धा तास आहे. आज ऑपरेशन आहे तुमचं. ठाऊक आहे ना ?' नर्सनं म्हटलं.

'माझं ?—काय म्हणतां बाई, [illegible]' लख्या ओरडला.

"कृपा करून एक अक्षरहि बोलूं नका ! बॉय् ऽ !'—नर्सनं वॉर्ड-बॉय्ला हांक मारली.

लख्याला एनिमा देण्यांत आला. [illegible] इंजेक्शन देण्यांत आलं आणि तो अर्धवट शुद्धींत असतांना त्याला गाडीवर ठेवून गाडी ऑपरेशन–थिएटरमध्यें नेली गेली.

लख्याला ओरडून सांगायचं होतं; पण कुणी त्याला बोलूं दिलं नसतं, आणि गुंगी सारखी वाढत होती.

लख्याचं ऑपरेशन झालं ! डॉक्टरांनीं वांकड्या कात्रीनं 'अॅपेंडिक्स' बाहेर काढलं नि म्हटलं, 'आज जर ह्याचं ऑपरेशन केलं नसतं, तर हा दगावला असता. हें अॅपेंडिक्स केव्हां फुटलं असतं, सांगतां आलं नसतं. कालच हा इथं आला तें बरं झालं.'

'मी तपासल्यावरच म्हटलं, 'ऑपरेशन लगेच झालं पाहिजे हा अगदीं तयार नव्हता ऑपरेशनला. म्हणे, मला घरीं कळवलं पाहिजे...' अॅसिस्टंट डॉक्टरांनीं म्हटलं.'

'तुमचं निदान अगदीं बरोबर होतं !' मोठ्या डॉक्टरांनीं असिस्टंटच्या पाठीवर कौतुकाची थाप मारली.

सकाळीं राजा जठार, पहांटेच गांवाहून आलेले त्याचे वडील, होस्टेल-मधले विद्यार्थी लख्याची वाट पाहून थकले; पण त्याचा पत्ता नव्हता. कुणीतरी वाह्यात्पणें म्हटलं, 'तिथल्या नर्सबरोबर गप्पा मारीत बसला असेल तो लख्या ! आपण जाऊन सांगून येऊं कीं, ऑपरेशन राजाचं होतं आणि तो पळून आला आहे म्हणून.'

दहा वाजून गेले तरी लख्या आला नाहीं, तेव्हां सर्वजण हॉस्पिटल-मध्यें गेले.

'तुम्हाला कुणाला भेटायचंय् ?' तिथं त्यांना विचारण्यांत आलं.'

'एल्. पी. वागळे. काल आमच्या एका दोस्ताच्या पोटांत दुखायला लागलं, त्याच्याबरोबर—'

'पहिल्या मजल्यावर पांचवी खोली. ऑपरेशन पहांटेच झालं आहे.'

'कुणाचं ?' सगळ्यांनीं एकदम विचारलं.

'पेशंटचं. कॉलेज–स्टुडंट आहे ना तो ?'

सगळेजण धांवतच पहिल्या मजल्यावर गेले. त्या वयांत राजाचे वडील-देखील धांवत गेले.

पहिल्या मजल्यावर पांच नंबरच्या खोलींत नर्सेस्‌ची ये–जा चालली होती.

'इथं कुणाचं ऑपरेशन झालंय्‌ का ?' राजा जठारनं नर्सला विचारलं.

'हो, कुणी कॉलेजचा विद्यार्थी आहे.' नर्स उत्तरली.

'नांव काय ?'

'आर. के. जठार.' नर्सनं सांगितलं.

'आर. के. जठार तर मी आहें.' राजा म्हणाला, 'काल रात्रीं मी इथं आलों होतों.'

'तुम्ही आंत येऊन बघा हवं तर.' नर्स म्हणाली, 'ॲपेंडिक्सचं ऑपरेशन होतं. आज ऑपरेशन झालं नसतं तर यांची परिस्थिति फार कठीण होती, असं मोठे डॉक्टर म्हणाले.'

—आणि खोलींत गेल्यावर सर्वजण गार झाले !

कॉटवर लख्या बेशुद्धावस्थेंत पडलेला होता आणि एक नर्स तिथं सारखी बसून होती.

तिनं ऑपरेशन–थिएटरमधून बाटलींत ठेवलेलं ॲपेंडिक्स आणून सर्वांना दाखवलं

एवढ्यांत ॲसिस्टंट डॉक्टर खोलींत आले. त्यांनीं राजाच्या वडलांना नमस्कार केला नि म्हटलं, —'

'आपण श्रीयुत जठार का ?'

'हो.' राजाचे वडील उत्तरले.

'आपल्या चिरंजिवांचं ऑपरेशन झालं तें चांगलं झालं. काल तो आला. त्याला तपासल्यावरोबर मी ओळखलं कीं, ही ॲक्यूट केस आहे, ऑपरेशन लगेच व्हायला पाहिजे.'

'पण डॉक्टर—'

'नो नो ! सगळ्या वडलांना असंच वाटतं; पण आमचं निदान चुकत नसतं !'

'डॉक्टर, काल इथं आलेला माझा मुलगा आतां माझ्या शेजारीं उभा आहे.' राजाचे वडील डॉक्टरांना म्हणाले, 'आणि त्याला पोंचवायला आलेला त्याचा दोस्त--लख्या वागळे--याचं ऑपरेशन झालेलं आहे !'

'मग हें अॅपेंडिक्स--'

काल रात्रींच त्याचं पोट दुखूं लागलं होतं, डॉक्टर !' राजा म्हणाला.

--सगळ्यांची हंसतांहंसतां पुरेवाट झाली.

डॉक्टर जातांना पुन्हां म्हणाले, 'आमचं निदान चुकणार नाहीं. याचं ऑपरेशन तर करायलाच हवं होतं !'

✦ ✦ ✦

काकाला मी लख्याची गोष्ट सांगितली नि म्हटलं, 'काका, तूंच सांग आतां, ह्या मोठ्या हॉस्पिटलमध्यें बोलायचीदेखील चोरी ! तिथं असं कांहीं झालं म्हणजे ? आणि तुला दिसतात देखण्या आणि तरण्या नर्सेस् ! आतां या नर्सेस्चा विचार करायचा, कीं जिवाचा करायचा ?'

'मी तरी नर्सचाच विचार केला असता !' काका सिगारेट शिलगावीत म्हणाला, 'कारण लख्याच्या लग्नाला तूं गेला नव्हतास नि मी गेलों होतों.'

'म्हणजे ?'

'म्हणजे असं, तुझ्या ह्या लख्या वागळेची बायको फारच देखणी आहे. लग्नापूर्वीं ती एक नर्स होती, आणि एका मोठ्या हॉस्पिटलमध्येंच लख्याचं नि तिचं प्रेम बसलं होतं. ठाऊक आहे ?'

'मग तेंच हॉस्पिटल असणार !' मी म्हटलं.

'अलबत् ! त्याशिवाय इतकी देखणी बाई...' काकानं आपलं नेहमींचं पुराण चालू केलं ! माझा प्रश्न तसाच राहिला.

० ० ०

# ११ : एक चित्रकार, एक जाधवराव आणि एक सुंदर तरुणी

मी एक चित्रकार आहें. गोष्ट कशी सांगावी, त्यांत किती मसाला घालावा, सुरवात आणि शेवट यांचीं टोकं एकमेकाला कशीं जोडवींत हें सारं मला अज्ञात आहे. पण तरी ही गोष्ट सांगितल्याशिवाय मला चैन पडणार नाहीं. ही सांगोवांगीची गोष्ट नाहीं. स्वतः पाहिलेली गोष्ट आहे. या गोष्टीची सुरवात मी पाहिली आणि आश्चर्यकारक रीतीनें तिचा शेवट पहाणेंहि माझ्या नशिबीं होतें. त्या शेवटच्या वेळीं माझी चित्रकला उपयोगी पडली हेंहि विशेषच ! गोष्ट जशी घडली, जशी आठवते आहे, तशीच मी सांगणार आहें. गोष्ट शंभर टक्के खरी. अशा गोष्टी घडतात कीं नाहींत असा प्रश्नच उद्भवणार नाहीं. कारण मी स्वतः ती पाहिलेली आहे. माझ्यावर माझा पूर्ण विश्वास आहे !

माळीनगरला एका श्रीमंत व्यापाराच्या पिताजींचें भलेंमोठें तैलचित्र करण्याचं काम मला मिळालं होतं. मुंबई ते पुणें पहिल्या वर्गाचा प्रवास, पुण्याहून माळीनगरपर्यंत एस्. टी. चा प्रवास. असा जातांनाचा आणि नंतर येतांनाचा प्रवासहि त्या व्यापाऱ्याच्या खर्चांत होता नि वर मला चार आंकडी रक्कम मिळणार होती. माझी मुबईंतलीं कामं दूर ठेवून मी माळीनगरला

गेलों. तिथं आठ दिवस राहून काम पुरं केलं आणि परत यायला निघालों. तो श्रीमंत व्यापारी मला आपल्या मोटारनं मुंबईला नेणार होता पण ऐत्या-वेळीं त्याची मोटार बिघडली आणि मला एस्. टी. नें निघणंच क्रमप्राप्त होतं. व्यापाऱ्यानं माझी जागा रिझर्व करून ठेवली नि दुसऱ्या दिवशीं मीं माळीनगर सोडलं.

एस्. टी. मध्यें माझ्या मागल्या बाकावर एक बाई बसली होती. तिशीजवळची. देखणी, तरतरीत आणि अतिशय आकर्षक. तिच्या गोऱ्यापान गळ्यांत काळंभोर मंगळसूत्र शोभून दिसत होतं आणि ती आतां कुणाचीही होऊं शकणार नाहीं म्हणून बघणाऱ्याला सांगत होतं. त्या बाईचं एकादं पोर्ट्रेट काढावं अस मला वाटलं. ही इतकी देखणी बाई कुठं निघाली होती ? एकटीच, थोडंसंच सामान बरोबर असलेली——

एस्. टी. चालू झाली. मीं बसल्याबसल्या त्या बाईबद्दल तर्ककुतर्क करीत होतों. पुढल्या टप्प्याला मोटार थांबली. कांहीं उतारू आंत आले. त्या निमित्तानं मी वळलों आणि त्या बाईकडे मी पुन्हां एकदां पाहून घेतलं.

एवढ्यांत तो आला. पांढरंशुभ्र धोतर, रेशमी शर्ट, चौकट्यांचं डिझाइन असलेला गरम कोट आणि डोक्यावर फौजदारी टोपी. त्यानं आपल्या दोन भुवया शेंदरानं जोडल्या होत्या. मिशीला टोकं काढलीं होतीं आणि ओंठ पानानं रंगवले होते. तो मनुष्य मला मुळींच आवडला नाहीं. देखणेपणासाठीं शेंदूर लावणारीं नि गंधाच्या ठिकल्या लावणारीं माणसं मला आवडत नाहींत. तीं मला चंगीभंगी वाटतात. त्या माणसाचं नांव मी योजलं जाधवराव जगदाळे.

जाधवरावानं सगळ्या बाजूनं नजर फिरवली आणि त्या देखण्या, तरुण बाईवर ती अलगद ठेवून दिली. तो सरळ पुढं झाला आणि त्या बाई-शेजारीं बसला. त्याचं तें तसं वागणं मला तिरस्कारणीय वाटलं आणि त्याच्या कपड्यांच्या अत्तरानं मी आणखीनच चिडलों. हा जाधवराव त्या बाईशीं लगट केल्याशिवाय राहणार नाहीं अशी माझी खात्री झाली.

माझं सगळं लक्ष मागल्या बाकावर होतं. जाधवराव त्या तरण्या बाईजवळ किती लगटून बसला असेल, त्याचा दंड तिच्या दंडाला कसा स्पर्श करीत असेल, त्याची नजर तिच्या अंगप्रत्यंगांवरून कशी फिरत असेल याची

मी कल्पना करीत होतों, मध्येंच मागें वळून त्याची कृति माझ्या कल्पनेशीं किती जुळते याचा अंदाज घेत होतों.

...आतां जाधवरावानें बोलायला सुरवात केली होती. मी ऐकूं लागलों.

'कुठं जायचंय तुम्हांला ?' जाधवराव त्या तरुणीला प्रश्न करीत होता.

'कल्याणला. माझा भाऊ तिथं आजारी आहे. त्याला भेटायला चाल-लेंय मी.'

'असं ! पण एकटयाच निघाल्यात ?'

'हो. घरीं कुणी मोकळं नव्हतं. यांचा धंदा-रोजगार, पोरांची शाळा–जायला तर हवं. मग काय करणार ? निघालें एकटी.'

जाधवराव नक्की आनंदला असणार हें ऐकून !

'तुम्हीं कुठं जाणार आहांत ?' तिनं जाधवरावाला विचारलं.

'मुंबईला. माझा व्यापार आहे तिथं. चार पांच वर्षांनी एकदां येतों इकडे काकांना भेटायला.'

मग त्या तरुणीनं त्याला कांहींच विचारलं नाहीं. तोहि गप्पच होता.

नेहमींप्रमाणं कुठंतरी कांहीं बिघडलं मोटारीचं. रस्त्यांत मध्येंच ती उभी राहिली. 'पुन्हां ती दुरुस्त होऊन चालूं लागायला दोन तास लागतील, असं ड्रायव्हर सांगूं लागला. गाडींतले उतारू शिव्या देत खालीं उतरले. मी बसूनच राहिलों. कारण माझ्या मागल्या बाकावरले दोघेहि उतारू बसून होते.

'आतां फार उशीर होणार. नाहीं ?' त्या तरुणीनं जाधवरावांना विचारलं, 'तुम्हांला मुंबईची गाडी कशी मिळणार आतां ?'

'नाहीं मिळाली तर नाहीं. तिथं-पुण्याला कुठंतरी हॉटेलांत राहीन रात्रीं. सकाळीं जनता गाडीनं जाईन बॉम्बेला. तुम्ही काय करणार ? तुमची नि माझी गाडी एकच.'

'मला प्रश्नच आहे. पुण्याला रात्र होणार पोंचायला.'

'तुमची हरकत नसेल तर सांगूं का ?'

'सांगा.'

'माझ्यावर विश्वास आहे ना ?'

'आहे.'

'मग तुम्हीं काळजी करूं नका. तुम्ही रात्रीं पुण्याला रहा. सकाळच्या गाडीनं निघूं आपण. तुम्हाला थेट कल्याणपर्यंत माझी सोबत आहे.'

'बरं झालं. देवच भेटला.'

'थोडा चहा घेणार का ? गाडी सुटायला अवकाश आहे बराच. जवळच्या हॉटेलांत जाऊन येऊं.'

तीं खालीं उतरलीं. मीहि उतरलों. हॉटेलांत त्यांच्या जवळच्या टेबलावर बसलों. त्यांच बोलणं ऐकत.

जाधवरावानं त्या तरुणीचा विश्वास एव्हांपर्यंत संपादला होता. आतां मला त्या तरुणीची कींव वाटूं लागली.

मोटार पुन्हां सुरूं होईपर्यंत बराच वेळ गेला. तेवढ्यांत दोघांचं बरंच बोलणं झालं होतं. मी खेरीज करून प्रत्येक उतारूला वाटत होतं कीं तीं दोघं बरोबरीनंच प्रवास करताहेत !

पुणं येइपर्यंत अंधार पडला. मुंबईची गाडी मिळणं शक्य नव्हतं. मोटारींतून मीं पाऊल बाहेर टाकलं आणि लगेच स्टेशनजवळच्या हॉटेलचा रस्ता पकडला. जाधवराव आणि ती बाई कुठं गेली तें पहायला मी विसरलों.

हॉटेलमध्यें मला जागा मिळाली. मॅनेजरनं माझं नांव लिहून घेतलं आणि माझ्या हातांत खोलीची किल्ली दिली. माझ्या जवळचा कॅमेरा आणि एक दोन किमती वस्तू मी मॅनेजरच्या ताब्यांत दिल्या नि त्याला मला पहांटे चार वाजतां उठवायला सांगितलं. चारला उठून आंघोळ वगैरे उरकून सकाळच्या पहिल्या गाडीनं मी मुंबईला जाणार होतों.

आणि त्याच जिन्यानं जाधवराव वर येत होता. माझ्याच हॉटेलमध्यें. त्याच्या मागून ती तरुणी येत होती. निर्धास्तपणें भावाबरोबर बहिणीनं किंवा दीराबरोबर वहिनीनं ज्या निर्धास्तपणें जावं तशी. मला तिची फार कींव, आली पण मी काय करूं शकणार होतों ?

जिन्यांतल्या अंधुक उजेडांत दोघांनींहि मला ओळखलं नाहीं.

स्टेशनांतून एक चक्कर मारून मी हॉटेलांत परत आलों. जेवलों आणि मॅनेजरनां पहांटे उठविण्याची आठवण देऊन लगेच झोंपीं गेलों.

पहांटे चार वाजतां मॅनेजरनी मला उठवलं. उठून मी तोंड धुतलं. आंघोळीला गरम पाणी तयार असलेलं पाहून मी खूष झालों. आरामांत आंघोळ करायला म्हणून मी बाथरुममध्यें गेलों आणि दोन तांबे पाणी अंगावर घेतों न घेतों तोंच मला कुणातरी स्त्रीच्या हुंदक्यांचा आवाज ऐकूं आला. मॅनेंजरच्या इथं कुणीतरी स्त्री रडत होती.

आंघोळ आटपूट मी चटकन् बाहेर आलों आणि पहातों तों कालच्या मोटारींतली स्त्री गदगदून रडते आहे. तिचे केस तिस्कटले होते, कुंकवाचा फराटा गेला होता. डोळे सुजले होते. पोलक्याच्या गुंड्या तुडल्या होत्या. पदर अस्ताव्यस्त झाला होता.

माझ्या जाधवरावाविषयींचा कयास बरोबर ठरला होता ! ती स्त्री रडत रडत मॅनेजरला आणि मला सांगूं लागली कीं, त्या हलकटानं रात्रीं तिची अब्रू घेतली होती. त्या स्त्रीला पोलिसांना वर्दी द्यावयाची होती ती सारखी पोलिसांना बोलवा म्हणून म्हणत होती.

'बाई, किती वाजतां घडला हा प्रकार ?' मी तिला विचारलं.

'साडेअकराला. मी साडेअकराचा टोला ऐकला तेव्हां.'

'आतां वाजले आहेत साडे चार. किती उशिरा तुम्हीं हें सांगतां आहांत ! प्रकार घडला तेव्हां तुम्ही ओरडला असतांत तर कुणी धांवलं असतं. तुमची अब्रू वांचवतां आली असती आणि त्या बदमाशाला पोलिसांच्या हवालींहि करतां आलं असतं. आतां कांहींच करणं शक्य नाहीं. पोलीसहि तुम्हांला हेंच विचारतील कीं प्रकार घडला तेव्हां तुम्हीं ओरडलां कां नाहींत ?'

'मग मॅनेंजरसाहेब, आतां मी काय करूं ?' ती स्त्री विचारूं लागली.

'तुम्हीं आतां गप्प रहावं हेंच ठीक. तुम्ही तोंडबिंड धुवा, कपडे बदला आणि पहिल्या गाडीनं जा. पोलिसांना बोलावण्यांत तुमच्या अब्रूला आणखी धोका आहे.

मॅनेजरनं त्या बाईची समजूत घातली. खोलीकडे जातांता मी जाधवरावाच्या खोलीकडे नजर टाकली. पलंगावर बसून तो शांतपणें विडी ओढत होता. त्याच्या चेहऱ्यावर किंचित्‌देखील शरम नव्हती.

मी कपडें बदलले. मॅनेजरकडून माझा कॅमेरा घेतला, इतर सामान घेतलं आणि बिल देऊन मी स्टेशनावर गेलों गाडीला अजून अवकाश होता. तेवढ्यांत स्टेशनाव' माझा एक मित्र भेटला. त्याच्याशीं बोलण्यांत वेळ केव्हां निघून गेला तें कळलंच नाहीं. गाडीची वेळ झाली आणि मी धांवतच पहिल्या वर्गाचा डबा गांठला. डब्यांत मुळींच गर्दी नव्हती. नाहीं म्हणायला कोपऱ्यांतल्या बांकावर एक जोडपं--

छे: ! तो जाधवराव होता आणि त्याच्या खांद्यावर मान टाकून ती स्त्री बसली होती.

आश्चर्यानं मी बघतच राहिलों. हें काय अघटित मी पहात होतों ? पहांटे या माणसाला पोलिसांच्या हवालीं करा म्हणून रडणारी ही स्त्री त्याच्या खांद्यावर मान टाकून बसली होती ? ज्यानं तिचा गळा सफाईनं कापला होता त्याच्या खांद्यावर निर्धास्तपणें हिनं मान ठेवली होती ? भावानं बहिणीला, दीरानं भावजयीला फसवलं होतं ?

गाडींत कुणाचीहि तें जोडपं असल्याचीच कल्पना झाली असती अशा तऱ्हेनं तीं दोघं बसलीं होतीं, बोलत होतीं, हंसत होतीं. मला वाटलं, केवळ नाइलाजानं किंवा या जाधवरावाच्या कांहींतरी दडपणामुळं ही स्त्री अशी वागत असेल. मनांत नसतांना.

कल्याण स्टेशन जवळ आलं. आतां ही स्त्री उतरेल आणि आपल्या आजारी भावाला भेटायला जाईल, त्याला बरं असेल तर ही त्याच्याजवळ ह्या हरामखोर जाधवरावाची गोष्ट सांगेल अशी मी कल्पना केली.

-- परंतु ती स्त्री कल्याणला उतरली नाहीं !

म्हणजे ? जाधवरावानं हिच्यावर काय जादू केली ? कां हिला या अवस्थेंत आपल्या भावाला तोंड दाखवायला लाज वाटत असेल ? आणि तसं जर वाटत असेल तर आपल्या नवऱ्याला आपल्या मुलांना ही तोंड कसं दाखवू शकेल ? आपल्या नवऱ्यापुढं बायको म्हणून, मुलांपुढं आई म्हणून ही कशी उभी राहील ?

आपण कल्याणाला आजारी भावाला भेटायला निघालों होतों ही गोष्ट ती जाणून बुजून विसरली होती. त्या क्षणीं ती जाधवरावाची पत्नी होती. त्याच्याबरोबर ती जाणार होती.

बोरीबंदरला तीं दोघं उतरलीं. त्यांच्या बाजूनं मी चालत गेलों. त्यांच्या बोलण्याचा अंदाज घेतला. जाधवराव तिला कुठंतरी हॉटेलांत येण्याबद्दल सांगत होता.

...ही गोष्ट इथं संपली. मीं जशी पाहिली तशी मीं सांगितली आहे. घरीं आल्यावर मी माझ्या स्नेह्यांना ही गोष्ट सांगितली तेव्हां त्यांचा विश्वास बसला नाहीं. मुळींच बसला नाहीं. जें सरळ घडलं त्यावर ते विश्वास ठेवूं शकले नाहींत; परंतु जेव्हां वेगळं, अतर्क्य घडलं तेव्हां त्या अतर्क्यावर त्यांना प्रथम विश्वास ठेवावा लागला आणि म्हणून न हि गोष्टीवर त्यांचा विश्वास बसला.

बोलपटांत मध्यंतर येतं आणि मग उरलेला कथाभाग येतो तसंच झालं इथं. मध्यंतरापर्यंतची ही गोष्ट होती हें मागाहून पांचएक वर्षांनीं कळलं. तोंवर मी या गोष्टीचा शेवट इथं धरला होता. पुन्हां कधीं या गोष्टीवर विचार केला नव्हता.

माळीनगरला ज्या व्यापाऱ्याकडे मी गेलों होतों त्याच्या मुलाचं मला पत्र आलं. तो व्यापारी मध्यंतरीच्या काळांत वारला होता आणि आजोबां सारखंच त्याचं पोर्ट्रेट करायचं काम त्या मुलानं माझ्यावर सोंपवलं होतं. चार आंकडी रक्कम आणि पहिल्या वर्गाचा प्रवासखर्च.

माळीगरला मी जायला निघालों तेव्हां मात्र मला या जाधवरावाच्या गोष्टीची आठवण झाली. कां कोण जाणे, मला वाटूं लागलं कांहींहि करून माळीनगरला जायलाच हवं ! कुणीतरी मला तिकडे खेचीत होतं.

माळीनगरचं काम उरकलं. खिसा पैशांनीं भरून मोठ्या उत्साहानं मी मोटारींत पाऊल टाकलं. मोटार सुरूं व्हायला अजून अवकाश होता. मी मोटारस्टँडवर नजर टाकली. हॉटेलांत बसून ड्रायव्हर – कंडक्टर गप्पा मारीत होते. हमालांची धांवपळ चालूं होती. एका हमालाच्या डोक्यावरलं सामान पडलं आणि मोठा आवाज झाला. मी तिकडे पाहूं लागलों.

आँ ? मी काय पहात होतों ? तीच स्त्री पुन्हां भेटत होती ! या पांच वर्षांत तिच्यांत किंचित्‌हि बदल नव्हता ! देहावर जाऊं द्या, पण कपड्यांत तरी बदल ? छेः, जणूं गेल्या वेळींच आम्हीं भेटत होतों.

ती स्त्री हळूहळू मोटारजवळ आली. तिला माझ्या मागलीच जागा मिळाली. हेंहि गेल्या वेळेसारखंच घडलं होतं.

माझी हुरहूर सारखी वाढत होती. वाटतं होतं, कांहींतरी अघटित घडणार आहे, सारखं लक्ष ठेवलं पाहिजे. डोळ्यांत तेल घालून.

एकामागून एक गोष्टी अशा घडत जाऊं लागल्या कीं मला वाटलं, मला वेड लागतंय, उगाचच कांहीं भलतेसलते भास होताहेत.

मी तीनतीनदां माझ्या खिशांतली डायरी उघडून तारीख, वार, सन नीट पाहून घेतले. मी जागा आहें कीं नाहीं याची खात्री करून घेतली. आणि जें केवळ अतर्क्य आहे तेंच पहायला मिळतंय असा विश्वास धरला. छे:, तसा विश्वास धरावाच लागला. कारण---

पुढल्या टप्प्यावर माणसं चढलीं त्यांत जाधवराव होता. डोक्यावर फौजदारी टोपी, कपाळावर शेंदराचा ठिपका, अंगांत ऐटबाज कपडे. फरक एवढाच, गेल्या वेळेपेक्षां हे कपडे निराळे होते अंगांत हिरव्या रंगाचा रेघा-रेघांचा रेशमी शर्ट आणि वर काळा कोट. उनी कापडाचा.

त्या जाधवरावाची तांबडी नजर त्या स्त्रीकडे वळली आणि तोहि आश्चर्यचकित झाला. माझ्यासारखाच. म्हणजे मला हा भास झाला नव्हता. मी उघड्या डोळ्यांनीं सगळं पहात होतों.

एकाद्या रेड्यासारखा डुलत डुलत तो त्या स्त्रीजवळ आला आणि तिच्या शेजारींच बसला. जणू त्याचा तो अधिकारच होता.

माझे कान टपून राहिले.

'अरेच्या, तूं आलीस का पुन्हां ?' जाधवरावांनं तिला विचारलं.

'हो. गेल्या वेळीं भेटलों त्याला चार एक वर्षं झालीं नाहीं ?'

'असतील. चारपांच वर्षांनीं एकदां काकाला भेटायला येतों मी. तूं एकटीच का ?'

'हो.'

'कुठं निघालीस ?'

'कल्याणला. भाऊ आजारी आहे, त्याला भेटून येणार आहें.'

'म्हणजे आजदेखील मला सोबत आहे तुझी. कसं ?'

'हो ना. मोटारींत चढलें तेव्हां तुमचीच आठवण काढली होती.' ती म्हणाली.

'अस्सं ? मग कधीं पत्र पाठवलं नाहींस हें कसं ? गेल्यावेळीं जातांना म्हणालीस 'पत्र पाठवीन' म्हणून, आणि तुझा कांहीं पत्ता नाहीं.'

'माझा कुठंच पत्ता नव्हता.'

'म्हणजे ?'

'म्हणजे काय ? मला पत्र लिहितां येत नव्हतं. मीं मग सारखी तुमचीच वाट पहात होतें. कांहीं सुचेनाच तुमच्याशिवाय. आज चार वर्षं झालीं वाट पाहून. आज भेटलांत तेव्हां हायसं झालं.'

तिचं हें बोलणं ऐकून जाधवराव खुषींत आला. तो म्हणाला,

'पण या खेपेला मोटार वेळेवर गेली पुण्याला आणि संध्याकाळची गाडी मिळाली तर कांहीं उपयोग नाहीं. इथून उठलों कीं पुणं नि लगेच मुंबई.'

'मुंबई नाहीं लगेच. इथून पुणं नि पुणंच. आपण त्या हॉटेलांत रात्रीं राहूं.' ती लाडांत म्हणाली.

'वरीच ही आहेस हं !'

'तुमची मेहरबानी !'

त्या दोघांच्या त्या निर्लज्ज गोष्टी मला ऐकवेनात. वाटलं, दोघांचीं थोबाडं फोडून टाकावींत.

मोटार वेळेवर पुण्याला पोंचली. मला संध्याकाळची गाडी मिळूं शकत होती पण मी मुद्दामच पुण्याला रहायचा बेत केला. त्याच हॉटेलांत रात्र काढून दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी मुंबईला जायला निघणार होतों.

मॅनेजरजवळ मीं माझं सामान दिलं. किल्ली घेऊन मी खोलीवर गेलों. बाकीचं सामान तिथं टाकलं आणि बाहेर आलों तर गेल्या वेळच्याच खोलींत जाधवराव आणि ती स्त्री येऊन बसलीं होतीं. दोघंहि सारखीं हंसत होतीं; बोलत होतीं.

एकदां मनांत आलं, मॅनेजरला मागल्या गोष्टीची आठवण करून द्यावी आणि यांच्यावर लक्ष ठेवायला सांगावं, पण तो बेत मीं रद्द केला.

एकतर मॅनेजरनें इतक्या काळानंतर त्या दोघांना ओळखणं शक्य नव्हतं आणि दुसरं, मिया बिबी राजी––

जेवण उरकून मी खोलीवर गेलों. दिवसभराच्या श्रमानं मी थकलों होतों. मला लगेच झोंप लागली. मॅनेजरनं मला पहांटे चार वाजतां हांक मारीपर्यंत ही झोंप टिकायला हवी होती. पण मी जागा झालों. अचानकपणें. डोक्याजवळच्या घड्याळांत पाहिलं. अकरा वाजून वीस मिनिटं झालीं होतीं. सगळीकडे सामसूम झाली होती.

मी असा जागा कसा झालों ? आणि भलत्याच वेळेला ? आणि कुणी उठवल्यासारखं मला कां वाटलं ?

घड्याळ टकटकत होतं...अकरा चोवीस...अकरा पंचवीस... अठ्ठावीस...

साडें अकराचा टोला पडला आणि कुणातरी स्त्रीची किंकाळी ऐकूं आली. मी झटदिशीं दिवा लावला आणि दार उघडून मीं बाहेर आलों.

माझे पाय वळले ते जाधवरावाच्या खोलीकडे. आंत अजून दिवा जळत होता.

त्या स्त्रीचा आवाज मला ऐकूं आला. आपली अब्रू घेतल्याबद्दल, आपला विश्वासघात केल्याबद्दल ती स्त्री जाधवरावाला शिव्या देत होती आणि बहुधा त्याच्या तोंडावर बुक्के मारीत होती. तिच्या हातांतल्या कंकणांचा आवाज मीं ऐकला.

मीं इकडे तिकडे पाहिलं. दुसऱ्या कोणालाहि ह्या स्त्रीची किंकाळी ऐकूं आली नव्हती.

मी धांवत जाऊन मॅनेजरला उठवलं, आणखी कांहीं जणांना उठवलं आणि आम्हीं सगळे जाधवरावाच्या खोलीजवळ गेलों. आंत एव्हांना सामसूम झाली होती.

म्हणजे ? पुन्हां गेल्या वेळेसारखंच झालं होतं ? पुन्हां पहांटे तिची रडारड, पुन्हां गाडींत त्यांचा प्रणय, पुन्हां कल्याणला न उतरतां मुंबईला जाणं आणि त्याच्या सहवासांत हॉटेलमध्यें रहाणं ?...

मॅनेजरनं दार वाजवलं.

आंतून आवाज आला नाहीं.

२९८०८

सर्वांनीं हांका मारल्या.

सामसूम !

मग पोलिसांना बोलावण्यांत आलं. पोलिसांनीं दार फोडलं.

आम्हीं आंत शिरलों.

आंत फक्त एक व्यक्ति होती. जाधवराव ! तोंडावर खूप मार लागलेला, शरीर बांगडयांनीं खरचटलेलं...इतस्तत: विखुरलेले बांगडयांचे तुकडे...जाधवराव शेवटची घटका मोजत होता; अगदीं अस्पष्ट स्वरांत म्हणत होता. 'मी विश्वासघात केला. मी फसवलं तिला. माझ्याजवळच्या चाकूनं मी---'

त्यानं आपल्या पोटाकडे हात नेला. आम्ही पाहिलं. त्यानं आपल्या जवळच्या चाकूनं आपल्या पोटावर वार करून घेतला होता. तो जगणं शक्यच नव्हतं.

आम्ही इतका वेळ जाधवरावाबद्दलच विचार करीत होतों. एवढयांत कुणीतरी म्हणालं, 'पण ती बाई कुठ आहे ?'

अरे हो, ती बाई कुठ आहे ? माळीनगरला त्या मोटारींत चढलेली ? त्याच्याबरोबर हॉटेलांत आलेली ? तिशी जवळची, देखणी, तरतरीत, आकर्षक ?

आम्हीं सगळचा खोलीभर पाहिलं. तिचा कुठंहि ठावठिकाणा नव्हता मग हें झालं कसं ? मी किंकाळी ऐकली होती. तिन जाधवरावाला दिलेल्या शिव्या ऐकल्या होत्या. तिच्या बुक्क्यांचे आवाज ऐकले होते. आम्ही सर्वजण लगेच त्या खोलीबाहेर आलों होतों. मग एवढयांत ती कुठं गेली ? खोलीची खिडकीहि आंतून लावलेली होती.

पोलिसांना कांहीं तपास लागेना. जाधवरावाला हॉस्पिटलमध्यें पाठविण्यात आलें. त्याचं सामान तपासलं गेलं.

प्रत्येकाची चौकशी करण्यांत आली. फक्त मी आणि मॅनेजर कांहीं सांगूं शकलों.

'हा मनुष्य कुणा बाईला घेऊन आलेला होता ?' पोलिसांनीं विचारलं.

'हो.' मॅनेजरनं सांगितलं. त्यान आपल्या जवळचं रजिस्टरहि दाखवलं. त्यांत जाधवरावानं आपण नवराबायको असल्याची नोंद केली होती.

'बाई कशी होती दिसायला ?'

'चांगली होती.'

'तिची कांहीं माहिती देतां येईल ?'

मॅनेजरनं नकारार्थी मान हलवली. मी त्यांना मागली सगळी गोष्ट सांगितली.

'काल पुन्हां तीं दोघं आलीं माळीनगरहून ?' पोलिसांनीं विचारलं.

'हो.' मी मग त्यांचीं बोलणीं, त्यांचे बेत, जे ऐकले ते सांगितले.

'पण ही बाई ओळखायची कशी ? ही गेली तरी कुठें ?'

'मी करूं शकेन मदत.' मी म्हटलं.

'कशी काय ?'

'मी चित्रकार आहें. त्या बाईचं चित्र मी काढून देतों. माळीनगरला चौकशी करा.'

मी भराभर रंग घेतले. कागदावर त्या देखण्या बाईचं चित्र काढलं.

'हीच ती बाई.' चित्र पुरं झाल्यावर मॅनेजरनं म्हटलं. 'हुबेहूब चित्र आहे.'

आदल्या दिवशींच्या एस्. टी. च्या ड्रायव्हरनंहि तिला माळीनगरला पाहिल्याचं सांगितलं. आतां गोष्टीचा शेवट जवळ आला होता.

पोलिसांनीं माळीनगरला चौकशी केली.

एवढ्यांत हॉस्पिटलमध्यें जाधवराव मरण पावल्याचं कळलं.

माळीनगरला त्या स्त्रीबद्दल माहिती मिळाली. तिचं नांव, तिच्या नवऱ्याचं नांव, पोरांची संख्या—सगळं कळलं. पण तिच्या नवऱ्यानं जी गोष्ट सांगितली तीच गांवांतल्या इतरांनींहि सांगितली आणि कुणालाच कांहीं बोध झाला नाहीं !

——चार पांच वर्षांपूर्वीं कल्याणला भाऊ आजारी असल्यामुळं त्याला भेटायला म्हणून ती माळीनगरहून गेली होती ती पुन्हां कधींहि परत आली नव्हती. त्यावेळीं तिनं मुंबईहून नवऱ्याला एक पत्र पाठवलं होतं, त्यांत तिनं लिहिलं होतं——

...'मी शेवटीं दादाकडे जाऊंच शकलें नाहीं. त्याला किंवा तुम्हां

कुणालाहि तोंड दाखवायला मला जागा नाहीं, मी हें शेवटचं पत्र लिहितें आहें. यापुढं एकहि क्षण जगणं मला शक्य नाहीं. बाळाला, बिंदूला आणि छोटया सुरेशला आशीर्वाद......

— आणि अतृप्त आत्म्याच्या सूडाची ही गोष्ट इथंच संपली.

० ० ०

## १२ : वसंताची गोष्ट

हें अगदीं ठरलेलं आहे. वसंता माझ्या कचेरींत आला, त्यानं मला 'काय साहेब, वेळ आहे का ?' म्हणून विचारलं कीं ओळखावं आज एक कथा मिळणार! वसंतानं आपण होऊन माझ्याकडे येण्याचा हाच एक अर्थ असूं शकतो.

वसंताचा माझ्यावर जीव आहे. आपल्या ओळखीचा एक इसम बऱ्यावाईट कां होईना, गोष्टी लिहितो, त्या छापून येतात याचं त्याला कौतुक आहे. माझ्यासाठीं कथा देणं हें तो आपलं कर्तव्य समजतो. कांहींहि टिपण्यासारखं दिसलं कीं हा तें टिपून आणून माझ्यापुढ ठेवतो नि म्हणतो, 'राजा, ह्यावर एक गोष्ट लिहून टाक !'

अशा वेळीं वसंताला बरं वाटावं म्हणून कांहींहि विचार न करतां मीं होकार देऊन टाकतों. माझ्या अशा लगेचच्या होकाराचा अर्थ ओळखून वसंता मला म्हणतो, 'पण खरंच कारे गोष्ट होईल ह्याच्यांतून ?'

'तें आत्तां कसं सांगूं ? होईलहि.' मी म्हणतों.

पण जर त्यानं सांगितलेल्या गोष्टीबद्दल कुतूहलानं मी कांहीं माहिती विचारूं लागलों कीं वसंता आनंदून जातो. इतका कीं, गोष्टींतली बारीकसारीक माहिती तो देतोच, पण मग संवादांत कांहीं सूचना, कथेला द्यायची

कलाटणी, सगळं तो सुचवूं लागतो. कथा छापून आली कीं मग तो तिची तारीफ करतो. आपल्या मित्रिमैत्रणींत शिफारसहि करतो.

वसंताची स्वतःची कथा बहुधा स्त्रीविषयकच असते. त्याला कुठंतरी भेटलेली एक तरुणी, दोघांनीं संभावितपणें टाकलेले डाव, त्याचा जय वा पराजय. झाली कथा. परंतु वसंता अशा कौशल्यानं ती कथा रंगवतो कीं, मला नेह्मीं वाटतं, मला लघुलिपी यायला हवी होती, म्हणजे त्याचे शब्दन् शब्द मी उतरून घेऊं शकलों असतों नि वर फक्त शीर्षक देऊन कथा पुरी केली असती.

वसंताच्या ह्या कथा नेह्मी खऱ्या असतात. आपण कांहीं विशेष केलं, एखादी अप्राप्य स्त्री मिळवून इतरांना चाट केलं, असं त्याला सांगायचं नसतं. त्याला फक्त मला कथा द्यायची असते. ती कथा एक त्याला माहीत कीं मला माहीत. चारचौघांत स्त्रीविषयक लंब्याचवड्या गप्पा मारणारे मीं पाहिले आहेत. नि मलाच एकटयाला कथा सांगणारा वसंता मला ठाऊक आहे. खोटया कथांतलं खोटेपण मी ओळखूं शकतों नि खऱ्या कथेंतलं सत्य मला समजत असतं. केवळ मला कथा द्यायची म्हणून वसंता जें सांगत असतो त्यावर मी सहाजिकच विश्वास ठेवतों.

घडलेली कथा अर्धवट असली कीं वसंता फार चुटपुटतो. त्या कथेचा शेवट धुंडाळण्याची शक्य तेवढी खटपट करतो. ती निष्फळ ठरली कीं मग आपल्याला सुचतील तेवढे शेवट तो सांगूं लागतो. मी जर त्याला मध्येंच म्हटलं कीं, ' वसंता, अरे ती कथा लिहूनसुद्धां झाली. तिचा शेवट मीं असा असा केलाय् तर तो माझ्या खांद्यावर इतक्या जोरानं थापट मारतो कीं शेवट धुंडाळण्यासाठीं झालेल्या त्याच्या फुकटच्या श्रमाची चीड मला चांगली जाणवते.

हा वसंता दिसायला रुबाबदार आहे. त्याची बुद्धि तल्लख आहे. त्याच्या अंगांत कमालीचं धाडस आहे. चांगले कपडे ल्यायचा, सर्व खेळ खेळण्याचा त्याला षौक आहे. स्त्रियांना चटकन् भुरळ पाडणारी जादू त्याच्याजवळ आहे आणि तिचा कसा, केव्हां नि किती उपयोग करावा हें जाणण्याची अक्कलहि त्याला लाभलेली आहे.

— त्या दिवशीं वसंता माझ्याकडे आला. असा संध्याकाळीं कचेरी सुटायच्या वेळीं. म्हणाला, " राजा, वेळ आहे का ? '

समजायचं तें समजून मीं विचारलं, " कां ? शिकार पाहिली आहेस ?"

" पाहिली नाहीं. केली आहे. मी स्वतः ! " आम्ही दोघं कचेरीबाहेर पडलों.

' हं वश्या, सांग आतां ! '

' आधीं माझी अट कबूल कर. ही मी आतां सांगणार असलेली कथा तूं पूर्ण करायची नाहींस. मीं ती पूर्ण करणार. हृया घटकेला कथा अपूर्णच आहे. उरलेली कथा आठपंधरा दिवसांनीं घडेल. ती जशी संपेल तशीच लिहायची. अगदीं शंभर टक्के वास्तववादी.'

मीं अट कबूल केली.

कॅन्टीनमध्यें संडविचेस् खातां खातां वसंता गोष्ट सांगूं लागला.

कुठंतरी बाहेरगांवीं जाऊन चार दिवस राहून यावं असं माझं नि बंड्याचं सारखं बोलणं चालू होतं पण कधीं दोघांना एकदम रजा मिळत नव्हती. कधीं पैशाची सवड होत नव्हती तर कधीं कुणाच्या घरीं कुणी आजारी असे.

एके दिवशीं बंड्या अचानकपणें माझ्याकडे आला नि म्हणाला, ' वसंता, या शनिवारीं निघायचं आपण. तूं चार दिवसांची सवड काढ.'

' कुठं जायचं ?'

' वज्रेश्वरीला. माझ्या ओळखीनं तिथं एक बंगला मिळणार आहे. आपण चार दिवस राहून येऊं.'

' कुणाचा आहे बंगला ?'

' आहे, एका गर्भश्रीमंत शेटचा. तिथं त्या बंगल्याची निगा राखणारा एक माळी आहे. तो पांचदहा रुपये घेऊन आपली सोय करतोय. आपण या शनिवारीं निघायचं.'

— शनिवारीं रात्रीं आम्ही त्या ठिकाणीं गेलों तर बंगल्यापुढें दोन भल्या मोठ्या मोटारी उभ्या. मीं बंड्याला म्हटलं, ' बंड्या, बहुधा बंगल्याचा मालक आलेला दिसतोय. आतां आपल्याला परताव लागणार ! '

एवढ्यांत माळी आला नि आम्हांला म्हणाला, ‘ साहेब, आजची रात्र तुम्ही माझ्या खोलीवर काढा. उद्यां मालक गेले कीं बंगला तुमचाच आहे.’

इतक्या लांबून परत जाणं शक्य नव्हतं म्हणून आम्हीं त्या रात्रीं माळ्याकडेच वस्तीला राहिलों. नांवालाच ती खोली माळ्याची होती, पण मुंबईंतल्या कुठल्याहि चाळींतल्या खोलीपेक्षां ती लाखों पटींनीं चांगली होती. माळीबुवानं आम्हांला गाद्या घालून दिल्या, पांघरुणं दिलीं, रात्रीं अकरा वाजतां गरम गरम कॉफी दिली.

सकाळीं उठून आम्हीं बंगल्यावर आलों तर तिथं एकच गाडी दिसली. माळ्याला विचारल्यावर तो म्हणाला, ‘ मोठे शेट सकाळींच परत गेले मुंबईला. धाकट्या बाईसाहेब नि त्यांची बहीण—दोघीच फक्त आहेत आतां. बाई स्वभावानं चांगली आहे. ती तुमच्यासारख्यांसाठीं बंगल्यांतली एक बाजू देईल.’

‘ ही धाकटी बाई म्हणजे कोण ?’

‘ शेटजींची सून. शेटजींच्या मोठ्या मुलाची—वसनजीशेटची बायको. गेल्या सालींच लग्न झालं ! असा थाट केला होता ! लग्नानंतर ह्या बंगल्यावर नवराबायको रहायला आलीं तेव्हां त्यांची काय व्यवस्था ठेवली मी ! जातांना बाईसाहेबांनीं एक्कावन रुपये माझ्या हातावर ठेवले.’

त्या माळ्याच्या एकंदर बोलण्यावरून कळलं कीं, ह्या सूनबाई बंगल्यांत रहाणार आहेत, त्यांच्या तैनातीसाठीं ही मोटार ठेवण्यांत आली आहे. वसनजीसेट, त्यांचं अहमदाबादमधलं काम आटोपलं कीं मजेसाठीं म्हणून इथं येणार आहेत.

आम्हीं माळ्याच्या खोलीवर आनंदांत होतों. तेव्हां आम्हांला बंगल्यांत रहायला जायची कांहीं फारशी जरुरी वाटली नाहीं.

दुपारीं जेवणाच्या वेळीं बंगल्यांतून डबा आला. आम्हीं आश्चर्यचकित झालों. माळ्याला विचारलं तेव्हां तो म्हणाला, ‘ मृदुलाबाईंनीं हें तुमच्यासाठीं धाडलं आहे. त्यांचा निरोप आहे कीं, जेवण झाल्यावर पत्ते खेळायला तुम्हीं दोघांनीं बंगल्यावर यावं.’

डब्यांत भरपूर पदार्थ होते. जेवणानंतर खायला म्हणून दोन संत्रीं, सुका मेवा नि विडेहि होते.

मृदुलाबेनला चिठी लिहून तींत आम्हीं तिचे अभार मानले नि दुपारचं आमंत्रणहि स्वीकारल्याच कळवलं.

--दुपारीं बंगल्यांत शिरल्यावर तिथल्या ऐश्वर्यानं आमचे डोळे दिपून गेले. आम्हीं तिथं कोचावर बसलों. इतक्यांत माळ्यानं सांगितलं कीं, आणखी थोड्याच वेळांत बाईसाहेब येतील. बाजूचं हें एश्वर्य पाहून त्या ऐश्वर्याच्या मालकिणीला पहायला मी कार उत्सुक झालों. इतक्या उमद्या स्वभावाची, एवढी रसिक असणारी स्त्री दिसायला कशी असेल असा मनाशीं मीं अंदाज घेतोंय् एवढ्यांत आंतल्या खोलींतून सेंटचा मंदमधुर वास आल नि आम्हांला हळूच सांगून गेला, 'आत्तां माझ्यामागून बाईसाहेबा येताहेत ! '

मृदुलाबेन आली. तिला पाहिल्यावर मला वाटलं, इतका वेळ अंदाज करण्यांतहि आपण कद्रू ठरलों ! बाजूचं ऐश्वर्य फिकं पडेल असं रूपाच ऐश्वर्य मृदुलाबेनला लाभलं होतं. जणू मघाच्या त्या मंदमधुर सुगंधानं कांहीं काळ थबकून मनीं म्हणाव, "हिच्या तारुण्याच्या गंधांत बुडून जाण्यांत माझी सार्थकता आहे ! " मृदु लची कांति, तिच तारुण्य, तिचा आवाज तिचे कपडे...प्रत्येक गोष्ट दुसऱ्या गोष्टींना म्हणत होती, ' माझ्यामुळंच हिचं सौन्दर्य खुललंय् ! '

पण तरीहि एक गोष्ट मला खटकली. मृदुलाबेनच्या नजरेंत कांहींतरी विशेष होतं. माझ्यासारख्या यःकश्चित् तरुणाकडे बघतांना ह्या सौन्दर्य-सम्राज्ञीच्या डोळ्यांत आग्रही धुंदी उतरायला नको होती असं मला सारखं वाटूं लागलं.

" आपण केव्हां आलांत ? " तिनं इंग्रजींतून प्रश्न केला.

" काल संध्याकाळीं. "

" राहिलांत कुठं रात्रीं ? "

" माळ्याच्या खोलीवर ! "

" इथ बंगल्याची मालकीण असतांना तुम्ही माळ्याकडे राहणं योग्य नव्हतं ! नाहीं ? "

' पण-- '

'जाऊं दे. आतां तुमचं सामान इथं बगल्याच्या एका बाजूला आणायला मी सांगतें. तुम्हीं खुशाल रहा इथं बंगल्यांत ! '

'पण आपल्याला अडचण— '

'अडचण कसली ? इथं मला नि माझ्या बहिणीला कितीशी जागा लागणार आहे ? आम्हां दोघींना बंगल्याचा अर्धा भाग पुरे आहे. '

'थँक्स ! '

'आणि हें पहा, तुम्हांला एक तसदी देणार आहें. वसनजीशेट येई-पर्यंत तुम्ही रोज पत्ते खेळायला यायचं. मी, माझी बहीण नि तुम्हीं दोघं मिळून आपण पत्ते खेळायचे. तुमचं जेवणखाण आमच्याबरोबरच. '

'पण —'

'आतां अधिक कांहीं बोलायचं नाहीं.— बर आतां खेळायचं ना ? मी सवितेला हांक मारतें. '

सविता आली. तीहि बहिणीसारखीच दिसायला सुरेख होती. पण तिला फारसं बोलायला नको असे. ती आल्यावर आम्ही पत्ते खेळायला बसलों.

खेळतांना मृदुलाबेन सारखी हंसत होती, बडबडत होती, चेष्टा विनोद करीत होती. मी आणि ती भिडू होतों. तेव्हां सारखी खुणा करीत होती. पत्ते झाले. संध्याकाळीं फिरणं झाल. चहा झाला. रात्रीचं जेवणहि झालं.

रात्रीं गादीवर पडल्या पडल्या बंड्या म्हणाला, 'वश्या, एक सांगू ? ह्या मृदुलाबेनच कांहीं खरं नाहीं ! '

'कां रे ? '

'अरे, तुझ्यावर ती फार खुष दिसतेय्. तुझ्या हातांतून पत्ते घेतांना, खेळतांना मध्येंच तुझ्या हातावर टाळी देतांना कांहीं ना कांहीं कारण काढून ती तुला स्पर्श करण्याची संधि घेत होती. तसं तिनं करण्यापेक्षां सविताबेननं केलं असतं तर तुला ठीक होतं ! पण ही सविताबेन अगदींच गद्य आहे !'

बंड्यानं मृदुलाबेनबद्दल म्हटलेलं मलाहि जाणवलं होतं. आतां अनु-भवी बंड्यानं म्हटल्यामुळं त्या जाणिवेला पुष्टि मिळाली.

मी झोंपणार एवढ्यांत दाराची कडी वाजली. बंड्यानं दार उघडलं.

'वसंत कुठें आहे ?' मृदुलाबेन चौकशी करीत होती.

मी चटकन पुढें गेलों.

'जरा इकडे येतां ?'

मृदुलाबेनबरोबर मी पोर्चपर्यंत आलों. तिथल्या रातराणीच्या फुलांची एक डहाळी तोडीत ती म्हणाली, 'मला झोंप येत नाहीं आहे. आपण इथं थोडा वेळ बोलत बसूं.'

'मी बंड्याला बोलावून आणूं का !'

'नको. Don't beyil त्याला निजूं दे !'

आमचं बोलणं अस फार झालंच नाहीं. मृदुलाबेननं मला दुसऱ्या दिवशीं पोहायला येण्याचा आग्रह केला आणि मी तिला मृदुलाबेन न म्हणतां मृदुला म्हणेन असं माझ्याकडून अभिवचन घेतलं.

मीं विचारलं, 'सविता येणार आहे पोहायला ?'

'नाहीं.'

'कां ?'

'तिला पोहतां येत नाहीं...वसंत, एक प्रश्न विचारूं ? तुला सवितेबद्दल कांहीं वाटतंय् ?"

'न–नाहीं. खरंच, काहीं नाहीं.'

'मग तिची कां चौकशी केलीस ?'

'सहजच.'

"सहजच असेल तर असूं दे. सविता अजून लहान आहे. तिनं एवढ्यांत सगळं जाणून घ्यायला नको आहे. माझी गोष्ट निराळी आहे. मी विवाहित आहें."

दुसऱ्या दिवशीं आम्ही पोहायला जायला निघालों. मृदुलेनं सवितेला बगल्यांतच रहायला सांगितल. मी, मृदुला आणि बंड्या अशीं तिघेंजण पोहायला गेलों.

मृदुला सराईत पोहणारी होती. माझ्याबरोबर पैज लावून ती पुष्कळ वेळ पोहत राहिली नि जेव्हां बंड्या कंटाळून निघून गेला तेव्हां तिनं मला

एकदम मिठी मारली नि म्हटलं, 'वसंत, मला तूं फार आवडतोस ! फार आवडतोस रे !'

जागरूक असल्यामुळं तिच्या सादेला मी प्रतिसाद दिली. तिच्या मुखावर चुंबनांचा वर्षाव करीत मी म्हटलं, 'मृदुल, तूं किती नाजूक आहेस. एखाद्या पांढऱ्या शुभ्र नाजूक फुलासारखी तूं दिसते आहेस ! तुझ्या देहाचा हा नाजूकपणा कांहीं वेगळाच आहे. हा सारा नाजूकपणा अति बलशालीहि आहे...ह्या इथला नाजूकपणा कांहीं वेगळाच आहे. हा सारा नाजूकपणा, इकडचा नाजूकपणा—'

मृदुलेला अगदीं जवळ घेऊन मी हें सगळं बोलत होतों. स्वर्गींसुद्धां न मिळणारं असं सुख माझ्या हातीं आलं होतं.

एवढ्यांत माझ्यापासून उगाचच दूर होत मृदुला म्हणाली, 'वसंत तुला मी वेडी वाटत असेन. नाहीं ? कालपासून मी अगदीं वेड्यासारखी वागतेंय्. वसनजीशेट इथं नसल्यामुळं मला कांहीं सुचेनासं झालंय्. सारखी त्यांची आठवण होतेय्—'

मृदुलेच्या तोंडून हे शब्द ऐकले नि मला चीड आली. साऱ्या रंगाचा बेरंग करणाऱ्या त्या तरुण देहाचं वाटणारं आकर्षण ओसरलं. मी कांठाजवळ जाऊन एका दगडावर बसलों.

मृदुला माझ्यामागून आली नि तिथं दगडाला धरून पोहत राहिली.

मी म्हटलं, 'मृदुला, माझं ऐक. ह्या घटकेला तूं एक स्त्री आहेस नि मी एक पुरुष आहें एवढंच खरं आहे. ह्याच गोष्टीला अस्तित्व आहे. अशा रम्य एकांतांत आतां घडलं असं घडणं स्वाभाविक आहे. तुझं वागणं मला गैर वाटूं नये, तुला मीं कमी लेखूं नये म्हणून उगाच वेड्यासारखं बोलणं ढोंगीपणाचं मला वाटतं !'

'म्हणजे ?'

'म्हणजे एकच, आतां तूं वसनजीशेटचं नांव काढून रंगाचा जो बेरंग केलास तो उगाचच केलास ! मी तुला कांहीं विचारलं होतं ?... मृदुल, मी असा रंगेलपणानं वागत असलों तरी कांहीं गोष्टींबाबत मनाचा संयम मी सोडीत नाहीं. मला जी गोष्ट एकदां आवडत नाहीं ती अशा घटकेलाहि आवडत नाहीं. जीं बंधनं, जे संस्कार मला पाळावेसे एकदां वाटतात ते अशा

धुंदींतहि जागृत असतात ! मी आतां कांहीं बोललों तर तुला आवडणार नाहीं, तूं कांहीं क्षणापूर्वीं दिलेलं स्वर्गसुख मला पुन्हा लाभणार नाहीं हेंहि मला ठाऊक आहे. पण तरीहि मी बोलणार आहें !"—

" बोल. वसंत, तूं बोल. मला हेंहि आवडतं. असं लागणारं, झों.र बोलणं ऐकून पळणारी मी नाहीं. भित्रेपणापेक्षां धाडस मी पत्करतें."

' मग ऐक. ह्या घडीला एका स्त्रीला पुरुषाची सोबत हवी आहे हेंच फक्त खरं आहे; हेंच नैसर्गिक आहे. तूं वसनजीशेटबद्दल कांहीं बोलायला नको होतंस. दुसऱ्याशीं प्रणयचेष्टा करतांना त्या आपण नाइलाजानं परिस्थितीमुळेंच करीत आहोंत, आपल्याला हें चूक वाटतंय् असा बहाणा कशासाठीं ? आपल्या एकांतांत तिसऱ्याचं नांव निघूं नये नि रंगाचा बेरंग होऊं नये असं मला वाटतं, मी ओळखायचं तें ओळखून असतों. मी कांहीं पंधरासोळा वर्षांचं वासरूं नाहीं.'

रंगांत आलेल्या स्त्रीला असं खडसावण्याचं बळ अंगीं असावं असं नेहमीं मला वाटे. त्या तशा वागण्यानं नुकसानीऐवजीं फायदाच होत असेल असा माझा कयास होता नि तो खरा ठरला. मृदुलेनं त्या क्षणीं मला पाण्यांत ओढलं नि माझीं इतकीं चुंबनं घेतलीं कीं, मी गुंग होऊन गेलों. अशा अप्रिय विषयाचं तोंड बंद करण्याचं तिचं कौशल्यहि तेवढंच वाखाणण्यासारखं होतं !

त्यानंतर जेव्हां जेव्हां ओझरता, चुटपुटता एकांत मिळाला तेव्हां तेव्हां हाच प्रकार घडला. आणि प्रत्येक वेळीं मृदुलेनं पुढाकार घेतला.

सविता मात्र सदैव गप्प असे. गद्य असे. कधीं फारसं हंसणं नाहीं, बोलणं नाहीं. तिचं वाचन नि भरतकाम चालू असे.

असे दोन दिवस गेले.

त्या रात्रीं नेहमींसारखी मृदुला आमच्याशीं बोलायला आली नाहीं.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी तिला त्याबद्दल विचारलं तर तिनं आपले तळवे दाखवून मला म्हटलं, ' म्हणून आलें नाहीं !'

' म्हणजे ?'

' हें बघ ना. तुला माझ्या हातांत फरक वाटत नाहीं ?'

' नाहीं बुवा.'

'हात हातांत धरून बघ नि सांग.'

मी तिचे हात हातांत घेतले, उलटसुलट केले नि म्हटलं, 'आलं लक्षांत. ही मेंदी ना?'

'हो. इथल्या कुंपणाची आहे. काल संध्याकाळीं मी स्वतः ही मेंदी वाटली नि हाताला लावली. हात बांधले होते म्हणून नि तुला आज चकित करायचं म्हणून मी काल रात्रीं आलें नाहीं. कसे दिसताहेत हे हात?'

'खूपच सुरेख. तुझे नेहमींचे गुलाबी तळवे प्रणयाच्या मद्यानं लाल-चुटुक झाले आहेत असं म्हणूं?'

'बस्स! हेंच, असंच तूं म्हणायला हवं होतंस. याबद्दल तुला बक्षीस–'

मी तिच्या ओठांकडे पाहूं लागल्यावर ती म्हणाली, 'आज खास बक्षीस देणार आहें मी. तुझ्यासाठीं मीं थोडी मेंदी ठेवली आहे. ती मी स्वतः तुझ्या हाताला लावणार आहें.'

'वेडी तर नाहींस तूं?'

'अरे, मी मुद्दाम तुझ्यासाठीं–'

'मला आवडणार नाहीं असलं कांहीं!'

'आवडलं पाहिजे. मी सांगतेंय् म्हणून आवडलं पाहिजे. तूं माझं नाहीं ऐकणार?'

'असलं तर जन्मांत नाहीं ऐकणार. पुरुषांनीं कसली मेंदी लावायची? एकच आंगठ्याचं नख रंगवणं, काजळ घालणं पुरुषांना नाहीं शोभत!'

'तत्त्वज्ञान पुरे. तुला मेंदी लावलीच पाहिजे, मी आत्तांच्या आत्तां मेंदी आणतें नि...'

'मी फेंकून देईन ती. तुला मी मागंच म्हटलं होतं. जी गोष्ट मला एकदां आवडत नाहीं तीं कधींच आवडत नाहीं. कुणासाठींहि नि कुठल्याहि क्षणीं मी माझ्या तत्त्वांबद्दल गैरसावध राहणार नाहीं.'

'ठाऊक आहेत तुझीं तत्त्वं! तत्त्वाच्या गोष्टी बोलायच्या नि वर–'

'शट् अप्! असं बोलण्याचा निदान तुला अधिकार नाहीं!'

'मी रागानं तिच्या हाताला झटका दिला नि बाहेर पडलों.

मृदुला चिडली.

--दुपारीं बोलावण्याऐवजीं जेवणाचा डबा आला. मी तो परत पाठवला. बंगल्यांतली जागा रिकामी करून आम्ही माळ्याच्या खोलीवर गेलों दुसऱ्या दिवशींच आम्हांला परतायचं होतं. तेव्हां एक रात्र माळ्याच्या खोलीवर काढायला कांहीं अडचण नव्हती.

माझं हें वागणं बंड्याला पटलं नाहीं. मीं चांगली संधि गमावली म्हणून तो मला दोष देऊं लागला.

—पहांट असावी. माळ्याच्या खोलीचं दार वाजलं. बंड्या आणि माळी गाढ झोंपले होते. मीं उठून दार उघडलं. पहांटेच्या वाऱ्याबरोबर सुगंध आला.

दारांत मृदुला उभी होती.

माझ्याशीं एक अक्षरहि न बोलतां तिनं माझा हात धरला नि त्या अंधुक प्रकाशांतून ती मला आपल्या बंगल्यावर घेऊन गेली.

तिथं मला पलंगावर बसवून ती म्हणाली, 'हं. बोल आतां. मला भरपूर बोलून घे. तुम्हीं आज जाणार ना ?'

'हो.'

'कालचा तुझा राग गेला ?'

'हो.'

'आज वसनजीशेट येणार.'

'असं का ?'

'वसंत, काल मी फार बेचैन झालें. त्यांतच वसनजीशेटचं पत्र आलं, आज येणार म्हणून. रागाच्या भरांत मीं तुम्हांला डबा पाठवला.'

'राग यायचं कारण ?'

'शहाणा असशील तर असा मूर्खासारखा प्रश्न विचारूं नकोस.'

'राहूचलं !'

'वसंत, काल आपण भांडायला नको होतं.'

'हं—'

'काल भांडण झालं नसतं तर गेलेली रात्र आपल्या हातीं राहिली असती. मीं किती ठरवलं होतं ! झालं. आतां उजाडेल. तूं निघून जाशील. तुझ्या मृदुलेला विसरशील—'

मृदुला रडूं लागली. मीं तिला थोपटल्यासारखं केलं नि म्हटलं, 'मृदुला, रडूं नकोस.'

'वसंत, माझी आठवण होईल ना रे तुला ? मला शेवटचं जवळ घे... तुला सांगूं ? वसनजीशेटना मेंदी लावायला आवडते तशी तुला आवडत असेल म्हणून मी काल तसं म्हटलं. केवळ तुझं कौतुक करण्यासाठीं. पण तूं किती छान आहेस रे ! तूं कशी बेपर्वाई दाखवूं शकतोस ! तुझ्या टोंचणाऱ्या शब्दांनीं किती सुख होतं रे ! तूं–तूं खरा पुरुष आहेस. मला जसा हवा आहे तसा. माझी पर्वा न करणारा, मला ओरडणारा, आपलं वर्चस्व गाजवणारा!'

तिनं मला आणखी जवळ घेतलं.

—'आणि वसंत, तूं मुंबईला गेलास कीं मला विसरूं नकोस. मी पुढल्या आठवड्यांत आमच्या मुंबईच्या बंगल्यांत येईन. तुला मी माझा फोन नंबर देऊन ठेवतें, पत्ता देऊन ठेवतें. तूं केव्हांहि दुपारीं मला फोन कर. बंगल्यावरहि येत जा शनिवारीं दुपारीं. तुला काय हवं तें मागून घेत जा. मी वाटेल तें देईन तुला. वाटेल तेवढे पैसे माग, कापड माग, माझी मोटार मागवून घेत जा–वसंत. मला स्वतःलाहि घेऊन टाक. अगदीं खाऊन टाक. पण फोन कर. मला कळवशील ना आधीं ? आपली कहाणी पुरी झाली पाहिजे असं नाहीं वाटत तुला ?'

तिच्याकडून मीं तो फोननंबर नि पत्ता घेतला.

इकडे येतांना मीं नि बंड्यानं मृदुलेचा निरोप घेतला. सविता कांहीं वाचीत होती. ती आपल्या खोलीबाहेर आली नाहीं. तेव्हां दारांतूनच मीं तिचा निरोप घेतला. मला क्षणभर वाटलं, ह्या सवितेनं मला नि मृदुलेला ऐकांतांत पाहिलं नसेल कधीं ?

वसंतानं एवढी गोष्ट मला सांगितली नि म्हटलं, 'राजा, ही गोष्ट आणखी पंधरावीस दिवसांनीं पूर्ण व्हावी. मृदुला मुंबईला परतली कीं झालं. तुला मग गोष्टीवर गोष्टी मिळतील. तूं मात्र एवढीच अपूर्ण गोष्ट लिहूं नकोस. पुढं काय होईल त्याप्रमाणंच लिही.'

'अर्थातच. तुला वचनच दिलंय् मीं तसं !'

'मी आणखी पंधरा दिवसांनीं मृदुलेला फोन करीन. तिच्या बंगल्यावर जाईन नि तुला गोष्टीचा पुढला भाग सांगेन.'

—वसंताची नि माझी भेट होऊन एक महिना झाला. वसंता माझ्या-कडे फिरकलासुद्धां नाहीं. तेव्हां गोष्टीचा शेवट झाला असं वाटूं लागलं.

मग एका रविवारीं मीच वसंताच्या घरीं गेलों. त्याच्याकडे गेल्यावर कळलं कीं, त्याला फ्लू झाला आहे. या आजारामुळं कथा अर्धवट राहिली असं समजून चाललों नि तें खरंहि होतं.

त्यानंतर मी अधूनमधून वसंताच्या समाचाराला जाऊं लागलों. वसंताला उतार पडला नि मीं मग त्याच्याकडे जाण्याचा आळस केला.

आणि अचानक एके दिवशीं मला त्या अपूर्ण कथेची आठवण झाली. वसंताला भेटून यावं, त्याला ती गोष्ट पूर्ण करायला सांगावं असं वाटूं लागलं.

त्यानंतरच्या रविवारीं मी वसंताकडे गेलों. त्याचा मोठा भाऊ म्हणाला, 'वसंता हवापालट करण्यासाठीं बाहेरगांवीं गेला आहे. त्यानं तीन महिन्यांची रजा घेतली आहे.'

कथा अर्धवट राहिली. पुरीच होईना.

—चार महिन्यांनीं पुन्हा आठवण झाली नि नेमका त्याच दिवशीं वसंता मला स्टेशनवर भेला. तो नि मी हॉटेलांत गेलों. वसंताला मीं गोष्टीचं स्मरण करून दिलं नि म्हटलं, वसंता, ती कथा पूर्ण करून टाक आतां!'

'आतां नाहीं. ती कथा आतां पूर्ण होणार नाहीं. अपूर्णच रहाणार!'

'पण कां?'

'कारण मी आतां मृदुलेकडे जाणार नाहीं आहें.'

'कांहीं भानगड झाली?'

वसंत हंसला नि म्हणाला, 'मी ह्या भानगडींना भीत असतों तर लेका, तुला ती अर्धी कथाहि कधीं मिळाली नसती.'

'मग अडचण काय आहे?'

'अडचण म्हणजे माझं तत्त्वज्ञान. मी पाळत असलेले नियम. मी जरी चंट असलों तरी बंधनांत असतों. माझ्या आराखड्यांत बसेल तसाच वागतों. मी कधीं संधि शोधत नाहीं. हें जितकं खरं आहे तितकीच खरी गोष्ट म्हणजे आलेली संधीहि मी कधीं दवडीत नाहीं. दुसऱ्या पक्षानं पुढं पाऊल टाकल्या-खेरीज मी पाय हलवीत नाहीं...त्या वेळींहि मीं तसंच केलं. मृदुलेनं मला

– बोलावलं नसतं तर मी मनांतहि कधीं तिचा विचार केला नसता. माझ्या-सारख्या दोनशें रुपये कमावणाऱ्या कारकुनानं दोनचार मोटारी नि कांहीं बंगल्यांच्या मालकिणीची अभिलाषा धरणं हें माझ्या आराखड्यांत, नियमांत बसत नाहीं. पण तिनं आपण होऊन जेव्हां पाऊल पुढं टाकलं तेव्हां मी पुढं गेलों. म्हटलं, हा अनुभव मिळतोय् तो घेऊन पहावा. '

' तें ठीक आहे. पण आतां गोष्टीचा शेवट ? ती अर्धी कथा तशीच लिहून पडली आहे. '

' वेड्या, आतां चारसहा महिन्याच्या अवधीनंतर मीं मृदुलेकडे जायचं म्हणजे एक मूर्खपणा ठरेल. पुन्हा सहा महिन्यांपूर्वीची ओळख करून द्या. पुन्हा तिला मागं वाटलेल्या आकर्षणाची आठवण करून द्या, हा अव्यापारेषु व्यापार ठरेल; विझलेला कोळसा नुसत्या फुंकरीनं फुलण्याची वाट बघण्या-सारखं ठरेल. एका दमांत ओढलेली रेषा सरळ येते. हळूहळू थांबून थांबून ओढलेली रेघ कधींच सरळ येत नाहीं त्या क्षणीं तें ठीक होतं. वज्रेश्वरी-सारख्या दूर ठिकाणीं मृदुला फक्त स्त्री होती नि मी फक्त पुरुष होतों. ती हौशी नि तिची हौस पुरी करण्याचं मला ज्ञान होतं एवढ्यालाच तिथं महत्त्व होतं. आतां मुंबईंत आल्यावर ज्यानं त्यानं आपले मुखवटे चढवले आहेत. आतां मी एक कारकून आहें. नि मृदुला एका गर्भश्रीमंताची सून आहे. आतां नातीं संपलीं. आणि शिवाय असं पहा, ज्या स्त्रीनं दोन दिवसांच्या सहवासांत मला सगळं देऊं केलं ती स्त्री गेले सहा महिने माझी वाट पहात खोळंबेल होय ? अरे, ती मला विसरूनहि गेली असेल एव्हाना ! तिच्या हौशी तारुण्याला इथं मुंबईंत कुणीच त्राता नसेल होय ? आतां तिच्याकडे जाणं माझ्या नियमांविरुद्ध, तत्त्वांविरुद्ध आहे. मी माझ्या हिशेबाबाहेर कांहीं करीत नाहीं नि माझ्या स्वाभिमानाला धक्का लागूं देत नाहीं ! '

' अरेरे ! म्हणजे एवढी सोन्यासारखी संधि मिळूनसुद्धां–'

तसं मात्र मला मुळींच वाटत नाहीं. वज्रेश्वरीला जातांना काय हें असं घडेल म्हणून मला ठाऊक होतं ? अरे, एवढं आयुष्य पडलंय् समोर. कदाचित् ह्याहूनहि अधिक कांहीं घडेल ! तुलाच, खरं म्हणजे, अपुऱ्या राहिलेल्या गोष्टीच दुःख होतंय्. '

' मग गोष्ट तशीच राहूं दे ? अर्धवट अपुरी ? '

'राहूं दे. कांहीं अडत नाहीं त्यावांचून !'

—गेल्या आठवड्यांत लागोपाठ दोन सुट्या होत्या. वसंतानं नि मीं दोन्ही दिवस कांहीं कार्यक्रम करायचा ठरविला. पहिल्या दिवशीं एका नृत्यप्रयोगाला नि दुसऱ्या दिवशीं सहलीला जायचा कार्यक्रम ठरला.

नृत्यप्रयोगाला आम्ही गेलों, प्रयोग फारच रंगला. पण कां कोण जाणे, वसंताचं चित्त लागेना. मध्यंतरांत बाहेर जातांना मीं वसंताला बोलावलं, पण तो आला नाहीं. पुन्हां प्रयोग सुरू झाल्यावर मी वसंताला विचारलं, 'वसंता, तुझं चित्त लागत नाहीं आहे का ?'

'नाहीं.'

'कारण ?'

'समोरच्या खुर्चीवर बसलेली ती तरुणी पहा.'

मीं पाहिलं. ती एक गुर्जर तरुणी होती. अति तलम वस्त्रानं तिनं आपलं मोतिया रंगाचं नाजुक शरीर गौरविलं होतं. लांबलचक मोठ्या शेपट्यावर जवळजवळ तेवढाच पांढराशुभ्र गजरा गुंफला होता. पाठीमागून-सुद्धां तिच्या सौंदर्याची कल्पना येत होती.

'कशी आहे ?' वसंतानं मला विचारलं.

'सुंदर. सुरेख. इतका वेळ मीं तिला पाहिलंच नव्हतं !'

तें नृत्य झाल्यावर त्या तरुणीनं वसंताकडे पाहिलं. वसंतानंहि तिच्याकडे पाहिलं.

...आणि नंतर प्रत्येक नृत्य आटोपल्यावर हा प्रकार झाला. मी एकदां बाहेर गेल्यानंतर मला वाटतं, ती दोघं बोललींहि.

आम्ही थिएयटराबाहेर पडलों. वसंतानं माझं लक्ष एका मोठ्या लांबसडक मोटारीकडे वळवलं नि म्हटलं, 'तीच वऱ्हेवश्रीला आली होती.'

'गाडीचं राहूं दे. मघांची ती तरुणी'—

'सांगतों. मी ओळखतों ती गाडी नि ती तरुणी. त्या तरुणाबरोबर आलेल्या त्या म्हाताऱ्या माणसालाहि मी ओळखत नाहीं.'

'तें जाऊं दे. त्या तरुणीबद्दल सांग.'

माझ्या हातांत एक चिठी देत वसंता म्हणायला, 'तुला गुजराथी येत असेल तर वाच.'

मी म्हटलं, ' तूंच वाचून दाखव. '

'...उद्यां फोन कर. नंबर अमुक अमुक. राजा, तुला मेंदीची ती गोष्ट आठवते ना मृदुलेची ? '

' हॅत्तेरी. वश्या, मग फुकट तत्त्वाची गोष्ट बडबडलास तेव्हां ! आतां मी मृदुलेला भेटणार नाहीं म्हणून काय म्हणालास–'

' तें खरंच आहे. ती कथा तशीच अर्धी ठेवायची. '

' मग आत्तांचं तुझं वागणं–'

' ही दुसरी कथा. '

' म्हणजे ? '

' म्हणजे आपला उद्यांचा सहलीचा कार्यक्रम रद्द. उद्यां दुपारीं मी फोन करून त्या सुंदर तरुणीला घेऊन फिरणार. '

' आणि तिला म्हणणार, ' मृदुला, तूं किती नाजुक आहेस ! ' असंच ना ? '

' भले लेखक महाराज ! गोष्टीनंच चकवलं तुम्हांला ! उद्यां तिला मी म्हणणार आहें, सविता, वज्रेश्वरीला तूं किती अरसिक वाटली होतीस ग ! '

मी वसंताला कोपरापासून हात जोडून मनांत कथेचं जाळं विणूं लागलों...

० ० ०

## १३ : धडा

गेल्या मे महिन्यांतली गोष्ट. मला वाटतं, दहा—बारा तारीख असेल मेची. संध्याकाळीं मी ऑफिसांतून आमच्या लॉजमध्यें परत आलों तेव्हां मॅनेजर मला म्हणाले. 'मानेसाहेब, तुमच्याकडे मघाशीं एक इसम येऊन गेले.'

'कोण ? नांवबिव सांगितलं त्यांनीं आपलं ?' मीं विचारलं.

'कोणीतरी मिलिटरीमधले दिसत होते. त्यांनीं आपलं कार्ड दिलंय् माझ्याजवळ. हें घ्या. कॅप्टन केंकरे त्यांचं नांव.'

'कॅप्टन केंकरे ?' मी केंकरे नांवाचा कुणी इसम आठवतो का तें शोधूं लागलों.

'आतां ते पुन्हां येणार आहेत.'

'अच्छा. ते आले तर त्यांना माझ्या खोलीवर पाठवून द्या.'

मीं खोलींत येऊन कपडे बदलले नि विचार करूं लागलों. हा कॅप्टन केंकरे कोण ? माझ्याकडे याचं काय काम असणार ? केंकरे...केंकरे कुठंतरी ऐकलंय हें नांव...

एवढ्यांत दार वाजलं. मीं पुढं जाऊन दार उघडलं. दारांत कॅप्टन केंकरे उभा होता. त्यानं माझ्याशीं हस्तांदोलन केलं नि मला विचारलं, 'विजय, ओळखलंस का मला ?'

'हो...हो..'

'हो हो काय ? तूं ओळखलेलं नाहींस मला.' असं म्हणून तो मोठ्यानं हंसला नि माझ्या कॉटवर बसला. त्याचं हंसणं मला ओळखीचं वाटलं.

'अरे, तुझ्या जयरामच्या वर्गांत होतों मी कोल्हापूरला. आठवतं, तुमच्याकडे मी नेहमीं अभ्यासाला यायचा ! तुमचे अप्पा आम्हांला इंग्लिश नि संस्कृत शिकवीत.'

मग मला ओळख पटली. माझ्या मोठ्या भावाचा जयरामचा – हा दोस्त. आमच्याकडे नेहमीं यायचा नि असाच मोठ्यानं हसायचा.

'पण तुझ्यांत खूप बदल झालाय् हं आतां' मीं म्हटलं, 'तेव्हां तूं अगदीं लुकडा होतास !'

तो पुन्हां एकदा हंसला. मग म्हणाला, 'तुझ्याकडे मी दोन कामासाठीं आलोंय्.'

'कामाचं मग पाहूं रे. तूं चहा घेणार का कॉफी ?'

'चहा.'

मीं चहाची ऑर्डर दिली नि म्हटलं, 'बोला आतां कॅप्टनसाहेब. कुठं असतां तुम्ही सध्या ?'

'मी असतों महूला. दोन–तीन महिन्यांची रजा घेऊन आलोंय. येत्या तेवीसला माझं लग्न आहे.'

'कॉंग्रॅट्स्. कुठली मुलगी ?'

'इथली–मुंबईचीच आहे. तुझ्याकडे येण्याचं पहिलं कारण, तुला लग्नाचं आमंत्रण द्यायचं. तुला जरुर आलं पाहिजे हं लग्नाला.'

'हो हो. जरुर.–पण मुंबईलाच आहे ना लग्न ? कोल्हापूरला असेल तर मग —'

'छेः मुंबईलाच आहे लग्न. आणि–आणि दुसरं कारण असं—जरासं नाजुक आहे.'

'काय ?'

'उद्यां मी माझ्या भावी वधूला घेऊन खरेदीसाठीं जाणार आहें; तेव्हा...'

मीं मनाशीं म्हटलं, तूं आपल्या बायकोला घेऊन खरेदीसाठीं जाणार

आहेस, मग यांत माझा संबंध कुठं येतो ?

त्याला म्हटलं, 'बरं, पुढं ?'

'तेव्हां मला एक शंभर रुपये हवे आहेत. मीं बरोबर आणलेले सगळे पैसे संपले. माझा अकाउंट आहे तिकडल्या बँकेंत. पैसे काढायचे म्हटलं तर आणखी आठ-दहा दिवस जाणार. म्हणून तुझ्याकडे आलों. कोल्हापूरला गेलों होतों ना, तेव्हां जयरामनं तुझा पत्ता सांगितला होता. तो म्हणाला होता 'तुला लग्नाच्या वेळीं कांहीं मदत वगैरे लागली तर तूं विजयला भेट' म्हणून. अरे. त्यानं तुझा पत्ता सांगितला होता म्हणून बरं झालं. नाहींतर पंचाईतच होती ! इथं माझी कुणाशीं ना ओळख ना पाळख.'

'अं...किती हवे आहेत म्हणालास ?' मीं विचारलं.

'शंभर हवे आहेत. मी तुला लग्नाच्या वेळीं हे पैसे परत करीन. मीं परवां पुन्हा कोल्हापुरला जाणार आहें नि लग्नापूर्वीं दोन दिवस इकडे येणार आहें. तूं कसंहि करून आतां किंवा उद्या सकाळपर्यंत मला पैसे दे.'

त्याच्या चेहऱ्यावरून कांहीं तो लबाड वाटला नाहीं. समजा मी उद्यां पुण्याला किंवा कुठं गेलों नि तिथं माझ्याजवळचे सगळे पैसे संपले, तर मीं काय केलं असतं ? अशीच कुणाची तरी ओळख काढली असती नि असेच पैसे मागितले असते !

दहा-बारा तारीख असल्यामुळें माझ्याकडे पैसे होते. मीं मग फारसा विचार केला नाहीं. पाकिटांतून शंभराची एक नोट काढून त्याच्या हातावर ठेवली.

त्याला फार आनंद झाल्यासारखा दिसला. तो म्हणाला, 'फार आभारी आहें मी तुझा. मला कल्पना नव्हती इतक्या लवकर तूं पैसे देशील. खरं म्हणजे, तुला माझी ओळखहि पटलेली नव्हती अगोदर--पण विजय, तुला एक सांगूं ? तूं कुणावरहि इतका विश्वास ठेवत जाऊं नकोस. आतां माझी गोष्ट सोड. मी तुला पैसे दिल्याशिवाय राहणार नाहीं. पण या मुंबईत–'

'अहो कॅप्टनसाहेब, पुरे करा. मी माणूस बघूनच वागतों. तुझं काम झालं ना ? बस्स !'

'अच्छा. थँक् यू व्हेरी मच्. मी निघतों आतां. लग्नाच्या सुमाराला मी

आणून देईन पैसे.'

केंकरे गेला नि मग पुन्हा माझ्या मनांत विचार आला. आपण खरंच चुकलों का या व्यवहारांत! पण मीं पुन्हा त्याचे नि माझ्या भावाचे संबंध, त्याचा कॅप्टनचा हुद्दा, त्याच्या चेहऱ्यावरील भाव या साऱ्या गोष्टी विचारांत घेतल्या नि मनाशीं म्हटलं, आपण काहीं चुकलों नाहीं या व्यवहारांत. आपण त्याला मदत केली हें योग्यच झालं!...पण मग तो असं कां म्हणाला, मला कल्पना नव्हती इतक्या लवकर तूं पैसे दिलेस म्हणून? नि वर मला उपदेशहि केला!

त्या रात्रीं, माझ्या शेजारच्या खोलींत राहणारे प्रा. किंजवडेकर माझ्याकडे गप्पा मारायला आले. त्यांच्याजवळ मी ही गोष्ट बोललों. ते स्वतःशींच हंसले नि म्हणाले, 'अहो कांहीं सांगतां येत नाहीं कुणाचं. आपण अनुभव घेऊन आराखडे बांधायचे असतात व्यवहारांतले. पण एक गोष्ट नक्की. कुणालाहि पैसे उसनवार म्हणून देऊं नयेत. पैसे उसनवार देऊन आपण वाईटपणा नि मनस्ताप विकत घेतों. बाकी प्रत्येकानं हा धडा घेतलाच पाहिजे एकदां. त्याशिवाय शहाणपण येत नाहीं.'

किंजवडेकरांच्या बोलण्यामुळें मी आणखीनच काळजींत पडलों!

तेवीस तारखेला मी केंकरेच्या लग्नाला गेलों. जातांना मीं कांहीं अहेर नेला नाहीं. मला धास्ती होती. कदाचित् प्रा. किंजवडेकरांनीं सांगितल्या-प्रमाणं मीं दिलेले शंभर रुपयेच अहेर ठरायचा! पानसुपारी घेऊन मी उठलों नि केंकरेजवळ त्याचं अभिनंदन करण्यासाठीं गेलों

त्यानं माझी चौकशी केली नि हळूंच म्हटलं, 'मी एक–दोन दिवसांत तुझ्या खोलीवर येऊन जाईन हं. आणि समजा, यदाकदाचित् मीं आलों नाहीं. तर काळजी करूं नकोस. मी पंधरा वीस दिवसांनीं तरी नक्की येईन. मला एखाद्या वेळीं कोल्हापूरला जावं लागेल, सहकुटुंब देवीच्या दर्शनाला. तसं ठरलं तर मग कोल्हापूरहून आल्यावर येईन. चालेल ना?'

––आणि त्यानंतर दोन–चार दिवसांनीं तो जेव्हां आला नाहीं. तेव्हां मी समजलों तो कोल्हापूरला गेला असणार; आणखी पंधरा–वीस दिवस तरी वाट पाहावी लागणार. आणि त्या वेळीं आला तर ठीक. नाहींतर–मला वाटलं, प्रा. किंजवडेकर म्हणतात तेंच खरं. कुणालाहि पैसे उसने देऊं नयेत.

आपण नसती व्याधि आपल्यामागं लावून घेतों. पण ह्या पश्चात्‌बुद्धीचा काय उपयोग ? त्यानं पैसे मागण्यापूर्वीच जर किजवडेंवर आपल्याला म्हणाले असते तर अशी वेळ येती ना !

मी किजवडेकरांच्या खोलींत गेलों नि त्यांना म्हणालों, ' प्रोफेसरसाहेब, तुम्हीं सांगितलेला अनुभव घ्यावा लागणार अशीं लक्षणं दिसताहेत. '

' म्हणजे ! '

' म्हणजे काय ? मी परवां आमच्या केंकऱ्यांच्या लग्नाला गेलों होतों. त्यांनीं पैशाची मुदत वाढवून मागितली आहे. आणखी पंधरा–वीस दिवस. '

यांवर ते मनापासून हसले. म्हणाले, ' माणसानं धडा घ्यायचा असतो एकेक. मला वाटतं, आतां पंधरा दिवसांनीं तरी तो येईल नाहीं देव जाणे ! '

एक आठवडा गेला. दुसरा संपूं लागला...संपला देखील. तरी केंकरेचा पत्ता नाहीं. किजवडेकरांचं भविष्य खरं होणार असं दिसूं लागलं. माझा धीर सुटत चालला. मग मीं माझ्या मोठ्या भावाला पत्र लिहिलं नि त्याचा दोस्त केंकरे कसा काय आहे याबद्दल विचारणा केली.

——भावाचं पत्र आलं तें धक्का देणारं ! भावानं लिहिलं होतं. ' केंकरे सज्जन माणूस आहे, त्याला तूं ऐन वेळीं मदत केलीस हे योग्यच झालं. तो कांहीं पैसे लुबडणार नाहीं. तूं काळजी करूं नकोस. शंभराच्या जागीं जरी पांचशे रुपये दिले असतेस तरी मीं हेंच म्हटलं असतं ! '

–भावाचं पत्र पाहून किजवडेकर हंसले नि म्हणाले, ' तुम्ही दोघेहि भाऊ फार सरळ दिसतां बुवा ! तुम्हांला माणसाची पारख नाहीं. हे मिलिटरीवाले, म्हणजे यांना सतराशेंसाठ व्यसनं. अहो, लहानपणचा दोस्त, त्याची खात्री आतां कशी देतां येईल तुमच्या मोठ्या भावाला ? आपल्या सतत परिचयाच्या माणसाचीसुद्धां खात्री देतां येत नाहीं आजकाल. तुमचे पैसे गेले असं धरा तुम्हीं. '

एक महिना होत आला, तरी केंकरे आला नाहीं. मी काळजींत पडलों. भावाला नि त्याला शिव्या देऊं लागलों; केंकरे आला कीं त्याला असं बोलायचं, तसा दम द्यायचा असं ठरवूं लागलों. तो माझ्या खोलीवर आला कीं प्रथम त्याचा टाय् धरून...

पण जेव्हां अचानक एका संध्याकाळीं तो नि त्याची बायको माझ्या

'हो...हो..'

'हो हो काय ? तूं ओळखलेलं नाहींस मला.' असं म्हणून तो मोठ्यानं हंसला नि माझ्या कॉटवर बसला. त्याचं हंसणं मला ओळखीचं वाटलं.

'अरे, तुझ्या जयरामच्या वर्गांत होतों मी कोल्हापूरला. आठवतं, तुमच्याकडे मी नेहमीं अभ्यासाला यायचा! तुमचे अप्पा आम्हांला इंग्लिश नि संस्कृत शिकवीत.'

मग मला ओळख पटली. माझ्या मोठ्या भावाचा जयरामचा – हा दोस्त. आमच्याकडे नेहमीं यायचा नि असाच मोठ्यानं हसायचा.

'पण तुझ्यांत खूप बदल झालाय् हं आतां' मीं म्हटलं, 'तेव्हां तूं अगदीं लुकडा होतास!'

तो पुन्हां एकदा हंसला. मग म्हणाला, 'तुझ्याकडे मी दोन कामासाठीं आलोंय्.'

'कामाचं मग पाहूं रे. तूं चहा घेणार का कॉफी ?'

'चहा.'

मीं चहाची ऑर्डर दिली नि म्हटलं, 'बोला आतां कॅप्टनसाहेब. कुठं असतां तुम्ही सध्या ?'

'मी असतों महूला. दोन–तीन महिन्यांची रजा घेऊन आलोंय. येत्या तेवीसला माझं लग्न आहे.'

'काँग्रॅट्स्. कुठली मुलगी ?'

'इथली–मुंबईचीच आहे. तुझ्याकडे येण्याचं पहिलं कारण, तुला लग्नाचं आमंत्रण द्यायचं. तुला जरुर आलं पाहिजे हं लग्नाला.'

'हो हो. जरुर.–पण मुंबईलाच आहे ना लग्न ? कोल्हापूरला असेल तर मग —'

'छेः मुंबईलाच आहे लग्न. आणि–आणि दुसरं कारण असं––जरासं नाजुक आहे.'

'काय ?'

'उद्यां मी माझ्या भावी वधूला घेऊन खरेदीसाठीं जाणार आहें; तेव्हा...'

मीं मनाशीं म्हटलं, तूं आपल्या बायकोला घेऊन खरेदीसाठीं जाणार

आहेस, मग यांत माझा संबंध कुठं येतो ?

त्याला म्हटलं, ‘ बरं, पुढं ?’

‘ तेव्हां मला एक शंभर रुपये हवे आहेत. मीं बरोबर आणलेले सगळे पैसे संपले. माझा अकाउंट आहे तिकडल्या बँकेंत. पैसे काढायचे म्हटलं तर आणखी आठ–दहा दिवस जाणार. म्हणून तुझ्याकडे आलों. कोल्हापूरला गेलों होतों ना, तेव्हां जयरामनं तुझा पत्ता सांगितला होता. तो म्हणाला होता ‘ तुला लग्नाच्या वेळीं कांहीं मदत वगैरे लागली तर तूं विजयला भेट ’ म्हणून. अरे, त्यानं तुझा पत्ता सांगितला होता म्हणून बरं झालं. नाहींतर पंचाईतच होती ! इथं माझी कुणाशीं ना ओळख ना पाळख.’

‘ अं... किती हवे आहेत म्हणालास ?’ मीं विचारलं.

‘ शंभर हवे आहेत. मी तुला लग्नाच्या वेळीं हे पैसे परत करीन. मीं परवां पुन्हा कोल्हापुरला जाणार आहें नि लग्नापूर्वीं दोन दिवस इकडे येणार आहें. तूं कसंहि करून आतां किंवा उद्या सकाळपर्यंत मला पैसे दे. ’

त्याच्या चेहऱ्यावरून कांहीं तो लबाड वाटला नाहीं. समजा मी उद्यां पुण्याला किंवा कुठं गेलों नि तिथं माझ्याजवळचे सगळे पैसे संपले, तर मी काय केलं असतं ? अशीच कुणाची तरी ओळख काढली असती नि असेच पैसे मागितले असते !

दहा–बारा तारीख असल्यामुळें माझ्याकडे पैसे होते. मीं मग फारसा विचार केला नाहीं. पाकिटांतून शंभराची एक नोट काढून त्याच्या हातावर ठेवली.

त्याला फार आनंद झाल्यासारखा दिसला. तो म्हणाला, ‘ फार आभारी आहें मी तुझा. मला कल्पना नव्हती इतक्या लवकर तूं पैसे देशील. खरं म्हणजे, तुला माझी ओळखहि पटलेली नव्हती अगोदर–पण विजय, तुला एक सांगूं ? तूं कुणावरहि इतका विश्वास ठेवत जाऊं नकोस. आतां माझी गोष्ट सोड. मी तुला पैसे दिल्याशिवाय राहणार नाहीं. पण या मुंबईत–’

‘ अहो कॅप्टनसाहेब, पुरे करा. मी माणूस बघूनच वागतों. तुझं काम झालं ना ? बस्स !’

‘ अच्छा. थँक् यू व्हेरी मच्. मी निघतों आतां. लग्नाच्या सुमाराला मी

आणून देईन पैसे.'

केंकरे गेला नि मग पुन्हा माझ्या मनांत विचार आला. आपण खरंच चुकलों का या व्यवहारांत! पण मीं पुन्हा त्याचे नि माझ्या भावाचे संबंध, त्याचा कॅप्टनचा हुद्दा, त्याच्या चेहऱ्यावरील भाव या साऱ्या गोष्टी विचारांत घेतल्या नि मनाशीं म्हटलं, आपण काहीं चुकलों नाहीं या व्यवहारांत. आपण त्याला मदत केली हें योग्यच झालं!...पण मग तो असं कां म्हणाला, मला कल्पना नव्हती इतक्या लवकर तूं पैसे दिलेस म्हणून? नि वर मला उपदेशहि केला!

त्या रात्रीं, माझ्या शेजारच्या खोलींत राहणारे प्रा. किजवडेकर माझ्याकडे गप्पा मारायला आले. त्यांच्याजवळ मी ही गोष्ट बोललों. ते स्वतःशींच हंसले नि म्हणाले, 'अहो कांहीं सांगतां येत नाहीं कुणाचं. आपण अनुभव घेऊन आराखडे बांधायचे असतात व्यवहारांतले. पण एक गोष्ट नक्की. कुणालाहि पैसे उसनवार म्हणून देऊं नयेत. पैसे उसनवार देऊन आपण वाईटपणा नि मनस्ताप विकत घेतों. बाकी प्रत्येकानं हा धडा घेतलाच पाहिजे एकदां. त्याशिवाय शहाणपण येत नाहीं.'

किजवडेकरांच्या बोलण्यामुळें मी आणखीनच काळजींत पडलों!

तेवीस तारखेला मी केंकरेच्या लग्नाला गेलों. जातांना मीं कांहीं अहेर नेला नाहीं. मला धास्ती होती. कदाचित् प्रा. किजवडेकरांनीं सांगितल्याप्रमाणं मीं दिलेले शंभर रुपयेच अहेर ठरायचा! पानसुपारी घेऊन मी उठलों नि केंकरेजवळ त्याचं अभिनंदन करण्यासाठीं गेलों

त्यानं माझी चौकशी केली नि हळूंच म्हटलं, 'मी एक-दोन दिवसांत तुझ्या खोलीवर येऊन जाईन हं. आणि समजा, यदाकदाचित् मीं आलों नाहीं. तर काळजी करूं नकोस. मी पंधरा वीस दिवसांनीं तरी नक्की येईन. मला एखाद्या वेळीं कोल्हापूरला जावं लागेल, सहकुटुंब देवीच्या दर्शनाला. तसं ठरलं तर मग कोल्हापूरहून आल्यावर येईन. चालेल ना?'

---आणि त्यानंतर दोन-चार दिवसांनीं तो जेव्हां आला नाहीं. तेव्हां मी समजलों तो कोल्हापूरला गेला असणार; आणखी पंधरा-वीस दिवस तरी वाट पाहावी लागणार. आणि त्या वेळीं आला तर ठीक. नाहींतर-मला वाटलं, प्रा. किजवडेकर म्हणतात तेंच खरं. कुणालाहि पैसे उसने देऊं नयेत.

आपण नसती व्याधि आपल्यामागं लावून घेतों. पण ह्या पश्चात्‌बुद्धीचा काय उपयोग ? त्यानं पैसे मागण्यापूर्वीच जर किजवडेवर आपल्याला म्हणाले असते तर अशी वेळ येती ना !

मी किजवडेकरांच्या खोलींत गेलों नि त्यांना म्हणालों, 'प्रोफेसरसाहेब, तुम्हीं सांगितलेला अनुभव घ्यावा लागणार अशीं लक्षणं दिसताहेत.'

'म्हणजे !'

'म्हणजे काय ? मी परवां आमच्या केंकऱ्यांच्या लग्नाला गेलों होतों. त्यांनीं पैशाची मुदत वाढवून मागितली आहे. आणखी पंधरा–वीस दिवस.'

यांवर ते मनापासून हसले. म्हणाले, 'माणसानं धडा घ्यायचा असतो एकेक. मला वाटतं, आतां पधरा दिवसांनीं तरी तो येईल नाहीं देव जाणे !'

एक आठवडा गेला. दुसरा संपूं लागला...संपला देखील. तरी केंकरेचा पत्ता नाहीं. किजवडेकरांचं भविष्य खरं होणार असं दिसूं लागलं. माझा धीर सुटत चालला. मग मीं माझ्या मोठ्या भावाला पत्र लिहिलं नि त्याचा दोस्त केंकरे कसा काय आहे याबद्दल विचारणा केली.

——भावाचं पत्र आलं तें धक्का देणारं ! भावानं लिहिलं होतं. 'केंकरे सज्जन माणूस आहे, त्याला तूं ऐन वेळीं मदत केलीस हे योग्यच झालं. तो कांहीं पैसे लुबडणार नाहीं. तूं काळजी करूं नकोस. शंभराच्या जागीं जरी पांचशे रुपये दिले असतेस तरी मीं हेंच म्हटलं असतं !'

—भावाचं पत्र पाहून किजवडेकर हंसले नि म्हणाले, 'तुम्ही दोघेहि भाऊ फार सरळ दिसतां बुवा ! तुम्हांला माणसाची पारख नाहीं. हे मिलिटरीवाले, म्हणजे यांना सतराशेंसाठ व्यसनं. अहो, लहानपणचा दोस्त, त्याची खात्री आतां कशी देतां येईल तुमच्या मोठ्या भावाला ? आपल्या सतत परिचयाच्या माणसाचीसुद्धां खात्री देतां येत नाहीं आजकाल. तुमचे पैसे गेले असं धरा तुम्हीं.'

एक महिना होत आला, तरी केंकरे आला नाहीं. मी काळजींत पडलों. भावाला नि त्याला शिव्या देऊं लागलों; केंकरे आला कीं त्याला असं बोलायचं, तसा दम द्यायचा असं ठरवूं लागलों. तो माझ्या खोलीवर आला कीं प्रथम त्याचा टाय् धरून...

पण जेव्हां अचानक एका संध्याकाळीं तो नि त्याची बायको माझ्या

खोलीवर आलीं तेव्हां मी मनापासून त्यांचं स्वागत केलं. कधीं येणार नाहीं असं वाटलेला इसम अचानक आल्यामुळं कदाचित् असं घडलं असावं. तो आणि त्याची बायको—दोघंहि गोडबोलीं, विनोदी. मनांत नसतांहि गोष्टी रंगू लागल्या. केंकरेबद्दल मला एक वेगळंच आकर्षण वाटूं लागलं

आमच्या गप्पा झाल्यावर तो म्हणाला, 'आम्हीं आतां पांच–सात मिनिटांत निघणार हं. फार उशीर झालाय्–'

इतक्या गप्पांनंतर आतां पैशाचा विषय कसा काढायचा ? नि तोहि त्याच्या बायकोसमोर ? मी विचारांत पडलों.

एवढ्यांत केंकरेनें मला बाहेर बोलावलं. मीं ओळखलं, आतां पैसे परत मिळणार !

बाहेर आल्यावर तो म्हणाला, 'विजय, तूं फार घाबरला असशील, नाहीं ? इतके दिवस होऊन गेले—खरं म्हणजे मी तुला एखादं पत्र तरी टाकायला हवं होतं. पण आळसामुळं नि इतर कामांच्या धांदलींत जमलंच नाहीं बघ ! मला कोल्हापूरहून लवकर निघतांच येईना. इकडे जा तिकडे जा करतांनाच सगळे दिवस संपून गेले. येतांना मी पैसे घेऊन आलों. पण काय झालं, वडील म्हणाले, 'धाकट्या भावाला घेऊन पुण्याला जा नि त्याचं कॉलेजमध्यें नांव घाल.' तुला सांगतों, आम्हां मिलिटरीमधल्या सगळ्या लोकांचाच हा अनुभव आहे. आमच्या घरच्या मंडळींना ठाऊक असतं बँकेंत आम्हीं भरपूर शिल्लक टाकली आहे म्हणून. पैसे मागायला तर संकोच वाटतो. मग ते काय करतात, कुठं धाकट्या भावंडांच्या फीच भरायला लाव, कुठं त्यांना पुस्तकं आणून द्यायला लाव, कुठं कपडे करायला लाव असं करून आमच्याकडून ते घेतात पैसे काढून ! वडिलांनीं मला धाकट्या भावाचं नांव कॉलेजमध्यें घालायला सांगितलं, तिथं कॉलेजची फी, त्याला खर्चासाठीं म्हणून पैसे असं करतांना माझें दोनशडीचशें रुपये खलास झाले. चार दिवसांनीं आम्हीं जाणार म्हटला. आतां पैसे कुठनं आणणार ? बरं वडिलांजवळ पैसे मागणें बरं दिसेल का ?'

'मी गैरसावधपणें म्हटलं खरं आहे तूं म्हणतोस तें !'

'तेव्हां तुझे मागले शंभर रुपये, नि आत्तां मी मागेन ते...'

'म्हणजे ?'

'म्हणजे तूं मला आणखी शंभर रुपये दे आत्तां. मी महूला गेल्यावर तुला लगेच पैसे पाठवून देईन.'

'पण मी आतां कुठले शंभर रुपगे देऊं ? शिवाय आणखी पंधरा दिवसांतीं दोन महिन्यांची रजा घेऊन मी कोल्हापूरला घरीं जाणार आहें. तुझे पैसे केव्हां येणार ?'

'ए विजय, प्लीज. तूं कांहीं करून मला आणखी शंभर रुपये दे. तुला मी तिकडल्या बँकेचा चेक देतों दोनशेंचा. चेक वटवून घ्यायला आणखी आठ दिवस लागतील नि तेवढे दिवस मला थांबतां येणार नाहीं म्हणून हा खटाटोप. तुला चेक वटल्यावर आठ दिवसांत पैसे मिळतील. तूं कुणाकडून तरी पैसे घे नि मला दे. मी तुला चेक देतों.'

'अरे पण–'

मला सगळी कल्पना आहे रे. कुणाचाहि विश्वास बसणार नाहीं असं घडलंय् खरं. तुझ्या जागीं जर असतों तर मीहि असाज बावचळलों असतों· पण तूं माझ्यावर विश्वास ठेव. मी बायकोला म्हटलंय् इथं माझं नक्की काम होईल म्हणून–तुझा विश्वास नसेल तर माझं हें घड्याळ ठेवूं का तुझ्याकडे ? चांगल्या कंपनीचं आहे–'

'घड्याळ बिड्याळ असं कांहीं नको रे, पण–'

'अं हं, तूं कांहीं कर नि मला आणखी शंभर रुपये दे. मी माझा शब्द हीच खात्री देतों.' असं म्हणून त्यानं माझ्या उत्तराची वाट न पाहतां खिशांतून चेकबुक काढलं नि मला दोनशेंचा चेक लिहून दिला.

त्याची चमत्कारिक परिस्थिति नि माझ्या भावाचा त्याच्यावरला विश्वास या दोन गोष्टींकडे पाहून मी कबूल झालों. त्याला नि त्याच्या बायकोला खोलींत बसवून मी शेजरीं किजवडेकरांकडे गेलों. त्यांचा सल्ला घ्यायला नि ते 'द्या' म्हणाले तर त्यांच्याकडून शंभर रुपये मागायला. पण त्यांच्या खोलीला होतं कुलूप. मग मी आमच्या मॅनेजरांकडे गेलों नि त्यांना म्हणालों, 'आतां माझा एक दोस्त आलाय्. त्याला शंभर रुपयांची नड आहे-तुम्हीं मला एक शंभर रुपये द्याल ? येत्या एक तारखेला बिलाबरोबर हे पैसे देऊन टाकीन. कारण त्याचं असं झालंय्–'

'हें काय मानेसाहेब, कशाला एवढं हवं ? गेलीं तीन वर्षं तुम्ही इथं रहाताय्. तुम्हीं नुसता हुकूम करायचा–'मॅनेजर, अमुक एक रक्कम द्या. म्हणून. आम्हीं काय माणसं ओळखत नाहीं ?'

त्यांनीं शंभराची नोट माझ्या हातावर ठेवली.

'थँक्यू !' मी कांहींशा ओशाळचा स्वरांत म्हटलं.

खोलींत आल्यावर मी केंकरेला पैसे दिले नि त्याचा दोनशेंचा चेक खिशांत टाकला. केंकरेनं पुनः पुनः माझे आभार मानले नि तो गेला.

रात्रीं जेवतांना किजवडेकर माझ्या शेजारीं बसले होते. मीं विषयाला सुरुवात केली.

'आज केंकरेसाहेब आले होते. सहकुटुंब.'

'नशीबवान आहांत. झालं ना काम ?'

'झालं.–पण त्यांचं, माझं नाहीं.'

'याचा अर्थ ?'

'अगदीं सोपा आहे. त्यांना आणखी शंभर रुपये हवे होते नि मी त्यांना दिले.'

'आणखी ? कमाल आहे तुमच्या व्यवहारापुढं. पण हें झालं कसं काय ?'

मीं त्यांना सगळीं हकीकत सांगितली नि त्याच्या खिदळणाऱ्या चेहऱ्यापुढें केंकरेनें दिलेला दोनशेंचा चेक धरला. ते आणखीच हंसयला लागले.

'अहो, चेकवर काय विश्वास ठेवलात ? त्याला काय ? रोख दोनशें रुपये घेऊन त्यानं त्यानं तुम्हांला दोन हजारांचा चेक दिला असता. चेक खोटाच द्यायचा, त्याला काय ?'

'बरं, झालं तें झालं. किजवडेकरसाहेब, माझं आतां एक कम करा. तुमचा बँकेत अकाऊंट आहे ना ?'

'आहे.'

'मग माझा हा चेक कॅश् करून द्या. खरं काय तें कळेल नि शिवाय खरं असेल तर मला लगेच पैसेहि मिळतील. आणखी दोन आठवड्यांनीं मी जातोंय् कोल्हापूरला. दोन महिन्यांसाठीं.'

'बरं.' म्हणून किजवडेकरांनीं तो चेक स्वतःजवळ ठेवून घेतला.

दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं ते माझ्याकडे आले नि म्हणाले, 'आज बँकेंत चेक दिलाय् हं. आणखी आठ दिवस कॅश् व्हायला लागतील.'

'चालेल,'

'तुम्हीं धडा मात्र छान घेणार हं या व्यवहारांत.' ते मला खोचून म्हणाले.

मी कांहींच बोललों नाहीं.

आठ दिवस झाले, दहा दिवस झाले. मग मीं किजवडेकरांना आठवण करून दिली. ते म्हणाले, 'अरेच्चा, विसरलोंच होतों मी. आज बँकेंत जाऊन तपास करून येतों हं !'

त्या दिवशीं मी रात्रीच्या साडेनऊच्या 'शो'ला गेलों होतों. सिनेमाहून परत आलों तों जिन्याशीं किजवडेकर भेटले. तेहि, मला वाटतं, कुठंतरी सिनेमाला गेले होते. मी धीर करून त्यांना विचारलं, 'आज बँकेत गेलां होतां ?'

ते काय उत्तर देतात इकडे निकाल ऐकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या उत्सुकतेनं मी पाहूं लागलों.

'पेढे काढा मिस्टर, पेढे !'

'म्हणजे ? चेक वटवला गेला ?'

'अर्थात्. नशीबवान आहांत बुवा !'

माझा प्रथम विश्वासच बसेना. मीं त्यांना पुन्हा विचारलं तेव्हां ते म्हणाले, 'केवळ नशीबानं पैसे मिळाले; मनुष्य चांगला निघाला. वाईट एवढंच वाटतं की यामुळं तुम्हीं पुन्हां अशी घोडचूक कराल नि आतां दोनशें ऐवजीं वाटेल तेवढी रक्कम घालवून बसाल. खरं म्हणजे तुम्हांला चांगला धडा मिळायला हवा होता !'

मी नुसता हंसलों. केंकरेला मीं ऐन वेळीं मदत केली याबद्दल मला धन्य वाटलं.

वरं. उद्यां सकाळीं पैसे आणून देतों. चालेल ना ? का आतां देऊं ?'

'छे: छे: घाई होती ती चेक वटवला गेला कीं नाहीं तें कळण्याची. आतां तुम्हीं उद्यां पैसे द्या कीं परवां द्या.'

'अं हं, उद्या सकाळींच. येतों मी.' ते म्हणाले.

—ठरल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं सकाळींच किजवडेकर माझ्याकडे आले. म्हणाले, 'तुम्हांला पैसे द्यायला नि तुमच्याकडून चहा घ्यायला मी आलोंय्.'

'जरूर. जरूर.'

आमचा चहा झाला. किजवडेकरांनीं मला खूप उपदेश केला नि मग माझ्या स्नेहचावर अविश्वास दाखविल्याबद्दल दिलगिरीहि प्रदर्शित केली.

निघतांना त्यांनीं खिशांतून दहाच्या दहा नोटा काढून माझ्या हातावर ठेवल्या नि म्हटलं' 'मानेसाहेब, हे शंभर रुपये घ्या. तुमचे बाकीचे पैसे मीं काल वापरले आहेत. माझं 'इकॉनमिक्स 'चं गाईड छापलं जातंय् ना तिकड खर्च झाले. मी चार–आठ दिवसांत परत करीन.'

हे पैसे अचानक मिळाल्यामुळें मी खुषींत होतों. मीं त्यांना चटकन् म्हटलं, 'सावकाश द्या पैसे. सध्यां माझी घाई नाहीं.'

'हेंच पाहा मानेसाहेब. तुम्हांला अजून व्यवहार समजलेला नाहीं. तुम्ही चटकन् असा विश्वास टाकतां. आतां मी आहें तें सोडा, पण दुसरा एखादा असता तर—'

'अहो, पण माणूस ओळखतां येतो कीं नाहीं ? तुमची गोष्ट वेगळी आहे.'

'बरं तुम्ही आतां लवकरच कोल्हापूरला जाताय् ना ? मग मला पत्ता देऊन ठेवा. मी मनीऑर्डरनें पैसे पाठवून देईन.

माझा पत्ता घेऊन ते निघून गेले.

मीं ते शंभर रुपये घेऊन प्रथम मॅनेजरना दिले तेव्हां मला अगदीं मोकळं मोकळं झालं....रजा मिळाल्यावर मी कोल्हापूरला गेलों. पण माझ्या तिथल्या दोन महिन्यांच्या वास्तव्यांत किजवडेकरांची मनीऑर्डर आली नाहीं ती नाहींच.

—मी मुंबईला परत आलों. माझ्या शेजारच्या खोलींत किजवडेकर नव्हते. मला वाटलं, त्यांनीं खोली बदलली असेल. मी मग मॅनेजरांकडे जाऊन त्यांना विचारलं. तेव्हां ते म्हणाले, 'किजवडेकर ना ? महा लफंग्या होता तो. कसला प्रोफेसर नि काय ? त्याला यंदा कॉलेजमधून काढून टाकलं होतं नि हा खुशाल थापा मारून इथं राहिला होता. अहो, देणं नास्ति, घेणं

नास्ति. दीड महिन्यापूर्वी अचानक पळून गेला इथून. आमचे जवळ जवळ तीनशें रुपये बुडवले त्यानं. आणख़ीहि म्हणे बऱ्याच जणांना गंडवलंय् त्यानं!'

'आँ ? म्हणजे ?'

'म्हणजे काय ? चेष्टा नाहीं. खरंच सांगतों. तीनशें रुपयांना चाट बसवून हा धडा शिकलों. कुणावरहि विश्वास ठेवूं नये आजकाल. यापुढं आतां कुणालाहि ॲडव्हान्स पैसे घेतल्याशिवाय—'

—माझं त्यांच्या बोलण्याकडे लक्षच नव्हतं. कारण मी मनांतल्या मनांत माझा धडा गिरवीत होतों !

— मुंबई–आकाशवाणी–केंद्राधिकाऱ्यांच्या सौजन्यानें.

० ० ०

२६४०५
१५७७
११।२।६२

# १४ : येथें कारकून पिकतात

बदामी कागदावर टाईप केलेला तो मजकूर वाचून रामभाऊ पेटकर अगदीं खूष झाले. सरकारी नोकरांसाठीं मुंबईंत रहाण्याजोगे गाळे बांधण्याची योजना असून तिचा ज्यांना फायदा घ्यायचा असेल त्यांनीं विशिष्ट मुदतींत अर्ज करावा अशा अर्थाचा तो मजकूर वाचूनच जागा मिळाल्याइतकें समाधान रामभाऊंनीं आपल्या खिशांत भरून घेतलें. ही आनंदाची बातमी धांवत जाऊन सौ. च्या कानीं घालावी.

छे: ! तरीसुद्धां तीन तास लागले असते ! बदलापूरला राहून मुंबईंत कामाला येणं ही इतकी साधी गोष्ट नव्हती. नुसत्या जाण्यायेण्यांत चार तास जात. सकाळीं आठला घराबाहेर पडलेले रामभाऊ पेटकर रात्रीं नवाला घरीं परत येत. सौ. शीं कधीं निवांतपणीं बोलणं नाहीं कीं चांगलं हुडसून खडसून पोरांना अभ्यासाबद्दल विचारणं नाहीं. सकाळीं उठल्यापासून गाडी गांठण्याच्या गोष्टी आणि घरीं आल्यानंतर थकव्यामुळं गादी गांठण्याचे विचार यांत उरलासुरला वेळ जाई. यामुळं रामभाऊ त्रासले होते. सौ. पेटकर कंटाळल्या होत्या आणि पोरं––त्यांचं वेगळंच होतं !

रमेश, उमेश आणि निमा––तिन्ही मुलं हुषार. अभ्यास करतीं तर पहिल्या नंबरनंतरचा नंबर ना मिळता. पण रामभाऊंचं पाऊल आठ वाजतां

घराबाहेर पडलं कीं हे तीन दुणें सहा पाय आठ वाजून दहा मिनिटाला घर सोडीत. दिवेलागणी होऊन अगदीं दिसेनासं होई तेव्हां नाइलाजानं त्यांचं खेळणं थांबे. सौ. पेटकर मग चिडत आणि रामभाऊ घरीं आले कीं त्यांच्या कानावर ह्या सगळ्या गोष्टी घालीत. आतां राममाऊ भडकतील आणि रमेशला रागानं हांक मारतील म्हणून त्या वाट पहात; पण झोंपी गेलेले रामभाऊ फक्त या कुशीवरून त्या कुशीवर वळण्याखेरीज कांहीं करीत नसत. 'ह्या बदलापूरला आल्यापासून पोरांचं लक्षण कांहीं ठीक नाहीं. ह्यांचा सगळा दिवस जातो बाहेर, कधीं पोरांच्या अभ्यासाची चौकशी नाहीं कीं कधीं कुणाशीं चार शब्द बोलणं नाहीं !' दिवसांतून सतरा वेळां सौ. पेटकर असं बोलत.

अशाच अर्थाचं रामभाऊहि ऑफिसांत बोलत. कुणाजवळ मुंबईंत जागा मिळेल का म्हणून चौकशी करीत आणि पागडींचे किंवा भाड्याचे आंकडे ऐकून गप्प रहात.

एखाद्या रविवारीं दुपारीं झोंपच आली नाहीं तर बायकोशीं बोलतांना ते म्हणत, 'आतां मुंबईंत जागा मिळाल्याखेरीज कांहीं ठीक होणार नाहीं. आपल्याला मुलं झालीं म्हणून केवळ संसार केला म्हणायचा. नाहींतर ना कधी बोलणं, ना फिरणं. मुलांच्या शिक्षणाचीहि आबाळ होतेय्. मुंबईंतल्या मुंबईंत त्याचं शिक्षण होईल. त्यांच्याकडे लक्ष देऊन आपल्याला त्यांना वकील डॉक्टर किंवा इंजिनिअर--कांहींतरी करतां येईल !'

'खरं आहे. बदलापूरहून बदली करून घेतल्याखेरीज कांहीं होणार नाहीं. नाहीतर कारकुनी आहेच !'

'पहिल्या जेम्मचा पुत्र दुसरा जेम्स, दुसऱ्या जेम्सचा पुत्र तिसरा जेम्स तसं कारकून नंबर एकचा पुत्र कारकून नंबर दोन आणि दोन नंबरचा'...

'तुम्हाला खटपट करायला नको ! इतक्या लोकांना जागा मिळतात मुंबईंत'—

'तूं जागेबद्दल कितीहि बोललीस तरी खिशांत पांचदहा हजार रुपये असल्याखेरीज कांहींच होणार नाहीं !'

'मग बसा इथंच, बदलापूर एके बदलापूर करीत.'

ह्या संवादाचे शेकडों प्रयोग झाले होते. आणि बहुतेक वेळीं सौ. पेटकर जिंकल्या होत्या.

'सरकार आपल्या नोकरांसाठीं गाळे बांधणार आहे'— ही बदामी कागदावरलीं टाईप केलेलीं अक्षरं रामभाऊंना गुदगुल्या करूं लागलीं. मनांतल्या मनांत ते मुंबईंतल्या नव्या जागेंत आले, बायकोशीं बसूं–बोलूं लागले मुलांचे अभ्यास घेऊं लागले, मुलं मोठीं झालीं. रमेश वकील झाला, उमेश इंजिनिअर झाला. निमाचं लग्न होऊन तिला चागलं स्थळ मिळालं ! मुंबईनं सगळ्यांवर जादू केली.

रात्रीं नऊ वाजतां रामभाऊ घरीं आले ते गाणं गुणगुणत. त्यांच्या बायकोला आश्चर्य वाटलं.

'आज कांहीं विशेष ?'

'हं' पुन्हां गाण्याची ओळ, 'हांसत वसंत ये वनी'—

'हं काय नुसतं ? कांहीं सांगा ना ?'

'अलबेला, हाऽऽ! तूंच ओळख पाहूं. प्रियकर पसंत ऽ'

'तुम्हांला वरची जागा मिळाली !

'न न न न ना; हाऽऽ–अर्धवट बरोबर'

'म्हणजे वरची नाहीं, पण मुंबईंत जागा'

'मिळाली ?'

'मिळणार.'

'केव्हां ?'

'पांच सहा महिन्यांत.'

आणि मग रामभाऊंनीं त्यांना सरकारी योजना समजावून सांगितली. नाहीं म्हटल तरी आपलं सरकार 'आहे,' असें कौतुकाचे उद्‌गार काढून त्या नव्या जागेंतल्या सोयी, तिथं जाण्यापासूनचे फायदे सांगितले आणि मग बायकोलाहि मनांतल्या मनांत नवींनवीं चित्रं काढायला संधि दिली. भिंतीवर कावळ्यासारखा मोर भरलेली फ्रेम तिच्या चित्रकलेची साक्ष देत होती. तिला स्मरून सौ. पेटकरांना चांगलीं चित्रंच रंगवितां येईनात. त्या रामभाऊंना प्रश्न विचारूं लागल्या.

'तिथं शेजार चांगला असेल ना ? नाहींतर आपल्या उजव्या हाताला कुणी एकादा खान रहायला यायचा आणी डाव्या हाताला किरिस्तांव.'

'अग, आपण संबंध ठेवूं नये त्यांच्याशीं ! आणि कदाचित् तसं झालं तर आम्हांला खटपट करून दुसरी जागा मागतां येईल.'

'आणि मुलांच्या शाळेचं काय ?'

रामभाऊ चिडले. 'मुलांना मुंबईहून रोज बदलापूरला शाळेंत पाठवूं झालं !'

यावर त्यांची बायको हंसूं लागली आणि रामभाऊंचा पारा उतरला 'अग, मुंबईंत जागा मिळणं म्हणजे हातांत जादूची कांडी मिळणं आहे. आतां मला भरपूर वेळ मिळेल, विश्रांति मिळेल. मुलांचे अभ्यास सुधारतील. तुलाहि कांहीं शिकतां येईल.'--

'मला भरतकामाची कित्ती आवड होती. मुंबईंत मी जात जाईन क्लासांत. हा मोर जेव्हां भरला ना मी'--भिंतीवरल्या फ्रेमकडे पाहून त्या बोलूं लागल्या. 'तेव्हां माझी मावशी काय म्हणाली ठाऊक आहे ?'

'-कीं हा कावळा कुणीं भरला. असंच ना ?

'तुम्हांला काय होतं चेष्टा करायला ?' ती म्हणाली, 'ही क्लासांत गेली तर पहिला नंबर काढील.'

'तुझ्या क्लासापेक्षां मुलांचं शिक्षण महात्त्वाचं आहे. रमेशला मी वकील करायचं ठरवलंय् आणि उमेशला डॉक्टर नाहींतर इंजिनिअर.'

'पण अर्ज केलांत का तुम्ही ?'

'.उद्यां करणार आहें.' अर्ज असा लिहितों कीं साहेबांनीं जागा दिलीच पाहिजे मला. आमच्या पोंगुर्लेकरसाहेबांचा फार जीव आहे माझ्यावर. सारखे पेटकर पेटकर करीत असतात. त्यांनाहि मी खटपट करायला सांगेन. त्यांच्या हातांत आहे सगळं.

'आणि कळणार केव्हां जागा मिळाल्याचं ?'

'दोन महिन्यांनीं. तोंवर मुलांच्या परीक्षा आटपतील. जूनला मुंबईंत त्यांचं नांव घालूं'

मुंबईबद्दल, मुंबईतल्या जागेबद्दल बोलतां बोलतां दोन महिने केव्हां निघून गेले कांहीं कळलं नाहीं.

ज्या दिवशीं निकाल होता तो दिवस उगवला. रामभाऊंनीं आणि त्यांच्या पत्नीनं देवाला गाऱ्हाणं घातलं.

रात्रीं रामभाऊ निकाल सांगेपर्यंत त्यांच्या बायकोच्या जिवांत जीव नव्हता. मुंबईला जागा मिळणारच ह्या खात्रीनं त्यांनीं शेजारीं टिमकी पिटवली होती. मालकांच्या बायकोशीं भांडण केलं होतं नि मालकाच्या तोंडावर सध्याच्या जागेला गोठा म्हटलं होतं.

रामभाऊ घरीं आले. त्यांनीं कोपऱ्यांत छत्री ठेवली. बायकोला म्हटलं, ' खिशांत काय आहे तें घे. '

' जागेचं काय झालं ?'

' मी सांगितलेली गोष्ट आधीं कर. '

' मला वाटलच होतं. ' असं पुटपुटत सौ. पेटकरनीं रामभाऊंच्या कोटाचा खिसा चाचपला. ' अय्या पेढे ? ते कशाबद्दल ?'

' जागा मिळाल्याबद्दल. पंधरावीस दिवसांत सामान हालवायला लागेल. '

' खरंच ?'

' अग, पोंगुर्लेकरसाहेबांची कल्पना नाहीं तुला. केवळ त्यांच्या एका शब्दामुळं जागा मिळाली आपल्याला. '

' चला, सुटलें बाई !'

दुसऱ्या दिवसापासून सामानाची आवराआवर सुरू झाली. रामभाऊंनीं चार दिवसांची रजा काढली.

' केवढा तरी प्रश्न मिटला. ' सामानाच्या खोक्याचं झांकण मिटत रामभाऊ म्हणाले, ' भरपूर वेळ मिळत गेला कीं तब्येतहि सुधारेल माझी. गाडीच्या रोजच्या प्रवासांत हैराण होऊन गेलों होतों.'

' हो ना. मलासुद्धा आतां कांही शिकतां येईल मुंबईंत......ही दोरी ओढा पाहूं जोरानं. '

रामभाऊ दोरी ओढूं लागल्यावर त्या म्हणाल्या, ' भरतकामाची किती आवड आहे मला. मी हा मोर भरला ना—'

' तो पलीकडला खोका भरला का बघ पाहूं —' रामभाऊंनीं विषय बदलला.

'असं काय करतां? मीं काय म्हणतेंय् ऐकताय् का? मी हा मोर भरला ना, तेव्हां माझी मावशी आली होती—'

'अग ही गोष्ट ऐकून ऐकून माझे कान साफ विटले आहेत. तुझ्या शिक्षणापेक्षां मुलांच्या शिक्षणाचं मला विशेष वाटतं! रमेश, उमेश इतके हुषार आहेत! आपण ह्या बदलापुरांत राहिलों तर त्यांना इंजिनिअर वकील कांहींसुद्धां होतां येणार नाहीं. मुंबईंत केवढे सुधारतील ते. कारकून होणार नाहींत आतां ते. येत्या जूनपासून तिथल्या शाळेंत नांवं घातलीं कीं सुटलों आपण—'

—मुलांचीं नांवं घालून आल्यावर रामभाऊंनीं सुस्कारा सोडला आणि बायकोला म्हटलं, 'मुंबईंत आल्यावर पहिलं महत्त्वाचं काम झालं.'

'तुम्ही आतां एकदां भरतकामाच्या क्लासची चौकशी कराल का? मला किनई इतकी आवड आहे!—'

'हो—'

'कृपा करून त्या मोराची आणि तुझ्या मावशीची गोष्ट सांगूं नकोस आणि शेजारींपाजारींसुद्धां तुझ्या कलेबद्दल बोलूं—सांगूं नकोस. शेजारचे वैद्य आहेत त्यांच्या मिसेस्नीं भरलेल्या फ्रेमी बघ नि मग बोल. बदलापूर नाहीं हें. मुंबई आहे. आतां आपल्याला एकच पहायचं—आपलीं मुलं कुणीतरी वकील, डॉक्टर झालीं पाहिजेत.'

हळूहळू नवीन जागेंत बिऱ्हाडं येऊं लागलीं. सगळ्या चाळी भरल्या. रामभाऊंच्याच विभागांत काम करणारे जोशी आले, घाटपांडे आले, कर्णिक, आले, वैद्य आलेच होते म्हणून त्यांच्या येण्याचा प्रश्न नव्हता! आणि मग पोंगुर्लेकरसाहेब आल्यावर एकंदरींत चित्राला रुबाब प्राप्त झाला. सगळ्या कारकूनवर्गाला सहलीसारखं वाटूं लागलं. दहाबारा जणांच्या टोळक्यांनीं एकदम ऑफिसला जायचं, संध्याकाळीं बरोबर निघायचं, रात्रीं जेवण झालं की गॅलरींत एकदम यायचं, पुन्हां गप्पा मारायच्या आणि मग रात्रीं साडे-दहा अकराला खोलीवर परतायचं असं चालू झालं.

रामभाऊ चहा घेऊन सकाळीं आठ वाजतां घाटपांड्यांकडे जाऊं लागले. तिथून गप्पाटप्पा मारून साडेनऊला ते घरांत येत. जेवण होईपर्यंत कर्णिक दाराशीं असत. हातावर पाणी पडलं कीं, रामभाऊ कपडे घालून

कर्णिकांबरोबर ऑफिसला जायला निघत. संध्याकाळीं ऑफिसांतून येतांना कर्णिकच असत बरोबर. आल्यावर चहा झाला कीं, गप्पा मारायला म्हणून किंवा ऑफिसांतलं राहिलेलं काम करायला म्हणून घाटपांडे आणि रामभाऊ एकत्र बसत ते साडेआठ नऊपर्यंत. मग घरीं येऊन जेवण होई. तोंवर कुणी जोशी नाहींतर सामंत येत आणि म्हणत 'पेटकर, कालचा जी. आर. वाचला कीं नाहीं ?'

'कुणी ड्राफ्ट केला होता ?'

'अहो, त्यांत राजकारण आहे. तुम्हांला तो त्रिलोकेकर ठाऊक आहे ना...'

मग चर्चा होत. जुन्या, नव्या साहेबांच्या गोष्टी निघत. आंतल्या खोलींत पेंगुळलेल्या सौ. पेटकर साडेअकरा झाले कीं भांड्यांची आदळआपट करीत. गप्पांत तो आवाज ऐकूं आला तर रामभाऊ सगळ्यांना निरोप देत नाहींतर गप्पा आणखी रंगत.

सौ. पेटकरांनीं इतर बायकांशीं ओळख करून घेतली. सौ. जोशी, सौ. घाटपांडे, सौ. कर्णिक...कुणी गाणं म्हणत, कुणी भरतकाम क ीत, कुणी स्वेटर विणत, दोघी तर नुसत्या बडबडणाऱ्या होत्या !

'मला भरतकामाची खूप आवड आहे.' सौ. पेटकर. सौ. वैद्यांना म्हणाल्या. सौं. वैद्यांनीं सौ. कर्णिकांकडे पाहून डोळे मिचकावले.

'तुम्हीं घाटपांडेबाईंना विचारा ना, त्या शिकवतील.–'

'त्यांना कुठला वेळ ? पुरुषांसारखं त्यांना ऑफिसला जायचं असतं ना ? त्यांना ह्या बायकी गोष्टी आवडत नाहींत. त्यांना आवडतं गाणं !'

'पण आवाज तरी काय आहे ! अगदीं कावळा... पण त्यांना आपलं वाटतं आपला आवाज कोकिळेसारखा आहे !'

'आवाज नाहीं हो, रंग.'

—मग खूप खसखस [पिकवायची.

'कावळ्यावरून आठवण झाली.' सौ. वैद्य म्हणाल्या.

'काय ?' पडलेल्या आवाजांत सौ. पेटकरांनीं विचारलं.

सौ. कर्णिकांच्या खुणावण्याकडे लक्ष न देतां सौ. वैद्य म्हणाल्या,' सांगूं का ? राग मानूं नका हं. पण सौ. घाटपांडे म्हणत होत्या, तुमच्याकडे तो पोपट भरलेला आहे ना–'

'पोपट नाहीं, मोर.'

'अय्या !—तर त्या म्हणत होत्या, तुमच्याकडला पोप–नाहीं, मोर अगदीं कावळ्यासारखा आहे !'

'अहो, त्यांना काय कळतंय् भरतकामांतलं ?' सौ. कर्णिक म्हणाल्या, 'त्यांनीं नोकरीच करावी. परवां म्हणत होत्या, आपले ते जोशी आहेत ना, त्यांना ऑफिसांत कांहीं काम करतां येत नाहीं. साधा ड्राफ्ट लिहिला तर ओळीगणिक दोन चुका करतात.'

'कित्ती खोट्या आहेत ! मला तर म्हणत होत्या ओळीगणिक चार चुका करतात.'

'बाकी हेसुद्धां म्हणत होते, जोशींना रोज बोलतात म्हणे साहेब.'

'ते पोंगुर्लेकर ना ? बाकी दिसायला कावळाच तो !'

'इश्श बाई ! कावळा म्हटलं कीं हंसूंच येतं मला !'

सौ. कर्णिकांच्या खुणावण्याकडे लक्ष न देतां सौ. वैद्य म्हणाल्या. अशाच गोष्टींचं पीक रोज वाढूं लागलं होतं.

– आणि ऑफिसांत जातांना सगळ्या कारकुनांच्या गोष्टींना ऊत येई.

'कालची भानगड कळली का ?'

'कोणती ? मंडलिकांची का ?'

'कळली ना ? आमच्या साहेबानं असं फायरिंग केलं—'

'बाकी फायरिंग करावं तें त्यानंच ! तुमच्या पोंगुर्लेकरसारखा मिळमिळीत नाहीं तो !'

'तुम्हांला काय माहीत ? आपल्या पेटकरांना विचार. पोंगुर्लेकर-साहेबांनीं बोलावलं आहे म्हटलं, कीं सगळ्या अंगाला घाम सुटतो त्यांच्या.'

'काय रे, पेटकरचा कॉन्फिडेन्शिल् रिपोर्ट—'

'येस्. अगदीं युसलेस् आहे. मला त्या डिकॉस्टानं दाखवला ना !'

'अगदीं साफ केलाय् म्हणे त्याला !'

'घरीं कधीं गेला आहेस का त्याच्या ?'

'कां ?'

'अरे, बायकोची नि त्याची सारखी कुरकूर चालू असते म्हणे !'

'अरे, आणि आपल्या घाटपांडेचं काय ? मिसेस्‌ला दोनशें रुपये मिळतात म्हणून तो किती आज्ञेंत राहतो तिच्या, पाहिलंस ना ? पण तरी भांडत असते सारखी. सकाळीं संध्याकाळीं पहावं तेव्हां पावाचे तुकडे आणि जॅम्. जेवायला कांहीं धड मिळत नाहीं त्याला.'

...'आपल्या माधवरावांचा पोरगा साला मवाली निघणार !'

"कशावरून ?'

'परवां शनिवारीं रेसकोर्सवर पाहिला त्याला मी–नाहीं, आमच्या एका दोस्तानं.'

'समोरच्या खोलींत सारखा डोकावत असतो.'

'त्या समोरच्या खोलींतला पदार्थ मात्र फर्मास आहे हं !'

'अरे, थर्मास आहे थर्मास ! नेहमीं हॉट्. बघावं तेव्हां अंगाला आलोखेपिळोखे आणि कपडे बदलणं—'

'आपल्या नाडकर्ण्यांची भाची लागते म्हणे ती !'

'अस्सं ?'

आणि मग कचेरींत सगळ्या कारकुनांना सगळ्या कारकुनांच्या खाजगी गोष्टी कळल्या नव्या वस्तींत राहायला गेलेल्यांनीं एकमेकांच्या घरच्या गोष्टी ऑफिसांत सांगितल्या आणि त्याबदली ऑफिसांतल्या लोकांनीं ऑफिसां-तल्या एकमेकांच्या गोष्टी त्यांना दिल्या.

रामभाऊ पेटकर गप्पा मारीत बसतात हें त्यांच्या बायकोला आवडत नाहीं, त्यामुळें घरांत कुरकूर चालते हें ऑफिसांत कळलं होतं. आणि रामभाऊ पेटकरांना पोंगुर्लेकरसाहेब म्हटलं कीं दरदरून घाम सुटतो हें चाळींतल्या सर्वांना ठाऊक झालं होतं. रामभाऊंच्या घरांतल्या कावळ्याची गोष्ट बाय-कांनीं आपापल्या पतिराजांच्या कानीं घातली होती आणि पोंगुर्लेकरसाहेबांची गोष्ट त्यांनीं पदरीं बांधून घेतली होती.

या सगळ्याचा परिणाम असा झाला कीं, कुणालाहि खाजगी गोष्ट कांहीं राहिली नव्हती. बायका दुपारच्या वेळांत यजमानांच्या ऑफिसच्या गोष्टी सांगत आणि ऑफिसांत सगळे कारकून घरांतल्या कथा सांगत.

रामभाऊंच्या टेबलावर सहा महिन्यांचं काम तुंबलंय् हें पलिकडल्या चाळींतल्या सौ. तळेकरांना ठाऊक होतं आणि सौ. अष्टपुत्र्यांना पांच महिने होऊन गेले आहेत हें दुसऱ्याच विभागांत काम करणाऱ्या सामंतांना कळलं होतं.

...पेटकरीणकाकूंजवळ रामभाऊंच्या टेबलाच्या प्रकृतीची चौकशी कुणीतरी 'क्ष' यीण करी.

'पेटकरांचं टेबल काय म्हणतंय् ?'

'अहो, झोंप नाहीं म्हणे पेटकरीणकाकूंना!' तिसरंच नाक मध्यें येई. 'काय हो, पेटकरीण काकू, रामभाऊंना पोंगुर्लेकरांनीं वॉर्निंग दिली आहे म्हणे—'

'हो ना. अहो, कित्ती काम आहे त्यांच्या टेबलावर. गव्हर्न्मेंट ऑफ इंडियाचं तें सर्क्युलर आलंय् ना ?'

'कोणतं ? बारा ऑगस्टचं ?'

'हो. तेंच. त्याची इन्फर्मेशन् एकाहि टी. ओ. नं पाठवलेली नाहीं अजून.'

'मग डी. ओ. कां पाठवीत नाहींत रामभाऊ ? चांगला हे लिहितात तसा डी ओ. लिहिला तर दोन दिवसांत येईल इन्फर्मेशन.'

'मी सांगतें त्यांना. अहो गेले आठ दिवस झोंप नाहीं मला.'

तुम्हांला जोश्यांचं कळलं का ? त्यांनी म्हणे, ॲरिअर्सच्या खोटया फिगर्स दिल्या आहेत—'

आणि तिकडे कचेरींत श्री. कर्णिक कुणातरी देशपांडेला सांगत 'अष्टपुत्र्यांच्या मिसेस्नीं म्हने अर्ज केलाय.'

'कसला ?'

'नांव बदलण्यासाठीं.'

'पण लग्नानंतर पुन्हां ?'

'हो. अशा वेळीं लग्न झालंय हेंच नशीब ! त्यांना आडनांव बदलावं लागणार. अष्टपुत्र्यांचं दशपुत्रे.'

'म्हणजे ?'

'अरे, त्यांचं शेंडेफळ–जगू ठाऊक आहे ना ?'

'मला वाटलं ह्या सार्थनाम्या जगूनंतर'...

'अरे, जग्याच्या पाठीवर जुळं झालं. दहाचा आंकडा पुरा केला नागेशराव अष्टपुत्र्यांनीं !'

ऑफिसाची चाळ झाली आणि चाळीचं ऑफिस झालं. इतकं कीं, बोलून सोय नाहीं ! सगळ्यांच्या बोलण्यांतले विषय म्हणजे, जी. आर्. सर्क्युलर, वॉर्निंग, अॅरिअर्स, पे स्केल, डी. ओ...आणि याचा फायदा झाला पोंगुर्लेकर कुटुंबाला.

पोंगुर्लेकरसाहेबांच्या हाताखालीं काम करणाऱ्या सगळ्या कारकुनांच्या बायका सौ. पोंगुर्लेकरांना साहेब मानूं लागल्या. कुणाचे अर्ज, कुणाच्या सुट्या, कुणाचे रिपोर्ट कसे आहेत तें सौ. पोंगुर्लेकरांना माहीत होतं. त्या म्हणतील तें होऊं लागलं. त्यांचा शब्द झेलला जाऊं लागला. कारकून तर घरींहि पोंगुर्लेकरांना भ्यायचे. ( पोंगुर्लेकरांना पाहून रामभाऊंनीं हातांतली जळती सिगारेट खिशांत टाकल्याची गोष्ट अजूनहि हौशीनं सांगण्यांत येते ! ) पोंगुर्लेकरांच्या पोरांशीं झालेल्या पोरांच्या भांडणांत बायका साहेबांच्या पोरांचा कड घेऊं लागल्या आणि मग कुमार आणि कुमारी पोंगुर्लेकर सगळ्या पोरांचे साहेब झाले.

रात्रीचे नऊ वाजले होते. रामभाऊ जेवून गप्पा मारायला म्हणून शेजारीं चालले होते. एवढ्यांत त्यांच्या बायकोनं येऊन त्यांची बाही धरली.

'मला तुम्हांला कांहीं विचारावयाचं आहे.' ती म्हणाली.

'काय ?'

'तुमच्या टेबलाची पोझिशन् काय आहे ?'

रामभाऊंना पोंगुर्लेकरांची आठवण होऊन घाम सुटला. 'सर...त ...तशी ठीक आहे.'

'सेंट्रल गव्हन्मेंटला इन्फर्मेशन पाठवली ?'

'कु......कुठली ?'

'बारा ऑगस्टच्या सर्क्यूलरची !'

'न...नाहीं. टी. ओ. कडून ती आऊटस्टॅंडिग आहे अजून !'

'मग डी. ओ. कां पाठवला नाहीं ? सगळ्या बायका मला विचारतात येतां जातां—त्या इन्फर्मेशनचं काय झालं म्हणून ! चाळींत तोंड दाखवतां येत नाहीं मला.'

'पण...'

'पण नाहीं नि कांहीं नाहीं. बदलापूरला निदान ही कटकट नव्हती माझ्या जिवाला. तिथं एकाद्या रविवारीं तरी पेटकर कुटुंबाच्या गोष्टी होत. हें काय इथं ? चोवीस तास ऑफिस. तुम्हांसा सुख नाहीं. मला सुख नाहीं. पोरांचा अभ्यास घेतलात कधीं ? '

'न...नाहीं.'

'दिवसभर तीं पोंगुर्लेकरसाहेबांच्या पोरांपुढें लुलू करतात. तुम्हाला त्यांना वकील करायचं आहे. डॉक्टर करायचं आहे. आणि अभ्यासाकडे लक्ष कोण देणार त्यांच्या ? '

इतक्यांत गॅलरींत मुलांच्या भांडणाचा आवाज काला म्हणून सौ. पेटकर बोलायच्या थांबल्या आणि गॅलरींत गेल्या. त्यांच्या मागोमाग काय झालं हें पहायला रामभाऊ गेले.

जोश्यांच्या तीन वर्षांच्या मालीचं आणि वैद्यांच्या मधूचं भांडण चाललं होतं

'तुझ्या तात्यांना भितोंय का मी ? तेच भितात साहेबाला. ' असं नाना म्हणत होते आमचे काल. ' मधूनं उत्तर दिलं.

'अले जा. एक थादा दाफ्त नाहीं लीता येत तुझ्या नानांना. तात्यांना सांगते, थायबांना म्हणावं, ह्या मधिटल्याच्या नानांना चांगला डी. ओ. लिहा एक--'

तीन वर्षांच्या मालीचं ऑफिसचं हें अगाध ज्ञान ऐकून रामभाऊ मटकन् खालीं बसले ! .........

-- पहिल्या जेम्सचा पुत्र...दुसरा जेम्स...पहिल्या कारकुनाचा पुत्र ...दुसरा कारकून...

• ○ ○

## १५ : दोन कथा—

### १ चोरी

वसंतरावांना पहांटे जाग आली. त्यांनीं बघितलं तर पुढलं दार सताड उघडं. त्यांना वाटलं, आपली आई अवेळीं उठून बाहेर गेलेली दिसतेय्. त्यांच्या डोक्याची तिडीक उठली. त्यांनीं दिव्याचं बटण दाबलं नि म्हटलं, 'भलत्या वेळीं बाहेर जायचं तर हांक तरी मारावी माणसानं !'

एवढ्यांत घरांतून आई डोळे चोळीत चोळीत बाहेरच्या खोलींत आल्या नि म्हणाल्या, 'वसंता, काय झालं रे?' त्यांना खोकल्याची उबळ आली, तशी बाजूला पलंगावर पडलेल्या वत्सलाबाईंना जाग आली.

वत्सलाबाईंनीं डोळे उघडले नि पाहिलं तर दिवा लावलेला. त्यांनीं चटकन् अंगावर पांघरूण ओढून घेतलं नि म्हटलं, 'इश्श ! दिवा बंद करा पाहूं !'—अंगावर सारखं पांघरूण ओढून त्यांनीं आंतल्या आंत आपल्या शरिरावरून हात फिरवला नि त्याच्या कौतुकांत त्या रमून गेल्या. वसन्त-रावांच्या नि सासूबाईंच्या बोलण्याकडे त्यांचं लक्षच नव्हतं.

त्या चाळींत वत्सलाबाईंसारखी अंगलट कुणालाच नव्हती. फक्त वत्सलाबाईंनाच असं वाटे असं नाहीं, तर चाळींतल्या समस्त पुरुषवर्गाचं तें मत होतं नि हें सगळ्यांना ठाऊक होतं. नवीन झिरझिरीत पातळ नेसून बाहेर पडल्या कीं त्या आपल्या मताची खात्री करून घेत. कुणाहि पुरुषासमोर त्या गेल्या कीं त्याची आपल्या कपड्यांतून फिरणारी हांवरी नजर त्या ओळखत

नि मनांत समाधान पावून बाहेर उगाचच लटका राग दाखवत. नळावरून पाणी आणतांना त्यांना ठाऊक असे कीं प्रत्येक पुरुषाची नजर आपल्या ओल्या पोटऱ्यांना चावा घेत आहे. समोरच्या चौकांत बॅड्‌मिंग्टन खेळतांना, शेजाऱ्यांचीं मुलं उचलून घेतांना, दारावर येणाऱ्या भाजीवाल्याकडून भाजी विकत घेतांना, सगळ्यांच्या भुकेल्या अधाशी नजरा त्यांच्या अर्धवट उघड्या शरीरावरून फिरून खट्टू मनानं परतत. अशा वेळीं वत्सलाबाई मुद्दामच अंगाभोंवतीं पदर लपेटून घेत नि त्यांना त्यांच्या पराभवाची आणि आपल्या-जवळच्या ऐश्वर्याची जाणीव करून देत:

——अजून दिवा लागलेला आहे असं पाहून वत्सलाबाई चिडल्या. त्या उजेडामुळं त्यांचीं चित्रं नीटपणें रूप धारण करीत नव्हतीं. कांहींशा लाडिक-पणं त्या वसंतरावांना म्हणाल्या, 'दिवा बंद करा गडे !'

वसंतरावांनीं त्यांच्या लाडिकपणाकडे लक्ष दिलं नाहीं. ते सारखं म्हणत होते, 'असं कसं झालं ? जाग कशी नाहीं आली ?'

वत्सलाबाई पांघरुणांतूनच बोलल्या, 'म्हणजे ? काय, झालं काय ?'

'काय व्हायचं राहृयलंय् आतां ? चोरी झाली चोरी !'

'खरंच ?'

'मग खोटं सांगतोंय् कीं काय ?'

संकोचल्यासारखं होऊन वत्सलाबाई आंतील खोलींत निघून गेल्या आणि कपडे नीटनेटके करून त्या बाहेर आल्या तोंवर शेजारची बरीचशी मंडळी बाहेर जमली होती. प्रत्येकजण आपापल्या परीनं चोरीची नक्की वेळ आणि आपण उशीरांत उशीरां किती वाजेपर्यंत जागे होतों हें सांगत होता.

'रात्रीं सिनेमाहून मी परत आलों तेव्हां एकाचा का दिडाचा टोला मी केळकरांच्या घड्याळांत ऐकला.'

'मी अभ्यास करून निजलों तेव्हां अडीच होऊन गेले होते. परीक्षा आली आहे ना जवळ——'

'मी औषधासाठीं उठलों तेव्हां...'

'..............'

'..............'

'पण एवढे गज वांकवीपर्यंत नि चोरटे आंत शिरेपर्यंत वसंतरावांना जाग कशी आली नाहीं ?'

इतक्यांत एकजण चावटपणानं (नि हिरमुसल्या मनानं) हळूच म्हणाला, 'वत्सलाबाईंना विचारा याचा जाब !'

सर्वांनीं पहाणी केली नि निष्कर्ष काढला कीं साडेतीनच्या जवळपास चोरट्यांनीं खिडकीचे गज वांकवून आंत प्रवेश केला नि वत्सलाबाईंचे तीन एक हजारांचे दागिने नि कपडेलत्ते घेऊन पुढल्या दारानें पोबारा केला.

पोलिसांत वर्दी गेली. पोलीसतपास चालू झाला. जबान्या झाल्या. थाद्या झाल्या. मग आईंनीं पोलिसांना सांगितलं, 'पुढल्या खोलींत मीं बराच वेळ बॅटरीचा उजेड पाहिला पण मला काय कल्पना ? मला वाटलं वसंताच असेल---'

सासूबाईचं बोलणं ऐकलं नि वत्सलाबाईंच्या अंगावर सर्रकन कांटा उभा राहिला...म्हणजे त्या चोरट्यांनीं माझ्या रमणीय देहाचं सौंदर्यहि मला न जाणवतां उघड्या डोळ्यांनीं दिव्याच्या प्रकाशांत बघून घेतलं तर !

कांहीं दिवसांनीं अद्‌भुत गोष्ट घडली ! पोलिसांना चोरीचा तपास लागला !! वत्सलाबाईंचे सगळे दागिने नि कपडे परत मिळाले !!!

चोरी सांपडल्याची अद्‌भुत गोष्ट झाल्याबद्दल आईंनीं बोलल्याप्रमाणें मोठा सत्यनारायण केला. घरांत आनंदीआनंद झाला. पण वत्सलाबाईंच्या चेहेऱ्यावरील दुःख कांहीं नाहींसं झालं नाहीं.

त्या सारख्या मनांत म्हणत होत्या, 'ही चोरी सांपडली, पण माझ्या शरीरसौष्ठवाच्या दृश्याची जी चोरी झाली—!'

० ० ०

संग्रहालय,
२१८०५
१५७५
नों. दि. ११७६१

# शोध

गाडी येण्याची वेळ झाली तशी सोमसुंदरम् अय्यर गेटाजवळ तयार राहिला. त्यानं आपल्या पांढऱ्या कोटाचीं बटणं लावलीं नि हातांतला पंच उगाचच चाळवला. ही आणि नंतरच्या दोन गाड्या–एक अप् नि एक डाऊन-गेल्या कीं ड्यूटी खलास. मग तो आपल्या खोलीवर जाऊन कांहींतरी बनवून खाणार होता. नाहींतर पलीकडल्या 'कॅफे मद्रास' मध्यें जाऊन उत्तप्पा आणि सांबारावर ताव मारणार होता. शिवाय रात्रीं त्याला आपल्या आप्पांना पत्र लिहायचं होतं कीं माझ्यासाठीं मुली पहाण्याच्या खटपटीला लागूं नये. माझं वय अजून पुरतं तेवीसहि नाहीं नि नोकरींत अजून मी नवीनच आहें. पुढं एक दोन वर्षांनीं बघूं. तोंवर मी पर्मनंटहि होईन. सध्यां माझी लग्नाची घाई नाहीं. मी फार सुखांत आहें.

––तेवढ्यांत गाडी आली. प्रवाशांचे लोंढेच्या लोंढे स्टेशनाबाहेर पडले. सोमसुंदरम्च्या पुढं तिकिटांचा छोटासा ढीग पडला. पहिल्या वर्गाचे रुबाबदार, परीट घडींतले उतारू, तिसऱ्या वर्गाची सरमिसळ, पासवाले, तिकीटवाले, दुधवाले, भाजीवाले, ओळखीचे नि बिनओळखीचे चेहरे...प्रत्येक उतारू पुढं गेला कीं गेटावरल्या चक्राचा खट् खट् असा आवाज होई.

गाडी निघून गेली. बहुतेक उतारू स्टेशनाच्या बाहेर पडले. सोमसुंदरम् गेट सोडून इंडिकेटर लावायला वळणार एवढ्यांत पुढल्या डब्यांत

बसलेली एक तरुणी सावकाशपणें आली. काळीसांवळी, सुरेख चेहऱ्याची नि अगदीं रेखीव अवयवांची. तिनं पांढरे शुभ्र नि नलम कपडे घातले होते.

एरव्हीं गर्दीतून ती गेली असती तर सोमसुंदरम्‌चं तिच्याकडे लक्ष गेलं नसतं. तिच्या अवयवांचा ठसठशीतपणा त्याच्या नजरेस आला नसता. कदाचित् मघांच्या गर्दीतून हिच्याहूनहि तरतरीत दिसणाऱ्या नि रेखीव, रसरशीत अवयवांच्या तरुणी त्याच्या समोरून गेल्या असतील. अशा वेळीं त्याचं लक्ष जाई तें उतारूंच्या हातांतल्या तिकिटांवर नि पासांवर. पण आतां सावकाशीनं येणाऱ्या ह्या एकटचा मुलीकडे सोमसुंदरम्‌चं लक्ष गेलं नि त्याच्या शरीरांत एकदम लक्‌कन् कांहींतरी झालं. त्याला वाटलं कीं...वाटलं कीं... निदान तिला गोड शब्दांत विचारावं...

--' येस ? टिकेट् प्लीज !' त्यानं तिच्यापुढं हात केला.

तिनं आपली पर्स उघडली नि त्यांतलं तळहाताएवढं नाजुक पाकीट बाहेर काढलं.

सोमसुंदरम्‌ला आतां वेळ होता. कामाची धांदल नव्हती. त्यानं तिच्या लांबसडक बोटांकडे पाहिलं. त्या नाजुक लुसलुशीत हातांत घुटमळल्या जाणाऱ्या चामडयाच्या पाकिटाकडे पाहिलं.

' ओह ! ' तिनं नाजुक आवाज काढला.

' Well, what happened ? ' सोमसुंदरम्‌नं तिला विचारलं.

' अय्या, तिकीट कुठं गेलं ?'

' मला हो काय ठाऊक ? तुमचं तिकीट काय मीं ठेवून दिलंय् कुठं ?'

' म्हणजे ? गेलं कुठं तिकीट ?'

—' तुमच्या पर्समधें बघा, आंत पडलं असेल.' तिच्या गोंधळलेल्या चेहऱ्याकडे पोटभर पहात सोमसुंदरम् म्हणाला. तिचं तिथं थांबणं त्याला आवडूं लागलं होतं.

हळूहळू गर्दी होऊं लागली. स्टॉलवाला, तिथला पानवाला, आइस्क्रीम विकणारा, चारसहा उतारू--

ती मुलगी आतां चांगलीच गोंधळली. तिनं पर्समध्यें हात घालून पाहिलं, पुन्हां पुन्हां पाकीट तपासलं. पण तें छोटं पिवळं तिकीट कुठंतरी दडून बसलं होतं नि मिळत नव्हतं.—मूर्ख कुठलं !!

'Excuse me—पण मी गाडींत चढण्यापूर्वीं तिकिट घेतलं होतं हो. —' तिनं आजूबाजूच्या माणसांकडं केविलवाण्या चेहेऱ्यानं पाहिलं.

सोमसुंदरम्‌नं तिथं जमलेल्या लोकांना आपापल्या उद्योगाकडे जायला सांगितलं नि ते गेल्यावर आवाजांत शक्य तेवढं मार्दव आणून तो म्हणाला, 'मी कुठं अविश्वास दाखवतोंय् तुमच्यावर? मला आपलं तिकीट द्या नि जा.'

'पण तें कुठं मिळत नाहीं ना!' ती अगदीं रडकुंडीला आली. तिच्या चेहेऱ्यावर घर्मबिंदू जमा झाले. अंगसुद्धां घामानं भिजलं. पांढऱ्याशुभ्र पोलक्यांतून खालीं सरकणारे घर्मबिंदु तिच्या शरीराच्या सांवळ्या रंगाची किमया दाखवूं लागले.

सोमसुन्दरम्‌ला वाटलं, हिनं तिकीट नक्की घेतलं असणार. कुठंतरी वाटेंत पडलं असेल इतकंच. हिला म्हणावं, 'बाई, तूं जा आतां. माझा तुझ्यावर विश्वास आहे.' इतकी रेखीव दिसणारी नि...नि डौलदार अवयवांची ही तरुणी कधीं खोटं बोलेल का?

'मी आपली चार्ज भरते. मला नाहीं तिकिट सांपडत. गाडी आली तेव्हां मीं घाईघाईनं तिकीट घेतलं नि गाडी पकडली. कुठंतरी पडलं वाटतं तें!

तिनं पर्स उघडली.

सोमसुन्दरम् तिच्या त्या गोंधळलेल्या चेहऱ्याकडे एकसारखा पहात राहिला. त्याला वाटलं, तिच्या मुखावरला घाम आपल्या रुमालानं हळूच टिपावा, हलकेच,—

त्याची नजर तिच्या गळ्याकडे गेली नि तो लाजला; मनोमन मोहरून गेला. त्याला आपण तिला विचारलेला प्रश्न आठवला... 'तुमचं तिकीट काय मी ठेवून दिलंय् कुठं?'... तो आणखी लाजला.

'चार्ज नका भरूं!' तो त्या तरुणीला म्हणाला. 'तुमचं तिकीट... तुम्ही घेतलंय् तिकीट, मला ठाऊक आहे.'—

तिनं त्याच्या कोवळ्या वयाकडे पाहिलं नि कौतुकानं त्याच्या वेंधळ्या बोलण्याकडे लक्ष दिलं.

'पण मी भरतें ना चार्ज. तुम्हांला तरी कसं पटावं मीं तिकीट

काढलं होतं म्हणून ? ' ती म्हणाली.

'माफ...माफ करा. तुमच्या ब्लाऊजमध्यें...तिथं...तिथं तें दिसतंय् मला जा तुम्ही.' सोमसुन्दरम् एका दमांत सगळं बोलून गेला. त्यानं निःश्वास टाकला.

ती रेखीव चेहऱ्याची नि भरीव अंगाची तरुणी कांठोकांठ लाजली. तिनं पदर सारखा केला नि हात हळूच आंत घालून तें तिकीट सोमसुन्दरम्च्या हातांत दिलं. जातां जातां ती पुटपुटली, 'थँक्स...!'

तें घामानं ओलंचिंब झालेलं तिकीट सोमसुन्दरम्नं दोन्ही हातांत घट्ट धरलं नि मग तें इतर तिकिटांत न ठेवतां हळुवारपणें आपल्या कोटाच्या खिशांत ठेवलं !

-- खोलीवर गेल्यावर त्यानं प्रथम आपल्या आप्पांना पत्र लिहिलं,

'...इथं कामावरून दमून परत आल्यावर जेवण करायचं, खोली आवरायची म्हणजे भारी त्रासाचं नि कंटाळवाणं वाटतं--'

० ० ०

संग्रहालय
१९४०५
क्रमांक १५७७
नों. दि. ११४।६७
म. ग्रं. सं ठाणे.

# आमचेकडे मिळणारीं पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| १) प्रेमाचा गुलकंद | ले. दत्तू बांदेकर | किं. ३–५० |
| २) चिरीमिरी | ले. ,, | किं. ३–५० |
| ३) आवळ्याभोपळ्यांची मोट | ले. ,, | किं. ३–५० |
| ४) पेंचप्रसंग | ले. ,, | किं. ३–५० |
| ५) प्यारी | ले. ,, | किं. ३–५० |
| ६) चोरपाउलें | ले. ,, | किं. ३–५० |
| ७) बहुरूपी | ले. ,, | किं. ३–५० |
| ८) आडपडदा | ले. ,, | किं. ३–५० |
| ९) न पुजलेली देवता | ले. मामा वरेरकर | किं. ३–०० |
| १०) फाटकी वाकळ | ले. ,, | किं. ३–२५ |
| ११) गोदू गोखले | ले. ,, | किं. १–५० |
| १२) तरतें पोलाद | ले. ,, | किं. ३–२५ |
| १३) मी राम जोशी | ले. ,, | किं. ३–५० |
| १४) आघात | ले. ,, | किं. १–०० |
| १५) शिपायाची बायको | ले. ,, | किं. ३–५० |
| १६) विकारी वात्सल्य | ले. ,, | किं. १–५० |
| १७) गीता | ले. ,, | किं. १–०० |
| १८) वेणू वेलणकर | ले. ,, | किं. १–५० |
| १९) कुलदैवत | ले. ,, | किं. १–५० |
| २०) अवघाची संसार | ले. वि. वि. बोकील | किं. ३–५० |
| २१) रुसवे आणि फुगवे | ले. ,, | किं. ३–५० |
| २२) एक होता नवरा | ले. ,, | किं. ३–७५ |
| २३) झिमझिम | ले. ,, | किं. ३–२५ |

| | | |
|---|---|---|
| २४) पाखर | ले. शिरोडकर | किं. १–२५ |
| २५) नवें जहाज | ले. ,, | किं. १–२५ |
| २६) मातीचें घर | ले. ,, | किं २–०० |
| २७) गालबोट | ले. ,, | किं. २–५० |
| २८) किमया | ले. ,, | किं. १–०० |
| २९) रुतणारे कांटे | ले. उपाध्ये | किं. २–५० |
| ३०) अभिसारिका | ले. ,, | किं. २–०० |
| ३१) निखारा | ले. ,, | किं. १–७५ |
| ३२) मदनमंदिर | ले. आठवले | किं. २–७५ |
| ३३) अब्रूसाठीं | ले. ,, | किं. २–५० |
| ३४) बाँबगोळे | ले. ,, | किं. १–२५ |
| ३५) प्राणविसांवा | ले. ,, | किं. ३–०० |
| ३६) कीर्ति | ले. शांताबाई नाशिककर | किं. ३–५० |
| ३७) वाळूंतील सरोवर | ले. ,, | किं. २–०० |
| ३८) मालगाडी | ले. शामराव ओक | किं. ३–०० |
| ३९) भिडस्त माणूस | ले. ,, | किं. ३–०० |
| ४०) दुराचारी | ले. राजरत्न जोशी | किं. ८–०० |
| ४१) नसत्या उठाठेवी | ले. सौ. कुमुदिनी रांगणेकर | किं. ३–७५ |
| ४२) विरलेलें वस्त्र | ले. ,, | किं. १–७५ |
| ४३) सौंदर्याचा फुलबाग | ले. वि. वा. हडप | किं. ५–०० |
| ४४) निरभ्र चंद्र | ले. ,, | किं. ३–५० |
| ४५) बाईलवेडा | ले. ,, | किं. ४–०० |
| ४६) भविष्यकाळ | ले. ,, | किं. ३–५० |
| ४७) मास्तरीण काकू | ले. ,, | किं. ३–५० |
| ४८) रूढीच्या वणव्यांत | ले. ,, | किं. ४–०० |

| | | |
|---|---|---|
| ४९) बहकलेली तरुणी | ले. ,, | किं. ४–०० |
| ५०) गौरी–शंकर | ले. ,, | किं. ०–७५ |
| ५१) फापटपसारा | ले. वि. आ. बुवा | किं. ३–७५ |
| ५२) तुका म्हणे त्यांतल्या त्यांत | ले. ,, | किं. ३–७५ |
| ५३) मरण कीं लग्न | ले. सावरकर | किं. १–५० |
| ५४) संन्यस्त खड्ग | ले. ,, | किं. १–०० |
| ५५) गोमांतक (कविता) | ले. ,, | किं. ४–०० |
| ५६) माधवानुज | ले. श्री. म. माटे | किं. ५–०० |
| ५७) राणी चंद्रावती (नाटक) | ले. शं. ना. सहस्रबुद्धे | किं. १–०० |
| ५८) त्यागसम्राट ,, | ले. वि. ग. देशपांडे | किं. १–०० |
| ५९) सवता सुभा ,, | ले. गुप्ते | किं. ०–७५ |
| ६०) छेडलेला छावा ,, | ले. वि. ना. कोठीवाले | किं. १–०० |
| ६१) स्वराज्याचा पुनर्जन्म | ले. ,, | किं. ०–७५ |
| ६२) गिरणीवाला ,, | ले. ,, | किं. ०–७५ |
| ६३) रणदुंदुभी ,, | ले. वामन गोपाळ जोशी | किं. १–२५ |
| ६४) सैरंध्री (नाटिका) | ले. गोविंद गोखले | किं. ०–७५ |
| ६५) मुलींची सीता | ले. कृ. गो. किनरे | किं. १–२५ |
| ६६) काजवे | ले. शंकर साठे (कराची) | किं. १–०० |
| ६७) नवा कोट | ले. गजानन बाळ | किं. १–५० |
| ६८) रसेल–नीति | ले. अनंत काणेकर | किं. २–२५ |
| ६९) महात्मा गांधी | ले. सीताकांत | किं. २–२५ |
| ७०) मृत्यूच्या मांडीवर | ले. भोपटकर | किं. १–७५ |
| ७१) कुठें ? | ले. सौ. कमलाबाई सोहनी | किं, १–०० |
| ७२) भावनांचे खेळ | ले. | किं. २–५० |
| ७३) विनोदी लेखसंग्रह | ले. कॅप्टन लिमये | किं. १–५० |

| | | | |
|---|---|---|---|
| ७४) | विषारी फुलें | ले. भावे | किं. १-२५ |
| ७५) | दैवदर्पण ( ज्योतिष ) | ले. भानू | किं. ३-०० |
| ७६) | सख्याशास्त्र | ले. ,, | किं. १-५० |
| ७७) | अचानक द्रव्यनिधी | ले. न. प. महाजन | किं. २-०० |
| ७८) | पौर्णिमा | ले. कवी साधुदास | किं. ५-०० |
| ७९) | जत्रा | ले. शं. ना. नवरे | किं. ३-७५ |
| ८०) | पदर | ले. कृ. ज. दिवेकर | किं. ३-७५ |
| ८१) | तुळशीपत्र व इतर गोष्टी | ले. य. गो. जोशी | किं. ३-५० |
| ८२) | भांडारकर (लेख व व्याख्यानें) | | किं. ५-०० |
| ८३) | स्वामी रामतीर्थ भाग २,४,५ व ६ | ले. बर्वे व फडके | किं. (प्रत्येकीं) २-५० |
| ८४) | राक्षसी रणसंग्राम | ले. | किं. ३-०० |


## शेठ भगवादास हिरजी

ग्रंथप्रकाशक व ग्रंथविक्रते

केशव नाइकाची चाळ नं. १ खोली नं. २

**कांदेवाडी, मुंबई ४**



IRBK-0108994

IRBK-0108994